
सोलापूर
# तरुण भारत
SOLAPUR TARUN BHARAT
न मे कर्मफले स्पृहा
सोलापूर, धाराशिव, लातूर, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना, बीड, अहमदनगर व सातारा येथून वितरित | सदाफुलीसह
सोलापूर | बुधवार, २७ ऑगस्ट २०२५ | युगाब्द ५१२७ | वर्ष ४१ वे अंक २८८ | पाने १२+८ | किंमत रु. ६/-
| RNI Regd. No. 46878/87 | Postal Regd No.. SLP/32/2024-2026. Posted daily at Medical college, Solapur.P.O. |
ही आमची ई-पेपर आवृत्ती असून ती 'तरुण भारत'च्या छापील आवृत्तीची प्रतिकृती नाही
dainiktarunbharat.com
epaper.dainiktarunbharat.com




## विचारपुष्प



समुद्राचे महत्त्व थेंबांच्या विलीनीकरणात आहे. आकाशातून समुद्राकडे जाण्याच्या प्रवासात थेंब त्यांच्या कर्मगतीमुळे सुकतात किंवा दुसरीकडे जातात. परंतु, सूर्याची तीव्र आग त्यांना बाष्पाच्या रूपात आकाशात परत घेऊन जाते आणि पुन्हा समुद्रात विलीन होण्याचा प्रयत्न करते. हा जीवाचा शाश्वत प्रवास आहे. हे रहस्य जाणून घेतल्यानंतर, कोणत्याही इच्छेशिवाय जीवन जगणे, हे दिव्य जीवन आहे.

**- यादवराव कृष्ण जोशी**
रा. स्व. संघाचे पूर्व सह सरकार्यवाह

## महत्त्वाचे

### झोमॅटो कंपनीला ४० कोटींचा कर

**बंगळुरू :** जीएसटी विभागाने झोमॅटोकडून ४० कोटी रुपयांचा कर मागितला आहे. ही कर मागणी जुलै २०१७ ते मार्च २०२० दरम्यानच्या ऑडिट आणि तपासणीवर आधारित आहे. कंपनीला मिळालेल्या तीन नोटिसांमध्ये १७.१९ कोटी जीएसटी, २१.४२ कोटी व्याज आणि १.७१ कोटी दंडाचा समावेश आहे. हा आदेश जीएसटी सहआयुक्त बंगळुरू यांनी दिला आहे. कंपनीने तिच्या नियामक फाइलिंगमध्ये म्हटले आहे की, ती या मागणीला न्यायालयात आव्हान देणार आहे. कायद्यानुसार निर्णय त्यांच्या बाजूने येण्याची अपेक्षा असून लवकरच अपील सुरू, असे कंपनीने म्हटले आहे. पहिल्या तिमाहीत महसुलात ६९ टक्के वाढ झाली. कंपनीने २०२५-२६ या आर्थिक वर्षाच्या पहिल्या तिमाहीत एकूण ७,५२१ कोटी रुपये कमावले आहेत.

### मोदींनी उचलला नाही ट्रम्प यांचा फोन

**नवी दिल्ली :** अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष ट्रम्प यांनी पंतप्रधान मोदींना टॅरिफबाबत चार वेळा फोन केले, परंतु पंतप्रधान मोदी त्यांच्याशी एकदाही बोलले नाहीत. हा दावा जर्मन वृत्तपत्र एफएझेडने केला आहे. तथापि, हा फोन कधी केला याचा उल्लेख वृत्तात नाही. वृत्तानुसार, ट्रम्प यांच्या आक्रमक व्यापार धोरणामुळे आणि भारताला मृत अर्थव्यवस्था म्हटल्यामुळे मोदी संतापले आहेत.

### अमेरिकन ध्वज जाळल्यास कारवाई


**वॉशिंग्टन :** अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी न्याय विभागाला अमेरिकन ध्वज जाळणाऱ्या लोकांची चौकशी करण्याचे आणि त्यांच्यावर खटला चालवण्याचे निर्देश देणारा कार्यकारी आदेश जारी केला आहे. तथापि, अमेरिकेच्या सर्वोच्च न्यायालयाने ध्वज जाळणे ही संविधानाने संरक्षित केलेली कायदेशीर राजकीय अभिव्यक्ती मानली आहे. अमेरिकन ध्वज जाळल्याने दंगली होऊ शकतात, असे ट्रम्प म्हणाले. ध्वजाचा अपमान करणे हे अत्यंत आक्रमक कृत्य आहे.

# भारत विश्वगुरू बनेल, तेव्हाच संघाचे कार्य सफल

**• सरसंघचालक डॉ. मोहनजी भागवत यांचे प्रतिपादन • त्रिदिवसीय संवाद कार्यक्रम**

**नवी दिल्ली, २६ ऑगस्ट**

सोबत घेऊन चालण्याची ज्यांची परंपरा आहे, ते हिंदू आहेत आणि हिंदूंचा स्वाभाविक धर्म समन्वय आहे, संघर्ष नाही, असे प्रतिपादन रा. स्व. संघाचे सरसंघचालक डॉ. मोहनजी भागवत यांनी मंगळवारी येथे केले. भारत जेव्हा विश्वगुरू बनेल, तेव्हाच संघाचे कार्य सफल झाले, असे आपल्याला मानता येईल, असे ते म्हणाले.



रा. स्व. संघाच्या शताब्दीनिमित्त समाजाच्या विविध क्षेत्रांतील मान्यवरांसाठी '१०० वर्षांची संघयात्रा, नवे क्षितिज' या शीर्षकाखाली राजधानी दिल्लीतील विज्ञान भवनात आयोजित त्रिदिवसीय संवाद कार्यक्रमाला डॉ. भागवत संबोधित करीत होते. व्यासपीठावर सरकार्यवाह दत्तात्रेय होसबळे, उत्तरक्षेत्र संघचालक पवन जिंदल आणि दिल्ली प्रांत संघचालक डॉ. अनिल अग्रवाल उपस्थित होते.

४० हजार वर्षांपासून भारतातील, अखंड भारतातील लोकांचा डीएनए एकच आहे, याकडे लक्ष वेधत डॉ. भागवत म्हणाले की, आपली संस्कृती आणि दृष्टी एकच आहे, ती म्हणजे समन्वयाने राहण्याची. नेता, धोरण आणि पक्ष हे सगळे सहायक असते, मुख्य कार्य तर समाज परिवर्तनाचे असते, राष्ट्राच्या उन्नतीसाठी आवश्यक असलेले गुण विकसित करण्याचे असते. संघाची स्थापना आणि संघ चालवण्याचा उद्देश भारत आहे. भारत जेव्हा विश्वगुरू बनेल, तेव्हाच संघाचे कार्य सफल झाले, असे आपल्याला मानता येईल.

भारताला जगात आपले योगदान द्यायचे आणि ती वेळ आता आली आहे, असे नमूद करीत डॉ. भागवत म्हणाले की, विविधतेत एकता हीच भारताची खरी ताकद आहे. एक उदाहरण देत आपला मुद्दा स्पष्ट करताना डॉ. भागवत म्हणाले की, एका परीक्षेत चार प्रश्न आहे, त्यात दोन सोपे तर दोन कठीण आहेत. अशा वेळी आपण पहिले दोन सोपे प्रश्न सोडवायला घेऊ. त्याचप्रमाणे जे लोक स्वतःला हिंदू मानतात, त्यांचे जीवन आपल्याला आधी चांगले करायचे आहे. त्यामुळे काही कारणाने जे लोक स्वतःला हिंदू मानत नाही, ते म्हणतील, असे होऊ लागले आहे, ज्यांना आपल्या हिंदुत्वाचा विसर पडला, त्यांनाही आठवेल की असेही होईल. त्यामुळे संपूर्ण हिंदू समाजाचे संघटन आवश्यक आहे. जे स्वतःला हिंदू म्हणवतात, त्यांचे जीवन आपण चांगले केले, तर त्यापासून बाकीच्यांना प्रेरणा मिळेल. जे लोक हिंदूसमाजापासून दूर झाले, ते परत येतील. त्यामुळे हिंदू समाजाची एकजूट आवश्यक आहे. हिंदू धर्माच्या लोकांची एकजूट म्हणजे दुसऱ्या धर्माच्या लोकांचा विरोध नाही.

आपल्या ७० मिनिटांच्या भाषणात डॉ. भागवत यांनी स्वातंत्र्य आंदोलन, त्यातील संघसंस्थापक डॉ. हेडगेवार यांची भूमिका आणि संघाची स्थापना याचा सविस्तर आढावा घेतला.

दिल्ली प्रांतसंघचालक डॉ. अनिल अग्रवाल यांनी प्रास्ताविक केले. क्षेत्र कार्यवाह रोशन यांनी परिचय करून दिला. प्रारंभी भारतमातेच्या प्रतिमेला पुष्पांजली वाहण्यात आली. 'वंदेमातरम्'ने कार्यक्रमाचा प्रारंभ झाला, तर राष्ट्रगीताने समारोप. कार्यक्रमाला विविध देशांचे राजदूत, धार्मिक आणि आध्यात्मिक गुरू तसेच समाजाच्या विविध क्षेत्रांतील मान्यवर उपस्थित होते. बुधवार आणि गुरुवारी या व्याख्यानाचे पुढील पुष्प डॉ. मोहनजी भागवत गुंफणार आहेत. *(तभा वृत्तसेवा)*

### राष्ट्राच्या प्रगतीत समाजाचा सहभाग असावा

समाजातील दुर्गुण दूर केले नाही तर आमचे प्रयत्न अपयशी ठरतील, याकडे लक्ष वेधत डॉ. भागवत म्हणाले की, देशाला मोठे करायचे असेल, स्वतंत्र करायचे असेल तर नेत्यांवर वा संघटनेवर अवलंबून राहता येणार नाही. ते मदत जरूर करू शकतील, पण त्यासाठी सर्वांना कामाला लागावे लागेल. संपूर्ण समाजाने प्रयत्न केले तरच परिवर्तन येऊ शकते. आपल्या देशाला जुने वैभव मिळवून द्यायचे असेल, महान बनवायचे असेल तर समाजाचा गुणात्मक विकास झाला पाहिजे. त्याचप्रमाणे राष्ट्राच्या प्रगतीत संपूर्ण समाजाचा सहभाग असला पाहिजे.




# न्यायालय विधेयकाला मंजुरी देऊ शकत नाही

**• सरकारची कोर्टात भूमिका • राज्यपाल, राष्ट्रपतींसाठी कालमर्यादा निश्चित करणे असंवैधानिक**

**नवी दिल्ली, २६ ऑगस्ट**

राज्य विधानसभेने मंजूर केलेल्या विधेयकाला न्यायालय मंजुरी देऊ शकत नाही आणि हा अधिकार केवळ राज्यपाल अथवा राष्ट्रपतींनाच आहे. विधेयकाच्या मंजुरीसाठी राज्यपाल आणि राष्ट्रपतींसाठी कालमर्यादा निश्चित करणे असंवैधानिक असल्याचा युक्तिवाद महाराष्ट्र सरकारच्या वतीने मंगळवारी ज्येष्ठ वकील हरीश साळवे यांनी केला.

विधेयकांना मान्यता देण्यासाठी कालमर्यादा निश्चित करण्यासंदर्भात राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी मागितलेल्या सल्ल्यावर सरन्यायाधीश भूषण गवई गवई यांच्या अध्यक्षतेखालील पाच न्यायाधीशांच्या घटनापीठासमोर सुनावणी सुरू आहे. यावर महाराष्ट्र सरकारची भूमिका मांडताना वकील हरीश साळवे म्हणाले, न्यायालय राज्यपालांना विधेयकांना मान्यता देण्यास सांगणारा आदेश जारी करू शकत नाही. न्यायालय विधेयकाला मान्यता देऊ शकत नाही. विधेयकाला मान्यता देण्याचा अधिकार राज्यपाल किंवा राष्ट्रपतींनाच आहे. संविधानाच्या कलम ३६१ अंतर्गत राज्यपाल आणि राष्ट्रपतींनी विधेयकासंदर्भात घेतलेल्या निर्णयासाठी न्यायालय हस्तक्षेप करू शकत नाही. जर राज्यपाल विधेयकांवर कोणताही निर्णय घेत नाहीत, तर राज्यांनी न्यायालयात जाण्याऐवजी संवादाद्वारे तोडगा काढावा. न्यायालये सर्व समस्या सोडवू शकत नाहीत. लोकशाहीत संवादाला प्राधान्य दिले पाहिजे. ही आपली अनेक दशकांपासूनची पद्धत आहे.



**ढोल ताशाच्या गजरात बाप्पांचे आगमन...**
सोलापूर : श्री गणेश चतुर्थीच्या पूर्वसंध्येला शेळगी परिसरातील देशाभिमान मित्रपरिवार मंडळाच्या श्रीगणेशाचे ढोल-ताशाच्या गजरात आगमन झाले. (छायाचित्र : केवल तिवारी)

# स्वदेशी हा प्रत्येकाचा जीवनमंत्र असावा

**• पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे प्रतिपादन • अहमदाबादेत ई-वाहनाला दाखवला हिरवा झेंडा**

**अहमदाबाद, २६ ऑगस्ट**

स्वदेशी हा प्रत्येकाचा जीवनमंत्र असावा, असे प्रतिपादन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी मंगळवारी केले. आमच्या 'मेक इन इंडिया' उपक्रमामुळे जागतिक आणि देशांतर्गत उत्पादकांसाठी अनुकूल वातावरण झाले आहे, असे नरेंद्र मोदी म्हणाले.

माझी स्वदेशीची व्याख्या अतिशय सोपी आहे. डॉलर आहे की पौंड किंवा ते चलन काळे आहे अथवा पांढरे यापेक्षा मला कुणाचा पैसा गुंतवला जातो याची काळजी वाटते. पण, पैशाने जे काही उत्पादन केले जाते, ते माझ्या देशवासीयांच्या घामाचे असावे, असे मोदी म्हणाले. गुजरातमधील अहमदाबादजवळील हंसलपूर येथील



मारुती सुझुकीच्या कारखान्यात कंपनीचे पहिले इलेक्ट्रिक वाहन ई-व्हिटाराला हिरवा झेंडा दाखवण्यात आला. यावेळी आयोजित कार्यक्रमात ते बोलत होते.

भारतात बनवलेल्या इलेक्ट्रिक वाहनांवर जग चालेल, असा विश्वास नरेंद्र मोदी यांनी व्यक्त केला. केवळ स्वदेशी उत्पादने खरेदी करा, असे आवाहन त्यांनी लोकांना केले. गुंतवणूक कोण करे हे महत्त्वाचे नाही, तर उत्पादन बनवण्यासाठी कठोर परिश्रम भारतीयांचे असले पाहिजे हे महत्त्वाचे आहे. *(वृत्तसंस्था)*

### मारुती सुझुकी करणार ७० हजार कोटींची गुंतवणूक

जपानी वाहन निर्माता कंपनी सुझुकी मोटर कॉर्पोरेशन येत्या पाच ते सहा वर्षांत भारतात ७० हजार कोटी रुपयांची गुंतवणूक करणार आहे, अशी माहिती कंपनीचे प्रतिनिधी संचालक आणि अध्यक्ष तोशिहिरो सुझुकी यांनी मंगळवारी दिली. सुझुकीने चार दशकांपेक्षा जास्त काळ भारताच्या गतिशीलतेच्या प्रवासात अभिमानाने भागीदारी केली आहे. विकसित भारतमध्ये योगदान देण्यासाठी आम्ही वचनबद्ध असल्याचे त्यांनी सांगितले.

# २५ टक्के अतिरिक्त टॅरिफची अधिसूचना

**• अमेरिकेत भारतीय वस्तूंवर आजपासून ५० टक्के शुल्क • रशियाकडून तेल खरेदी केल्याचा दंड**

**वॉशिंग्टन, २६ ऑगस्ट**

अमेरिकेच्या सीमाशुल्क आणि सीमा संरक्षण विभागाने भारतीय उत्पादनांवर बुधवारपासून अतिरिक्त २५ टक्के आयात शुल्क लादण्याची अधिसूचना जारी केली. रशियाकडून तेल खरेदी केल्याने भारतावर दंड म्हणून अतिरिक्त शुल्क लावण्यात आले आहे आणि एकूण शुल्क ५० टक्के राहणार असल्याचे त्यात नमूद आहे.

रशियाकडून तेल खरेदी केल्याबद्दल दंड म्हणून राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी ६ ऑगस्ट रोजी शुल्क जाहीर केले. यापूर्वी व्यापार तूट लक्षात घेऊन ७ ऑगस्टपासून भारतावर २५ टक्के कर लादण्यात आला, तर दंड म्हणून अतिरिक्त २५ टक्के शुल्क बुधवारपासून लागू होणार आहे. अमेरिकेच्या धोरणात्मक मुद्यांकडे दुर्लक्ष केल्याने दंड म्हणून भारतावर शुल्क लागू होईल. *(वृत्तसंस्था)*

### झुकणार नाही : एस. जयशंकर

अमेरिकेने लादलेल्या ५० टक्के शुल्काच्या निर्णयानंतर परराष्ट्र व्यवहार मंत्री एस. जयशंकर यांनी एक्सवर लिहिलेल्या पोस्टमध्ये म्हटले की, भारत आपल्या ऊर्जा धोरणांवर आणि राष्ट्रीय हितांवर आधारित निर्णय घेत राहील.रशियाकडून तेल खरेदी केल्याबद्दल भारताला दोष देणे चुकीचे आहे, कारण इतर मोठे देशही असेच करत आहेत, परंतु त्यांच्यावर प्रश्न उपस्थित केले जात नाही. आम्ही कोणाच्याही दबावापुढे कदापि झुकणार नाही.

### पंतप्रधान मोदींची टॅरिफवर बैठक

अमेरिकेने भारतावर एकूण ५० टक्के शुल्क लादण्याची अधिसूचना जारी केल्यानंतर मंगळवारी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी मंत्रिगटाची बैठक घेतली. यावेळी उद्योग व वाणिज्य विभागाचे अधिकारी उपस्थित होते.अमेरिकन टॅरिफवर मात करणे, भारतीय निर्यातदारांना आर्थिक मदत आणि पर्यायी बाजारपेठ शोधण्याच्या मुद्यावर बैठकीत चर्चा झाल्याची माहिती सूत्रांनी दिली.




# कामगार कायद्यांतील सुधारणेस मान्यता

**●राज्य मंत्रिमंडळ बैठकीत निर्णय**
**●नियमांचे प्रारूप केंद्राकडे पाठविणार**

**मुंबई :** कामगार कायद्यांमध्ये सुधारणा करणे आणि त्यासाठी तयार करण्यात आलेल्या नियमांच्या प्रारूपाला मान्यता देण्याचा निर्णय मंगळवारी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेत झालेल्या राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीत घेण्यात आला. नियमांचे प्रारूप केंद्र सरकारच्या सहमतीसाठी पाठविण्यात येणार आहे. यात व्यावसायिक सुरक्षा व कामगारांचे आरोग्याचा समावेश आहे. केंद्राच्या कामगार कायद्यांना अनुरूप संहिता तयार करण्यात आल्या, यात महिलांच्या कामांच्या वेळा, त्यांच्या सुरक्षेचा समावेश केला आहे. याशिवाय कामगारांसाठी निवास व्यवस्था, त्यांची देखभाल दुरुस्ती, कामगारांच्या मुलांच्या शैक्षणिक सुविधा, मनोरंजनाच्या सुविधा आणि आरोग्यविषयक सुविधांचा समावेश करण्यात आला आहे. नव्या नियमांमुळे रोजगार संधीमध्ये वाढ होण्यास मदत होणार आहे.



सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.
सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/

## महत्त्वाचे...



### पुढच्या ५० वर्षांचा विचार करून शहरी विकासाचा आराखडा राबवा : मुख्यमंत्री

**मुंबई, दि.२६ ऑगस्ट-**

शहरी क्षेत्राच्या पायाभूत सुविधा विकासासाठी एकत्रित थीम, दीर्घकालीन नियोजन आणि उपलब्ध निधीचा प्रभावी वापर या सूत्राचा वापरा करा. शहरांच्या भविष्यासाठी पुढील ५० वर्षांचा विचार करून प्रकल्प राबवा, असे निर्देश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी मंगळवारी दिले. महाराष्ट्रातील शहरी भागांच्या पायाभूत विकासासाठी राज्य शासनाच्या महाराष्ट्र अर्बन इन्फ्रास्ट्रक्चर फंड अंतर्गत तयार करण्यात आलेल्या नवीन आर्थिक आराखड्यावर चर्चा करताना ते फडणवीस बोलत होते. शहरांमधील मलनिस्सारण, ड्रेनेज, घनकचरा व्यवस्थापन, पाणीपुरवठा यांसारख्या मूलभूत सुविधांसाठी फक्त आजचे नव्हे, तर पुढील पिढ्यांचा विचार करून नियोजन करा असे सांगून मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले की, पाणी, कचरा व्यवस्थापन, वाहतूक यासाठी स्वतंत्र आराखडे आणि यावर लक्ष केंद्रीत करा, निव्वळ निधी पुरवठा न करता, रिसोर्स प्लॅनिंगवर भर द्या. जेथे फंडीग गॅप आहे, तिथे पूरक व्यवस्था करून प्रकल्प साकारा, स्थानिक संस्थांना पायाभूत प्रकल्पांसाठी आर्थिक सहाय्य दिले पाहिजे आणि उभारलेल्या सुविधांचे मॉनिटरिंगही तितकेच महत्त्वाचे असल्याचे सांगून ते म्हणाले की, शहरी विकास ही केवळ इमारती उभारण्याची बाब नाही, तर ती सामाजिक आणि आर्थिक समृद्धी घडवण्याची प्रक्रिया आहे. म्हणूनच प्रत्येक प्रकल्पामागे दूरगामी विचार आणि मजबूत आर्थिक रचना असली पाहिजे. यावेळी बैठकीस जागतिक बँक टास्क फोर्सचे अबेद खालील, मित्रा संस्थेचे मुख्य कार्यकारी अधिकारी प्रवीणसिंह परदेशी, वित्त विभागाचे अपर मुख्य सचिव ओ पी गुप्ता, नगर विकासाचे अपर मुख्य सचिव असीम गुप्ता उपस्थित होते.

### बीडच्या शिरूर-गेवराई तालुक्यांना मिळणार जलसंपन्नतेची भेट

**मुंबई, दि.२६ ऑगस्ट-**

राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीत मंगळवारी बीड जिल्ह्यातील सिंदफणा नदीवरील निमगाव, ब्रम्हनाथ येळंब (ता. शिरुर कासार) व टाकळगाव (ता. गेवराई) येथील कोल्हापूर पद्धतीच्या तिन्ही बंधाऱ्यांचा विस्तार करून त्यांचे बॅरेजमध्ये रुपांतर करण्याच्या महत्त्वपूर्ण निर्णयाला मंजुरी देण्यात आली.बीड जिल्ह्यातील सिंदफणा नदीवरील निमगाव, ब्रम्हनाथ येळंब (ता. शिरुर कासार) व टाकळगाव (ता. गेवराई) येथील कोल्हापूर पद्धतीच्या तिन्ही बंधाऱ्यांचा विस्तार करून त्यांना बॅरेजमध्ये रुपांतर करण्याच्या निर्णयामुळे शिरूर - कासार व गेवराई तालुक्यातील शेतकऱ्यांना मोठा दिलासा मिळणार आहे. बॅरेज झाल्यानंतर या भागातील पाणीसाठ्यात वाढ होऊन परिसरातील विहिरी, बोअरवेलांची पाणी पातळी तसेच भूजलस्तर उंचावणार, परिणामी खरीप-रब्बी हंगामात शेतकऱ्यांच्या शेतीसाठी पाण्याची उपलब्धता वाढणार आहे.शेतकरी व नागरिकांकडून या निर्णयाचे जोरदार स्वागत होत आहे.

# जरांगेंच्या मुंबईतील आंदोलनाला उच्च न्यायालयाची नो एन्ट्री !

### जरांगे मात्र आंदोलनावर ठाम

**तभा वृत्तसेवा । जमीर काझी**
**मुंबई दि. २६ ऑगस्ट-**

राज्य सरकारचे आवाहन धुडकावून लावित ऐन गणेशोत्सवात मराठा आरक्षणाच्या मागणीसाठी मुंबईत आझाद मैदानात आंदोलनासाठी शड्डू ठोकलेल्या आंदोलक मनोज जरांगे-पाटील यांना मंगळवारी मोठा खो बसला आहे. त्यांना मुंबईत प्रवेश करण्याला उच्च न्यायालयाने मनाई केली आहे.




गणेशोत्सवात वाहतुक व्यवस्थेवर आंदोलनामुळे मोठा परिणाम होईल, असे सांगत खंडपीठाने त्यांना मुंबईत नो एन्ट्री करीत नवी मुंबईतील खारघर येथे परवानगी द्यावी निर्देश सरकारला दिले आहेत. जरांगे-पाटील मात्र आझाद मैदानात आंदोलनावर ठाम आहेत. त्यामुळे मराठा आंदोलन व सरकारमध्ये संघर्ष होण्याची शक्यता असून त्यामुळे कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होण्याची भीती व्यक्त होत आहे. आंदोलना विरोधात दाखल जन सुनावणी याचिकेवर मंगळवारी झालेल्या सुनावणीत गणेशोत्सव आणि मुंबईचे जनजीवन, वाहतूक सणासुदीच्या काळात विस्कळीत होऊ नये,याची खबरदारी सरकारने घ्यावी, असे निर्देश मुख्य न्यायाधीश आलोक आराधे आणि न्या. संदीप मारणे यांच्या खंडपीठाने दिले असून जरांगे-पाटील यांना नोटीस जारी करत पुढील ९ सप्टेंबरच्या पुढील सुनावणीत भूमिका स्पष्ट करण्याची सूचना केली आहे.

जरांगे- पाटील यांनी मराठ्यांना कुणबी म्हणून आरक्षण मिळावे, या मागणीसाठी २९ ऑगस्टपासून आंदोलन करण्याचा इशारा राज्य सरकारला दोन महिन्यापूर्वी दिला आहे. त्यासाठी राज्यभरातून समाजाचे बांधव बुधवारी सकाळपासून मुंबईकडे रवाना होणार आहेत.या आंदोलनाविरोधात एएमवाय फाऊंडेशनच्यावतीने अनिलकुमार मिश्रा यांनी मुंबई उच्च न्यायालयात याचिका दाखल केली होती. या याचिकेवर मुख्य न्यायमूर्ती आलोक आराधे आणि न्यायमूर्ती संदीप मारणे यांच्या खंडपीठापुढं सुनावणी झाली. यामध्ये या आंदोलनाचा मुंबईच्या वाहतुकीवर तसंच सणासुदीच्याकाळात संपूर्ण जीवनमानावर परिणाम होईल. त्यामुळं या मोर्चाला मुंबईत येऊ न देता वेशीवरच नवी मुंबई-खारघर इथं आंदोलनाला जागा देण्यात यावी. जेणेकरून हा मोर्चा मुंबईत येणार नाही, अशी विनंती कोर्टाकडे करण्यात आली. या सुनावणीदरम्यान याचिकाकर्त्यांनी यापूर्वी निघालेल्या या विराट मोर्चाची माहिती फोटोंसहित कोर्टापुढे सादर केली. आधीच गणेशोत्सवाचे दिवस आणि त्यात आधीच बंदोबस्तावर असलेल्या मुंबई पोलिसांवर अधिक ताण नको. त्यामुळं या आंदोलनाची मुंबईत परवानगी देऊ नका. त्याऐवजी जर आंदोलकांकडून मागणी झाली तर त्यांना नवी मुंबई- खारघर इथं उपलब्ध असलेल्या मोकळ्या मैदानात मोर्चाची परवानगी द्यावी. कायद्यानं प्रत्येकाला विरोध प्रदर्शन करण्याचा, आंदोलन करण्याचा अधिकार दिला. मात्र विरोध प्रदर्शन हे सनदशीर आणि कायदेशीर मार्गानंच व्हायला हवे, व्यवस्था किंवा सर्वसामान्य जनतेला वेठीस धरून आंदोलन होता कामा नये,असे निर्देश खंडपीठाने सरकारला दिले आहेत.

#### आरक्षणाशिवाय माघार नाही

मराठा आंदोलन मुंबई ऐवजी नवी मुंबईत खारघर किंवा अन्यत्र परवानगी देण्याची राज्य सरकारला मुभा असेल, असे निर्देश न्यायालयाने दिले असलेतरी जरांगे- पाटील हे आझाद मैदानावर आंदोलन करण्याबाबत ठाम आहेत. त्यांना गणेशोत्सव काळात मुंबईत उपोषणाला येणं टाळावे अशी विनंती मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे विशेष कार्यकारी अधिकारी राजेंद्र साबळे यांनी अंतरवाली सराटी इथे जाऊन त्यांना केली. त्यांच्यात चर्चाही झाली. मात्र मराठा समाजाला ओबीसीतून आरक्षण मिळाल्याशिवाय माघार घेणार नाही, अशी ठाम भूमिका या भेटीनंतर मनोज जरांगे-पाटील यांनी मांडली आहे.

# लंडनमधील 'महाराष्ट्र भवन'साठी ५ कोटींचा निधी

### उपमुख्यमंत्री अजित पवार यांची माहिती

**तभा वृत्तसेवा,**
**मुंबई, दि.२६ ऑगस्ट-**

लंडनमधील मराठीजनांना आपल्या हक्काचे आणि स्वतःच्या मालकीचे सांस्कृतिक भवन मिळावे, या अनेक वर्षांच्या मागणीला आता मूर्त स्वरूप मिळणार आहे. महाराष्ट्र मंडळ, लंडन या संस्थेला लंडनमधील 'चर्च ऑफ इंग्लंड'ची इमारत खरेदी करुन तेथे 'महाराष्ट्र भवन' उभारण्यासाठी ५ कोटी रुपयांचा निधी मंजूर केला आहे, अशी माहिती उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी दिली.

महाराष्ट्र मंडळ, लंडन ही भारताबाहेरील आणि युनायटेड किंगडममधील सर्वात जुन्या मराठी संस्थांपैकी एक आहे.१९३२ मध्ये महात्मा गांधींचे वैयक्तिक सचिव डॉ. एन. सी. केळकर यांनी या मंडळाची स्थापना केली. लंडन आणि आसपासच्या परिसरातील मराठी बांधवांना सामाजिक आणि सांस्कृतिक कार्यक्रमांच्या माध्यमातून एकत्र आणणे, हा या संस्थेचा



मुख्य उद्देश होता. गेल्या ९३ वर्षांपासून हे मंडळ विविध सांस्कृतिक कार्यक्रम, उत्सव आणि सामाजिक उपक्रम राबवत आहे. सध्या लंडन आणि परिसरातील सुमारे एक लाखाहून अधिक मराठी बांधव या मंडळाशी जोडले गेले आहेत. मात्र, स्थापनेपासूनच लंडनमधील महाराष्ट्र मंडळाची वास्तू भाडेतत्त्वावर होती. त्यामुळे मराठीजनांसाठी स्वतःच्या मालकीचे भवन असावे, अशी तेथील मराठीजनांची मागणी होती. गेल्या आठवड्यातच मंडळाच्या प्रतिनिधींनी पुण्यात उपमुख्यमंत्री अजित पवार यांची भेट घेऊन 'महाराष्ट्र भवन' उभारण्यासाठी महाराष्ट्र शासनाकडून आर्थिक सहकार्याची विनंती केली होती. या मागणीला उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी तात्काळ सकारात्मक प्रतिसाद दिला आणि प्रस्ताव सादर करण्याचे निर्देश दिले होते. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या मान्यतेने राज्य शासनाने या संस्थेला ५ कोटी रुपयांचा निधी मंजूर केला आहे. हा निधी 'महाराष्ट्र भवन' उभारण्यासाठी वापरला जाणार असून, यामुळे मराठीजनांना लंडनमध्ये स्वतःच्या मालकीचे सांस्कृतिक आणि सामाजिक केंद्र मिळणार आहे.

'महाराष्ट्र भवन' हे युनायटेड किंगडम आणि महाराष्ट्र शासन यांच्यातील द्विपक्षीय संबंध मजबूत करण्यासाठी महत्त्वपूर्ण व्यासपीठ ठरेल, तसेच या भवनामुळे मराठी साहित्य, नृत्य, संगीत आणि सण-उत्सवांच्या माध्यमातून भारत आणि युनायटेड किंगडम यांच्यात सांस्कृतिक आदान-प्रदानाला चालना मिळेल. मराठी भाषेच्या प्रचार आणि प्रसारासाठी भाषा वर्ग, कार्यशाळा आणि आंतरराष्ट्रीय परिषदांचे आयोजन करता येईल. असा विश्वासही पवार यांनी व्यक्त केला आहे.

### अभियांत्रिकी, वैद्यकीय, व्यावसायिक प्रवेशसाठी

## एसईबीसी-ओबीसी प्रमाणपत्र करिता 3 महिने मुदतवाढ

**तभा वृत्तसेवा,**
**मुंबई, दि.२६ ऑगस्ट-**

शैक्षणिक वर्ष २०२४-२५ या शैक्षणिक वर्षातील विविध शैक्षणिक संस्थामधील व्यावसायिक अभ्यासक्रमांच्या प्रवेशांसाठी (अभियांत्रिकी, वैद्यकीय आणि इतर व्यावसायिक अभ्यासक्रमांसहित) एसईबीसी व ओबीसी प्रवर्गातील विद्यार्थ्यांना जात वैधता प्रमाणपत्र सादर करण्यासाठी पुन्हा तीन महिन्यांची मुदतवाढ ली आहे. अशी माहिती उच्च व तंत्र शिक्षणमंत्री चंद्रकांत पाटील यांनी दिली.

विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होऊ नये, यासाठी यापूर्वी प्रवेश घेतल्यानंतर सुरुवातीला सहा महिने व त्यानंतरतीन महिन्यांची मुदतवाढ देण्यात आली होती. तरीही काही विद्यार्थ्यांनी जात वैधता प्रमाणपत्र सादर करण्यास अडचणी येत असल्याच्या तक्रारी केल्या होत्या.त्यांच्या हिताचा विचार करून पुन्हा तीन महिन्यांची मुदतवाढ देण्याचा निर्णय घेतला आहे. ही मुदतवाढ शैक्षणिक वर्ष २०२४-२५ मध्ये प्रवेश निश्चित झालेले आहेत, परंतु ठराविक कालावधीत त्यांनी जात वैधता प्रमाणपत्र सादर केलेले नाही आणि दिलेल्या वाढीव कालावधीतही जात वैधता प्रमाणपत्र सादर करण्यात आले नाही.या विद्यार्थ्यांसाठी लागू असेल.

# शासनाच्या आदेशान्वये सोलापूर जिल्हा प्रशासनात १५० दिवसांचा उद्दिष्ट कार्यक्रम सुरू

### आरडीसी पाटील यांची माहिती

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २६ ऑगस्ट-**

१०० दिवसाच्या यशस्वी मोहिमेनंतर आता १५० दिवसांचा विशेष कार्यक्रम सर्वच जिल्हा प्रशासनाला दिला असून, हा उपक्रम सोलापूर जिल्हा प्रशासनात सुरू झाल्याची माहिती आरडीसी अभिजित पाटील यांनी माध्यमांशी बोलताना आज (दि. ३०) दिली.

विकसित महाराष्ट्र, ई-गव्हर्नन्स विषयक सुधारणा आणि सेवा विषयक प्रशासकीय सुधारणा या तीन बाबींवर आधारित १५० दिवसांचा दुसरा कृती आराखडा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी जाहीर केला आहे. १०० दिवसांच्या प्रशासकीय सुधारणा आणि धोरणात्मक बाबींवर आधारित कार्यक्रमास अतिशय चांगला प्रतिसाद मिळाला. राज्यातील १२




हजार ५०० शासकीय कार्यालये या कार्यक्रमात सहभागी झाली होती तर मंत्रालयातील ४८ विभाग या कार्यक्रमात सहभागी झाले. या विभागातील ९०२ विषयांवर धोरणात्मक निर्णय घेणे अपेक्षित असताना ७०६ विषयांवर आधारित निर्णय घेऊन आवश्यक बदल करण्यात आले. यामध्ये काही धोरणात्मक बदल करण्यात आले तर काही प्रक्रियात्मक बदल करण्यात आले. या कार्यक्रमास मिळालेल्या चांगल्या प्रतिसादामुळे १५० दिवसांच्या कार्यक्रम जाहीर केला असून, जिल्ह्यातही हा १५० दिवसांचा कार्यक्रम सुरू झाला आहे. मुख्यमंत्र्यांनी राज्यातील सर्व विभागांना दीडशे दिवसांचा उद्दिष्ट कार्यक्रम दिला आहे. या उद्दिष्टपूर्ती कार्यक्रमानंतरच राज्यात व्यापक मेगा भरती प्रक्रिया सुरू करण्यात येईल. दीडशे दिवसांच्या या कार्यक्रमात आकृतीबंधातील सुधारणा, नियुक्ती नियमांचं अद्ययावतीकरण आणि अनुकंपा तत्वावरील शंभर टक्के भरती पूर्ण करणे यासारखी महत्त्वाची उद्दिष्टं निश्चित करण्यात आली आहेत. ही उद्दिष्टं पूर्ण झाल्यानंतरच रिक्त पदांची अचूक माहिती समोर येईल. त्यानंतरच राज्य सरकार मेगा भरतीसाठी पुढील पाऊल उचलेल. यामुळे प्रशासकीय कामकाजात सुसूत्रता येऊन पारदर्शकपणे भरती प्रक्रिया राबवता येणार आहे. सध्या विविध विभागांमध्ये मोठ्या संख्येने पदे रिक्त असल्याने प्रशासकीय कामकाजावर परिणाम होत आहे. ही मेगा भरती प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर प्रशासकीय यंत्रणा अधिक सक्षम होईल.

# जिल्ह्यात डीजे डॉल्बी लेझर लाईटवर बंदी आणा

### जिल्हाधिकारी यांच्यासह मुख्यमंत्र्याकडे निवेदन

**तभा वृत्तसेवा,**
**अक्कलकोट, दि. २६ ऑगस्ट-**

संपूर्ण सोलापूर जिल्ह्यात जीवघेणी डीजे, डॉल्बी, लेझर लाईट वर आजीवन कायमस्वरूपी बंदी आणावी अश्या मागणीचे निवेदन स्वराज्य माहिती अधिकार संघटनेचे जिल्हा अध्यक्ष चंद्रकांत वेदपाठक यांच्या शिष्टमंडळाने मुख्यमंत्री, गृहमंत्री, जिल्हाधिकारी, ग्रामीण पोलीस प्रमुख व शहर पोलीस आयुक्त यांना दिलेल्या निवेदनात मागणी केली आहे.

स्वराज्य पोलीस मित्र, पत्रकार संरक्षण आणि माहिती अधिकार संघटनेचे संस्थापक तथा राष्ट्रीय अध्यक्ष दीपक कांबळे, संस्थापक तथा राष्ट्रीय महासचिव कमलेश शेवाळे, विश्वस्त तथा महाराष्ट्र प्रदेश अध्यक्षा. धनश्री उत्पात यांच्या नेतृत्वाखाली व सर्व विश्वस्त व सर्व संचालक यांच्या मार्गदर्शनाखाली हे निवेदन देण्यात आले.

डीजे व डॉल्बीमुळे अनेकांना आपले



जीव गमावावे लागले आहे तर लेझर लाईट मुळे अनेकांना अंधत्व आल्यामुळे त्याचे जीवन अंधकारमय झाले आहे अश्या डीजे, डॉल्बी व लेझर लाईट वापरास आजीवन कायम स्वरूपी बंदी आणावी असे लेखी निवेदन स्वराज्य माहिती अधिकार संघटना जिल्हा सोलापूरच्या वतीने सोलापूर चे जिल्हाधिकारी यांच्या मार्फत मुख्यमंत्री व गृहमंत्री देवेंद्र फडणवीस यांना निवेदन देण्यात आले आहे. सोलापूरचे जिल्हाधिकारी, ग्रामीण पोलीस अधीक्षक, शहर पोलीस आयुक्त यांना ही या निवेदनाद्वारे या बंदीचे मागणी केली आहे. याप्रसंगी महाराष्ट्र प्रदेश प्रसिद्धी प्रमुख उमेश काशीकर, सदस्य अजित सवाई, विष्णू पंपटवार, राजकुमार परदेशी आदी उपस्थित होते.

# पारंपारिक वाद्यांचा वापर करत गणेशोत्सव साजरा करा

### आ. सचिन कल्याणशेट्टी यांचे आवाहन

### अक्कलकोटमध्ये शांतता समितीची बैठक

**तभा वृत्तसेवा,**
**अक्कलकोट दि २६ ऑगस्ट-**

यंदाच्या वर्षापासून महाराष्ट्र शासनाने गणेशोत्सव हा राज्यउत्सव म्हणून साजरा करण्यात येणार आहे. त्यानुसार उत्सवा दरम्यान पारंपारिक वाद्याचा वापर करत डीजे मुक्त गणेशोत्सव साजरा करत उच्च न्यायालयाच्या आदेशाचे पालन करा, असे आवाहन अक्कलकोटचे आमदार सचिन कल्याणशेट्टी यांनी केले. आमदार कल्याणशेट्टी यांनी आवाहन करताच उपस्थित श्री गणेश मंडळाच्या पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी देखील होकार दर्शविला आहे.

सोमवारी श्री क्षेत्र अक्कलकोट येथील श्री कमलाराजे चौकातील नगरपरिषदेच्या प्रियदर्शनी मंगल कार्यालयात अक्कलकोट



उपविभागीय पोलीस अधिकारी कार्यालया अंतर्गत अक्कलकोट उत्तर-दक्षिण, दक्षिण सोलापूर तालुक्यातील वळसंग पोलीस ठाणे अंतर्गत अगामी श्री गणेशोत्सव व ईद-ए-मिलाद या सणांच्या पार्श्वभूमीवर आयोजित शांतता समितीच्या बैठकीत आमदार कल्याणशेट्टी हे बोलत होते. यावेळी व्यासपीठावर सोलापूर ग्रामीण चे पोलीस अधीक्षक अतुल कुलकर्णी उपस्थित होते. प्रारंभी उपविभागीय पोलीस अधिकारी विलासराव यामावर यांनी या प्रसंगी प्रास्तविकातुन उपस्थित श्री गणेशमंडळ पदाधिकाऱ्यांना महत्वपूर्ण सूचना देऊन बैठकीचा हेतू स्पष्ट केले.

या प्रसंगी व्यासपीठावर या बैठकीस तहसीलदार विनायक मगर पोलीस निरीक्षक राजेंद्र टाकणे, पोलीस निरीक्षक सुरेश चिल्लावार, श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळाचे कार्यकारी अध्यक्ष अमोलराजे जनमेजयराजे भोसले, नगर नगरपालिकेचे कार्यालय अधीक्षक शैलेश बिराजदार महावितरणचे अभियंता राजू आडम, स.पो नि. निलेश बागाव, वळसंग पोलीस ठाण्याचे स.पो.नि. अनिल सनगले हे उपस्थित होते. पोलीस अधीक्षक अतुल कुलकर्णी यांनी श्री गणेशोत्सव व्यवस्थित पार पडण्यासाठी पोलीस यंत्रणा सज्ज असून केवळ पोलिसांवर भार न टाकता गावापातळीवरील स्थानिक सर्वपक्षीय नेते व पदाधिकाऱ्यांनी देखील पुढाकार घेऊन हे दोन्ही उत्सव शांततेत व कायद्याच्या चौकटीत साजरे होण्यासाठी सहकार्य करण्याची अपेक्षा व्यक्त केली. जिल्हा विशेष शाखेचे पोलीस निरीक्षक नामदेव शिंदे यांनी गणेशोत्सवातील नियमावली व कायद्यांची माहिती दिली.

यावेळी राष्ट्रवादीचे तालुकाध्यक्ष दिलीप सिद्धे, मुस्लिम समाजाच्या वतीने शुकूर शेख, चुंगी चे बालाजी माळगे, प्रा. राहुल रुही आदींनी मनोगत व्यक्त केले. काँग्रेसचे तालुकाध्यक्ष मल्लिकार्जुन पाटील, माजी नगरसेवक मिलन कल्याणशेट्टी, शिवसेना तालुकाप्रमुख संजय देशमुख, आरपीआय तालुकाध्यक्ष अविनाश मडीखांबे,भाजपा नेते महेश हिंडोळे,जेष्ठ नेते अश्पाक बळोरगी,दयानंद बिडवे,ननू कोरबू,फारूक बबर्ची, बुडन तांबोळी, मनसेचे मल्लिनाथ पाटील आदीसह गणेशउत्सव व ईद उत्सव समितीचे पदाधिकारी व पोलीस पाटील मोठया संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. प्रकाश सुरवसे यांनी केले तर स. पो. नि. वैभव स्वामी यांनी उपस्थिताना नो डी. जे. नो डॉल्बी ची शपथ देऊन आभार मानले.

#### विशेष प्रमाणपत्र देऊन सत्कार

या बैठकीत श्री. स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळाच्या वतीने गत आषाढी वारीच्या काळात तंदुरुस्त बंदोबस्त अंतर्गत पोलीस बांधवांकारिता अन्नधान्य, भाजीपाला, फळे, दूध, दुग्धजन्य पदार्थ व भोजनव्यवस्थेकरिता सर्व सुविधा साहित्य उपलब्ध करून दिल्याबद्दल आमदार सचिन कल्याणशेट्टी व पोलीस अधीक्षक अतुल कुलकर्णी यांच्या हस्ते प्रमाणपत्र देऊन श्री स्वामी समर्थ मंडळाचे कार्यकारी अध्यक्ष अमोलराजे जनमेजयराजे भोसले यांचा सत्कार करण्यात आला.

# नेत्रदानाचा संकल्प; एक प्रेरणादायी उदाहरण

### कुटुंबियांना सन्मानपत्र देत केला सत्कार

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २६ ऑगस्ट-**

जयप्रकाश इप्पलपल्ली यांची धर्मपत्नी स्व. पुष्पावती इप्पलपल्ली यांनी नेत्रदान करून समाजासमोर एक प्रेरणादायी उदाहरण ठेवले आहे. मृत्यूनंतरही आपल्या डोळ्यांतून प्रकाश देत राहावे, हा त्यांनी केलेला निर्णय आज अनेक गरजूंसाठी जीवनदायी ठरला आहे.

डॉ. वैशंपायन स्मृती शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व श्री छत्रपती शिवाजी महाराज सर्वोपचार रुग्णालय, सोलापूर यांच्या वतीने जयप्रकाश इप्पलपल्ली यांचा सत्कार करून त्यांना सन्मानपत्र प्रदान देण्यात आले. स्व. पुष्पावती इप्पलपल्ली आता आपल्या सोबत



नसल्या तरी त्यांच्या डोळ्यांमुळे दोन गरजू रुग्णांच्या आयुष्यात नवा प्रकाश उजळला आहे. ''जग सोडून गेल्यानंतरही डोळे बोलतात, मृत्यूनंतरही इतरांना जग दाखवता येते'', याचे हे सर्वोत्तम उदाहरण ठरले आहे. या उदात्त कार्यामध्ये इप्पलपल्ली कुटुंबियांचा सहकार्याचा सहभाग लक्षणीय आहे. त्यांनी दाखविलेली सामाजिक बांधिलकी, धाडस आणि संवेदनशीलता यांचे वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय प्रशासनाकडून विशेष कौतुक करण्यात आले.


रालोआचे उपराष्ट्रपती पदाचे उमेदवार सी. पी. राधाकृष्णन् यांनी मुंबई येथे मंगळवारी स्वातंत्र्यवीर सावरकर यांना आदरांजली अर्पण केली

# जम्मूच्या दोडामध्ये ढगफुटी

## चार जण ठार

### १० पेक्षा अधिक घरे गेली वाहून | २५ नागरिक बेपत्ता | जम्मू-श्रीनगर राष्ट्रीय महामार्ग बंद | जनजीवन विस्कळीत

◆ **जम्मू, २६ ऑगस्ट**

जम्मू-काश्मीरच्या दोडा जिल्ह्यातील थाथरी भागात ढगफुटीमुळे निवासी भागात पुराचे पाणी शिरले. यात दहापेक्षा अधिक घरे वाहून गेली असून, पाच नागरिकांचा पुरात वाहून मृत्यू झाला. २५ पेक्षा अधिक जण बेपत्ता असून, एनडीआरएफ आणि लष्कराकडून बचावकार्य सुरू करण्यात आले. भूस्खलन आणि पुरामुळे जम्मू-श्रीनगर राष्ट्रीय महामार्ग वाहतुकीसाठी बंद करण्यात आला, अनेक भागांचा संपर्क तुटल्याने जनजीवन विस्कळीत झाल्याची माहिती राज्य आपत्ती व्यवस्थापन विभागाने दिली आहे.



जम्मूच्या आपत्ती व्यवस्थापन विभागाचे उपायुक्त हरविंदर सिंग यांनी सांगितले की, डोडा आणि आसपासच्या भागात २४ तासांपासून मुसळधार पाऊस सुरू असून, मंगळवारी पहाटे ५ वाजताच्या सुमारास थाथरी भागात ढगफुटी झाली. डोंगरावरून मोठ्या प्रमाणात पाण्याचा लोंढा आला आणि निवासी भागात पाणी शिरले. यात दहापेक्षा अधिक घरे वाहून गेली. भूस्खलन आणि पुरात वाहून गेल्याने चार नागरिक ठार झाले, तर २५ पेक्षा अधिक जण बेपत्ता आहे. त्यांच्या शोधासाठी एनडीआरएफचे पथक मोहीम राबवत आहे. नागरिकांना सुरक्षित स्थळी पोहोचविण्यासाठी लष्कराची मदत घेतली जात आहे. आतापर्यंत दोन हजार नागरिकांना सुरक्षित स्थळी हलविण्यात आले. चिनाब नदीशी जोडलेल्या भागात राष्ट्रीय महामार्ग २४४ वाहून गेल्याने वाहतूक बंद करण्यात आली. सध्या बाधित भागात मदत आणि बचाव कार्य वेगाने सुरू आहे.

**मदतकार्यात अडचणी**

ढगफुटीच्या घटनेनंतर परिसरात पूरसदृश परिस्थिती झाली आहे. दोडाच्या मार्गावर अनेक झाडे कोसळली आणि भूस्खलन झाल्याने ग्रामीण भागाशी संपर्क तुटला आहे. पर्यायाने मदतकार्यात अडचणी येत आहे. ◂(वृत्तसंस्था)

### पुरात अडकलेले आठ जण बचावले

भालेसाच्या चारवा परिसरात पूर आला आहे, तथापि या भागात कोणतीही जीवितहानी झाली नाही. उधमपूर जिल्ह्यातील बसंतगडच्या लालोन गाला येथे बग्गन नदीला आलेल्या पुरात गुरे चारायला गेलेले ८ लोक अडकले होते, त्यांना स्थानिक प्रशासनाने सुखरूप बाहेर काढले. परिसरातील नद्या दुथडी भरून वाहत आहेत आणि पाणी बाजारपेठांमध्ये शिरले आहे. अशा परिस्थितीत कोणताही अपघात टाळता यावा म्हणून अनेक रस्ते बंद करावे लागले. ■

### हिमाचल-उत्तराखंडमध्ये पावसाचा कहर

हिमाचल प्रदेश, जम्मू-काश्मीर आणि उत्तराखंडमध्ये मुसळधार पाऊस, पूर आणि भूस्खलनामुळे जनजीवन विस्कळीत झाले आहे. हिमाचलमध्ये मणिमहेश यात्रेवर गेलेल्या तीन यात्रेकरूंचा ऑक्सिजनअभावी मृत्यू झाला, तर शेकडो लोक अडकले आहेत. उत्तराखंडमध्येही पूरस्थिती बिकट झाली आहे आणि अनेक महत्त्वाचे रस्ते आणि महामार्ग भूस्खलनामुळे बंद आहेत. ■

# अमेरिकेच्या शुल्कामुळे कामगार आधारित क्षेत्राला फटका

## कापड, रत्ने-दागिने, कोळंबी, कार्पेट, फर्निचर उत्पादनांची मागणी घटली

◆ **नवी दिल्ली, २६ ऑगस्ट**

अमेरिकन सरकारने भारतासाठी २५ टक्के अतिरिक्त शुल्क लागू करण्याची अधिसूचना सोमवारी जारी केल्याने एकूण आयात शुल्क ५० टक्क्यांवर पोहोचले आहे. यामुळे भारतातून अमेरिकेत निर्यात होणाऱ्या कापड, रत्ने-दागिने, कोळंबी कार्पेट आणि फर्निचर व्यवसायावर सर्वाधिक परिणाम झाला आहे.



उपरोक्त वस्तूंची भारतातून होणारी मागणी थांबली असून, निर्यातीला मोठा फटका बसणार असल्याचे एईपीसी अर्थात् अपेरल एक्सपोर्ट प्रमोशन कौन्सिलचे सरचिटणीस मिथिलेश्वर ठाकूर यांनी सांगितले. अमेरिकेत निर्यात होणाऱ्या भारतीय वस्तूंवर ५० टक्के शुल्क २७ ऑगस्टपासून लागणार आहे. आतापर्यंत भारतीय निर्यातीवर २५ टक्के शुल्क लागू होते.

अतिरिक्त शुल्क लादल्यामुळे भारतीय वस्तूंचे दर अमेरिकेत गगनाला भिडले आहे, पर्यायाने तेथील व्यवसायिकांनी भारतीय वस्तूंची मागणी थांबवली आहे. या निर्णयाचा कोळंबी, तयार कपडे, चामडे, रत्ने आणि दागिने यासारख्या कामगार आधारित क्षेत्रांवर मोठा परिणाम होण्याची शक्यता मिथिलेश्वर ठाकूर यांनी व्यक्त केली. भारत अमेरिकेला एकूण ८६.५ अब्ज डॉलर्सची निर्यात करतो. यापैकी ६० अब्ज डॉलर्सपेक्षा जास्त किमतीच्या वस्तू आता ५० टक्के शुल्काच्या कक्षेत येतील. विशेष असे की, फार्मा, इलेक्ट्रॉनिक्स आणि पेट्रोलियम उत्पादने यासारख्या क्षेत्रांवर शुल्क आकारले जाणार नाही. ◂(वृत्तसंस्था)

### निर्यातदारांची चिंता काय?

ठाकूर म्हणाले, अमेरिकेन लादलेल्या शुल्काचा भारताच्या १०.३ अब्ज डॉलर्सच्या कापड निर्यातीवर थेट परिणाम होईल. भारतीय कापड आता बांगलादेश, व्हिएतनाम आणि श्रीलंका यासारख्या देशांपेक्षा ३० टक्क्यापर्यंत महाग होतील. ही तफावत भरून काढणे अशक्य आहे. अनेक कंपन्यांना उत्पादन थांबवावे लागेल आणि कर्मचाऱ्यांना कामावरून काढण्याचा निर्णय त्यांना घ्यावा लागेल. ■

### कामगारांची कपात, निर्यात ४३ टक्क्यांनी घटणार

रत्ने आणि दागिने व्यवसायाशी संबंधित एका निर्यातदाराने सांगितले की, अमेरिका ही आमची सर्वांत मोठी बाजारपेठ आहे. मात्र, ५० टक्के शुल्कामुळे कामगार कपात केल्याशिवाय मार्ग नाही. जुलैमध्येच अनेक कंपन्यांनी शुल्क वाढण्यापूर्वी अतिरिक्त निर्यात पाठवली. शुल्कवाढीमुळे भारताची अमेरिकेला होणारी निर्यात ४३ टक्के कमी होऊन ४९.६ अब्ज डॉलर्सवर येऊ शकते. ■

### द्विपक्षीय करारातूनच निघणार मार्ग

भारत आणि अमेरिका यांच्यात प्रस्तावित द्विपक्षीय व्यापार करारवर चर्चा सुरू आहे, ज्याचा उद्देश सध्याचा १९१ अब्ज डॉलर्सचा द्विपक्षीय व्यापार ५०० अब्ज डॉलर्सपर्यंत नेणे आहे. दोन्ही देशात करारावर सहमती होईपर्यंत शुल्कातून दिलासा मिळणार नसल्याचे तज्ज्ञांचे म्हणणे आहे. ■

# आपचे सौरभ भारद्वाज यांच्यावर ईडीची कारवाई

### हेल्थ इन्फ्रा घोटाळा प्रकरण

◆ **नवी दिल्ली, २६ ऑगस्ट**

मागील आप सरकारच्या काळात आरोग्य पायाभूत सुविधा प्रकल्पांमध्ये झालेल्या कथित घोटाळ्याशी संबंधित मनी लॉण्ड्रिंग चौकशीचा भाग म्हणून अंमलबजावणी संचालनालयाने मंगळवारी माजी मंत्री सौरभ भारद्वाज आणि इतरांच्या घरांवर छापेमारी करण्यात आली, असे सूत्राने सांगितले.

बेकायदेशीर सावकारी प्रतिबंधक कायद्याअंतर्गत राष्ट्रीय राजधानी क्षेत्रातील काही खाजगी कंत्राटदार आणि व्यावसायिक स्थावर मालमत्ता विकसकांसह १३ ठिकाणांवर छापेमारी करण्यात आल्याचे अधिकाऱ्यांनी सांगितले.

दिल्लीतील आप युनिटचे प्रमुख आणि त्यांच्या पक्षाचे राष्ट्रीय प्रवक्ते भारद्वाज यांच्याविरुद्ध ईडीची चौकशी जूनमध्ये दिल्लीच्या भ्रष्टाचार विरोधी शाखेने नोंदवलेल्या एफआयआरवरून सुरू झाली आहे. मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल यांच्या नेतृत्वाखालील आप सरकारने आरोग्य पायाभूत सुविधा प्रकल्पांमध्ये भ्रष्टाचार केल्याच्या आरोपाखाली एसीबीने भारद्वाज, त्यांचे पक्षाचे सहकारी आणि माजी आरोग्य मंत्री सत्येंद्र जैन, खाजगी कंत्राटदार आणि अज्ञात सरकारी अधिकाऱ्यांवर गुन्हा दाखल केला आहे.

एसीबीच्या एफआयआर दाखल केल्यानंतर, आपने आपल्या नेत्यांना बदनाम करण्यासाठी तपास यंत्रणांचा उघड गैरवापर केल्याचा आरोप केला आहे. एसीबीच्या तक्रारीत प्रकल्प बजेटमध्ये पद्धतशीरपणे फेरफार, सार्वजनिक निधीचा गैरवापर आणि खाजगी कंत्राटदारांशी संगनमत असल्याचा आरोप करण्यात आला आहे. ◂(वृत्तसंस्था)

# चीनवर लादणार २०० टक्के शुल्क

### डोनाल्ड ट्रम्प यांचा इशारा | अर्थव्यवस्था उद्ध्वस्त करणार

◆ **वॉशिंग्टन, २६ ऑगस्ट**

माझ्याकडे काही हुकुमाचे पत्ते आहे, परंतु मला ते सध्या बाहेर काढायचे नाहीत. अमेरिकेला दुर्मिळ खनिजांचा पुरवठा करावाच लागेल, अन्यथा चीनवर २०० टक्के आयात शुल्क लादणार असल्याचा इशारा अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी सोमवारी प्रसार माध्यमांशी संवाद साधताना दिला.



ट्रम्प म्हणाले, चीन व अमेरिकेची चांगली मैत्री आहे. ही मैत्री पुढे जावी अशी माझी अपेक्षा आहे. मला माहिती आहे की, त्यांच्याकडे काही चांगले पत्ते आहे, परंतु, आपल्याकडे हुकुमाचे पत्ते आहेत. मी ते बाहेर काढल्यास चीनची अर्थव्यवस्था उद्ध्वस्त झाल्याशिवाय राहणार नाही. दुर्मिळ खनिजांचा पुरवठा सुरळीत करण्यास नकार दिल्यास चीनवर आम्ही २०० टक्के शुल्क लादण्याचा निर्णय घेणार आहोत. भारताची रशियाकडून तेल खरेदी सुरूच असल्याने त्यांच्यावर ५० टक्के शुल्क लादण्याचा निर्णय घेतला आहे. आम्ही त्यांच्याशी व्यापारी करारासाठीच्या वाटघाटी बंद केल्या आहे. रशियाकडून तेल खरेदी बंद केल्याशिवाय व्यापारासंदर्भात भारतासोबत चर्चा होणार नाही.

दरम्यान रशियाकडून मोठ्या प्रमाणात तेल खरेदी करणाऱ्या चीनबाबत अमेरिका मवाळ धोरण अवलंबत आहे. चीन हा रशियन तेलाचा सर्वांत मोठा ग्राहक असतानादेखील ट्रम्प यांनी आक्षेप घेतलेला नाही.

**किम जोंग यांची भेट घेणार**

ट्रम्प म्हणाले, यावर्षीच्या अखेरीस उत्तर कोरियाचे नेते किम जोंग उन यांना मी भेटणार आहे. उत्तर कोरियाच्या नेत्याशी माझे खूप चांगले संबंध आहेत. मी त्यांच्यासोबत बराच वेळ घालवला आहे. मला वाटते की त्यांच्या देशात अफाट शक्यता आहेत. अमेरिका आणि उत्तर कोरियात द्विपक्षीय संबंध बळकट व्हावे अशी माझी इच्छा आहे. त्यासंदर्भात मी लवकरच किम जोंग यांची भेट घेईल. ◂(वृत्तसंस्था)


## ओढ्यात बुडून तीन मुलांसह एकाचा मृत्यू

◆ **बिलासपूर, २६ ऑगस्ट**

छत्तीसगडच्या बिलासपूर जिल्ह्यात अचानक झालेल्या मुसळधार पावसामुळे ओढ्यात वाहून गेल्याने तीन मुले आणि एक पुरुष बुडाल्याचे पोलिसांनी मंगळवारी सांगितले. सोमवारी सायंकाळी बेलगहना पोलिस चौकी हद्दीतील भानवरटंक येथील मढी माता मंदिराजवळ ही घटना घडली.

पीडितांसह काही लोकांचा एक गट त्या ठिकाणी गेला होता, असे चौकीचे प्रमुख राज सिंह यांनी सांगितले. प्राथमिक माहितीनुसार, बालोदाबाजार-भाटापारा आणि बिलासपूर जिल्ह्यातील एका कुटुंबातील सुमारे ४० जण आणि त्यांचे मित्र बसने मंदिरात दर्शनासाठी आले होते. त्या ठिकाणाला भेट दिल्यानंतर, ते त्यांच्या बसकडे जात होते. मुसळधार पावसामुळे, जवळच्या डोंगरांमधून पाणी त्यांच्या मार्गावर असलेल्या ओढ्यात वेगाने शिरले. जोरदार प्रवाहात हे चौघे वाहून गेले, असे सिंह म्हणाले.

सूचना मिळाल्यानंतर, राज्य आपत्ती प्रतिसाद दल, पोलिस आणि महसूल अधिकाऱ्यांच्या पथकाने सायंकाळी ६ वाजता बचाव कार्य सुरू केले. रात्री उशिरा मुलांचे मृतदेह आढळले, तर मंगळवारी सकाळी त्या पुरुषाचा मृतदेह घटनास्थळापासून काही अंतरावर सापडला, असे अधिकाऱ्याने सांगितले. ◂(वृत्तसंस्था)


केंद्रीय मंत्री किरेन रिजिजू यांच्या ताफ्यासमोरून जाणारे वाहन मंगळवारी लडाखमधील एका नदीत कोसळले. वाहन कोसळताच चालक व त्याचा सहकाऱ्याने वाहनाबाहेर येत मदतीसाठी विनंती केली. रिजिजू यांनी पुढाकार घेत दोघांनाही बाहेर काढले

# वैष्णोदेवी यात्रा मार्गावर भूस्खलन; पाच ठार

### १४ जण जखमी

◆ **रियासी, २६ ऑगस्ट**

जम्मू-काश्मीरमधील रियासी जिल्ह्यातील माता वैष्णोदेवी मंदिर मार्गावर भूस्खलन झाले आहे. इंद्रप्रस्थ भोजनालयाजवळ हे भूस्खलन झाले यात पाच जण ठार, तर १४ जण जखमी झाल आहेत.

मिळालेल्या माहितीनुसार, या अपघातानंतर वैष्णोदेवी यात्रा थांबवण्यात आली आहे. या घटनेत एका भाविकाचा मृत्यू झाला, तर एक भाविक गंभीर आहे. घटनेची माहिती श्री माता वैष्णोदेवी तीर्थ मंडळाने त्यांच्या अधिकृत 'एक्स'वर माहिती दिली आहे. अर्धकुवारी येथील इंद्रप्रस्थ भोजनालयाजवळ भूस्खलन झाले. आवश्यक मनुष्यबळ आणि यंत्रसामग्रीसह बचाव कार्य सुरू आहे, अशी माहिती श्री माता वैष्णोदेवी तीर्थ मंडळाने 'एक्स'वर दिली.

माता वैष्णोदेवी मार्गावरील अर्धकुवारी येथील भोजनालयाजवळ जेव्हा भूस्खलन झाले तेव्हा १२ ते १५ प्रवासी घटनास्थळी होते. यात्रा मार्गात भूस्खलन झाल्याच्या घटनेनंतर प्रशासनाने भाविकांना काळजी घेण्याचे आवाहन केले आहे. दुर्घटना घडल्यानंतर प्रशासने मार्ग बंद केला. मार्गावरील मलबा तातडीने उचलण्याचा निर्देश अधिकाऱ्यांना देण्यात आला आहे. या घटनेचा व्हिडीओ समोर आला असून, यात वैष्णो देवी मार्गावर मातीचा ढीग पडल्याचे दिसत आहे. दरड मार्गावरील छतावर कोसळली. त्यामुळे छताचेही मोठे नुकसान झाले आहे. व्हिडीओमध्ये मार्ग बंद झाल्याचे दिसत आहे. ◂(वृत्तसंस्था)

# मणिपूरमध्ये तीन बंडखोरांना अटक


◆ **इम्फाळ, २६ ऑगस्ट**

मणिपूरच्या इम्फाळ पूर्व आणि पश्चिम जिल्ह्यांमध्ये सुरक्षा दलांनी तीन प्रतिबंधित संघटनांशी संबंधित तीन बंडखोरांना अटक केली. रविवारी इम्फाळ पश्चिम जिल्ह्यातील ताओथोंग खुनौ भागातून बंदी घातलेल्या कांग्लेईपाक कम्युनिस्ट पार्टीच्या एका सक्रिय कॅडरला अटक करण्यात आली.

ओइनम सोमेनचंद्र सिंह असे या बंडखोराचे नाव असून, तो दुकाने आणि सामान्य लोकांकडून खंडणी वसूल करण्यात सहभागी होता. त्याच्या ताब्यातून एक मॅग्झिनसह एक पिस्तूल जप्त करण्यात आले, असे पोलिसांनी निवेदनात म्हटले आहे. रविवारी इम्फाळ पूर्व जिल्ह्यातील हुईकाप मखा लीकाई येथून प्रतिबंधित पीपल्स लिबरेशन आर्मीशी संबंधित एका बंडखोराला अटक करण्यात आली. त्याचे नाव फंजौबाम रामानंद सिंह असल्याचे त्यात म्हटले आहे. सोमवारी इम्फाळ पूर्व जिल्ह्यातील तखेल येथून केसीपीच्या एका सक्रिय कॅडरला अटक करण्यात आली.

दरम्यान, सुरक्षा दलांनी सोमवारी काकचिंग जिल्ह्यातील सिंगटोम गावातून शस्त्रास्त्रे, स्फोटकांचा साठा जप्त केला. ◂(वृत्तसंस्था)

# राज्यातील शाळांच्या रचनेत मोठा बदल



### केंद्रप्रमुखांवर विशेष जबाबदारी

◆ **अमरावती, २६ ऑगस्ट**

राज्यातील शाळांच्या रचनेत ३० वर्षांनी मोठा बदल करण्यात आला आहे. प्रत्येक जिल्ह्यात असलेल्या केंद्रशाळा आता समूह साधन केंद्र या नावाने ओळखल्या जाणार असून, केंद्रप्रमुख या पदाला समूह साधन केंद्र समन्वयक असे नाव देण्यात आले आहे. तसेच राज्यभरातील ४,८६० समूह साधन केंद्रांची पुनर्रचना करण्यास मान्यता देण्यात आली आहे.

शालेय शिक्षण विभागाने याबाबतचा शासन निर्णय प्रसिद्ध केला. प्राथमिक शिक्षणाचे सार्वत्रिकीकरण करण्यासाठी १९९४ मध्ये राज्यात ४,८६० केंद्रशाळा निर्माण करण्यास मान्यता देण्यात आली होती. १० शाळांमागे एक केंद्रीय प्राथमिक शाळा स्थापन करण्यात आली. शाळेच्या समूहातील अन्य प्राथमिक शाळांना मार्गदर्शन करणे हे केंद्रशाळेचे काम होते. प्रत्येक केंद्रासाठी एक याप्रमाणे ४, ८६० केंद्रप्रमुख पदे निर्माण करण्यात आली होती. मात्र, ३० वर्षांत शिक्षण क्षेत्रात झालेले आमूलाग्र बदल लक्षात घेऊन तसेच केंद्र सरकारने समग्र शिक्षण योजनेच्या सुधारित केलेल्या आराखड्यात केलेली समूह साधन केंद्र या तरतुदीची अंमलबजावणी करण्याचा निर्णय घेतला आहे.

राष्ट्रीय शिक्षण धोरण २०२० च्या प्रभावी अंमलबजावणीसाठी गुणवत्तेवर आणि कृतींवर आधारित सर्वसमावेशक शिक्षण, शिक्षकांच्या सातत्यपूर्ण व्यावसायिक विकासात सर्व प्रकारच्या मदतीची शेवटची यंत्रणा म्हणून समूह साधन केंद्रांना महत्त्वपूर्ण भूमिका पार पाडायची आहे. नव्या रचनेमध्ये पूर्वीच्या ४,८६० केंद्रशाळा अर्थात समूह साधन केंद्र कायम राहणार आहेत. त्याशिवाय आणखी १०९ शाळा समूह साधन केंद्र म्हणून घोषित करण्यात आल्या आहेत. स्थानिक परिस्थितीनुसार किमान आठ ते कमाल २० या मर्यादित शाळा समूह साधन केंद्रांशी संलग्न करण्याचा अधिकार स्थानिक प्रशासनाला असेल.

दुर्गम, आदिवासी, डोंगराळ, नक्षलग्रस्त भागात सहा ते सात जिल्हा परिषद शाळांसाठी एक समूह साधन केंद्र असेल, असे स्पष्ट करण्यात आले आहे. ◂(तभा वृत्तसेवा)

# विद्यापीठाशी संबंधित अधिसूचित ऑनलाईन सेवा 'आपले सरकार' पोर्टलवर

### चंद्रकांत पाटील यांची माहिती

**मुंबई, २६ ऑगस्ट-**

महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियमांतर्गत उच्च व तंत्र शिक्षण विभागाच्या वतीने विद्यापीठाशी संबंधित पुरविण्यात येणाऱ्या ५६ अधिसूचित सेवा आपले सरकार पोर्टलवर ऑनलाईन सुरू करण्यात आल्याची माहिती उच्च व तंत्र शिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील यांनी दिली. मंत्रालयात लोकसेवा हक्क अधिनियमांतर्गत पुरविण्यात येणाऱ्या विद्यापीठाशी संबंधित सेवा 'आपले सरकार' पोर्टलवर ऑनलाईन उपलब्ध करून देण्याबाबत बैठक आयोजित करण्यात आली होती. या बैठकीस उच्च व तंत्रशिक्षण विभागाचे अपर मुख्य सचिव बी. वेणुगोपाल रेड्डी, उच्च शिक्षण संचालक डॉ. शैलेंद्र देवळाणकर, तंत्रशिक्षण विभागाचे संचालक डॉ.विनोद मोहितकर, उच्च शिक्षण विभागाचे उपसचिव अशोक मांडे, सहसचिव संतोष खोरगडे, दूरदृष्यप्रणालीद्वारे राज्यातील विविध विद्यापीठांचे कुलगुरू व संबंधित अधिकारी उपस्थित होते. विद्यापीठाशी संबंधित ऑनलाईन सेवांबाबत सादरीकरण अनुप बाणाईत यांनी केले. सर्व विद्यापीठांना व महाविद्यालयांना या सेवा विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचविण्यासाठी विद्यापीठाच्या संकेतस्थळावर राईट टू सर्व्हिस या टॅबखाली आवश्यक माहिती प्रदर्शित करणे अनिवार्य आहे. विद्यापीठाने डॅशबोर्डवर आलेल्या अर्जाची पडताळणी करून या सेवा विहित मुदतीत विद्यार्थ्यांना मिळाव्यात या अनुषंगाने कार्यवाही करावी. उच्च व तंत्र शिक्षण विभागामार्फत ५६ सेवा ऑनलाईन करण्यात आल्या असून, २० सेवा या विद्यापीठाशी संबंधित आहेत. या सेवा राज्यातील जवळपास २० लाख विद्यार्थ्यांना पुरविल्या जाणार आहेत, असे चंद्रकांत पाटील म्हणाले.



## अग्रलेख...

# संकटी पावावे निर्वाणी रक्षावे...

**ॐ नमो जी आद्या । वेद प्रतिपाद्या । जयजय स्वसंवेद्या । आत्मरूपा ॥**

अशा शब्दांत संत ज्ञानेश्वर माउली श्री गणेशवंदनेची सुरुवात करतात. हे विश्वाच्या आदिरुपाला, अनादिस्वरूपाला केलेले नमन आहे. माउली या आत्मरुपाला स्वसंवेद्य म्हणतात. स्वतःच स्वतःच्या चेतनेने जागृत, सजग असलेल्या स्वसंवेद्यतेचे हे वर्णन समाजालाही लागू पडते. गणेशोत्सव हे याच सामाजिक चेतनेचे जागृत उदाहरण आहे. लौकिकार्थाने विचार केला तर वाजतगाजत उत्साही मिरवणुकीने श्री गणेशाची मूर्ती स्थापन करायची, दहा दिवस त्या मूर्तीची नित्यनेमाने पूजा-अर्चा, आरती करायची आणि त्यानंतर पुन्हा वाजत-गाजत मूर्तीचे विसर्जन करायचे, असा हा उत्सव. पण त्याचा सामाजिक आशय वेगळा आहे. मनामनाला जोडणारी ती प्रदीर्घ परंपरा आहे.

आज या गणेशोत्सवाला सुरुवात होत आहे. लाडक्या बाप्पाचे आगमन होत आहे. यंदा तर आठवडाभरापासूनच मोठमोठ्या सार्वजनिक मंडळाच्या भव्य मूर्ती मिरवणुकीसह मंडपात दाखल झाल्या आहेत. सध्या स्पर्धेचे युग आहे. त्यामुळे मंडळामंडळांतही देखाव्यांची स्पर्धा असते आणि त्यासाठी मूर्ती आधीच मंडपात विराजमान होते. तसेही भाविक स्वयंसेवक आपल्या लाडक्या देवतेची वर्षभरापासूनच वाट बघत असतात. त्यामुळे हा आनंदोत्सव थोडा लवकरच सुरू होतो आणि पाहता-पाहता अवघे वातावरण भारावून टाकतो.

गेल्या काही गणेशोत्सवांवर यंत्रणेने थोडीशी बंधने आणली होती. यंदा ती दिसत नाहीत. त्यामुळे जल्लोषाचे प्रतीक असलेल्या मिरवणुका खूपच थाटात निघाल्या. खरे तर डिजेच्या अमर्याद आवाजातील मिरवणुका म्हणजेच उत्सव असा अर्थ नाही. हा उत्सव भक्तांच्या मनात असतो. तो भक्तांच्या श्रद्धेत असतो आणि तो तसुभरही कमी झाला नाही; उलट वाढतो आहे, हा शुभसंकेत मानला पाहिजे. या महोत्सवाशी अनेक सामाजिक, सांस्कृतिक गोष्टी जोडल्या आहेत. त्या या महोत्सवाचे वेगळेपण अधोरेखित करतात. सवाई माधवराव पेशवा यांच्या राज्यकाळात शनिवारवाड्यात हा सण साजरा होत असे. त्या काळी भाद्रपद शु. चतुर्थीपासून दशमीपर्यंत सात दिवस उत्सव चालायचा. मुख्यतः धार्मिक स्वरूपाच्या या उत्सवात कथाकीर्तनादी कार्यक्रम होत असत. १८९४ दरम्यान लोकमान्य टिळकांनी या उत्सवाला सार्वजनिक रूप दिले आणि स्वातंत्र्याचा विचार पेरण्यासाठी त्याचा मोठा प्रसार केला. ब्रिटिशांच्या राजवटीविरुद्ध लोकसंघटन व जनमत तयार करण्याच्या कामी या उत्सवाने खरोखर मोलाचे योगदान दिले. त्यानंतरच्या काळात लोकजागृतीचे एक साधन म्हणून त्यावेळच्या धुरिणांनी या उत्सवाला व्यापक, सार्वजनिक व ज्ञानसत्रात्मक स्वरूप दिले. समाजातील ऐक्याची भावना वाढावी, या हेतूने लोकमान्य टिळकांनी या लोकप्रिय उपास्य देवतेची निवड केली. सर्वांनी काही दिवस एकत्र येऊन वैचारिक मंथन करावे, समाजाच्या भल्याचा विचार करावा म्हणून हा उत्सव गणेशचतुर्थीपासून अनंत चतुर्दशीपर्यंत दहा दिवसांचा करण्यात आला. त्यासाठी पूजाअर्चादी धार्मिक विधींसोबतच कीर्तने, प्रवचने, व्याख्याने असे सांस्कृतिक व धार्मिक कार्यक्रम तसेच मेळे, पोवाडे, भावगीते, नकला, जादूचे प्रयोग असे मनोरंजनाचेही कार्यक्रम सुरू झाले. अशा सार्वजनिक गणेशोत्सवाचा समाजावर चांगलाच परिणाम होईल, याची लोकमान्य टिळकांना खात्री होती. गणेशोत्सवाला संघटनेचे तसेच वैचारिक जागृतीचे एक प्रभावी माध्यम बनवावे हा त्यांचा ध्यास होता. पारतंत्र्यातील आपल्या बांधवांना संघटित करावे आणि राष्ट्रीय अस्मिता जागृत करावी, हाही त्यामागचा उद्देश होता. त्यामुळेच त्यांच्यासह अनेकांचे हात या सत्कर्मात लागत गेले. राष्ट्रीय एकात्मतेची भावना वाढीस लागावी अशी पदे व पोवाडे रचले गेले. तिथपासून तर आजपर्यंत या उत्सवाने आणि उत्सवाशी जोडलेल्या घटकांनी सामाजिक आशय सोडला नाही. आज या महोत्सवाचे थोडे बदलते रूप दिसत असले, तरी अनेक मंडळांतून सामाजिक आणि सांस्कृतिक परंपरा जपली जात आहे, हेही नाकारून चालणार नाही.

गणेशोत्सवाची सुरुवात आपल्या महाराष्ट्रात, पुण्यात झाली असली, तरी दिल्ली, कोलकाता, गोवा, मद्रास यांसारख्या इतर प्रांतांतील शहरांत आणि विशेषतः दक्षिण-पश्चिमेतील राज्यांत मोठ्या उत्साहात हा उत्सव साजरा होऊ लागला. सार्वजनिक गणेशोत्सवामुळे संगीत, नकला, जादू आदी कार्यक्रम करणाऱ्या कलाकारांना प्रोत्साहन मिळाले. नवे-नवे कलाकार उदयास आले. कार्यक्रम विनामूल्य असल्याने सर्वसामान्य जनतेलाही सहभागी होता आले. नंतरच्या काळात गणेश मंडपासमारील मैदानात गाडलेल्या दोन बांबूला सोनेरी पडदा बांधून, सार्वजनिक खांबावरील दिव्यांवर पोते झाकून सिनेमे दाखवले गेले. रोज रात्री कोणत्या मंडळात कोणता सिनेमा होणार, हे दुपारपर्यंत त्या मंडळाच्या फलकावर आणि ध्वनिक्षेपकावर जाहीर होत असे आणि आपल्या आवडीप्रमाणे नागरिक त्या-त्या मंडळाच्या मैदानात सायंकाळी जाऊन बसायचे. तेव्हा सिनेमा आणि तो देखील फुकटात बघणे पर्वणीच होती.

या गणेशोत्सवाचे आरंभापासूनचे आणि आतापर्यंतचे खरे वेगळेपण म्हणजे त्या निमित्ताने समाजातील विविध घटक जवळ आले. समाजात स्नेहभाव वृंदावला. जातीचीच नव्हे, तर धर्माचीही दरी कमी झाली. अनेक मुस्लिम बांधव श्री गणेशाचे पूजन करताना दिसतात. सांगलीच्या वाळवा तालुक्यातील गोटखडी या गावातल्या मशिदीत तर गणपतीची दरवर्षी दहा दिवसांसाठी प्रतिष्ठापना केली जाते. यंदा त्यांचे ४५ वे वर्ष आहे. या गणपतीचे दर्शन घेण्यासाठी हिंदूसह मुस्लिम धर्मीयही मोठ्या संख्येने येतात. याबद्दलची दंतकथा अशी आहे की, तिकडे एका मंडपात श्री गणेशाची प्राणप्रतिष्ठा झाली होती. मात्र, पावसाळ्याचे दिवस असल्याने मंडप गळत होता. तेव्हा मुस्लिम बांधवांनी एकत्र येऊन मूर्ती मशिदीत हलवली. पुढे तीच परंपरा बनली. काही वेळा बकरी ईद हा सण गणेशोत्सवात आला असताना मुस्लिम बांधवांनी कुर्बानी केली नाही. एकादशीलाही या गावात मांसाहार होत नाही. हे कोणत्याही सक्तीने नाही तर अगदी मनापासून जपले जाते. कोल्हापूर जिल्ह्यातील कुरुंदवाड येथे तर पाच मशिदींमध्ये गणपती बसवला जातो. गावातील कुडेखान बडेनाल साहेब मशीद, ढेपणपूर मशीद, बैरागदार मशीद, शेळके मशीद आणि कारखाना या पाच मशिदीत श्रींची प्रतिष्ठापना होते. असे अनेक समुदायांच्या बाबतीत अनेक ठिकाणी घडताना दिसते. त्यामुळे हा केवळ धार्मिक उत्सव नाही, तर तो सामाजिक आणि सांस्कृतिक ऐक्याचा महोत्सव आहे. गणेशोत्सवाला सार्वजनिक स्वरूप आल्यापासून आजतागायत त्यात अनेक स्थित्यंतरे झालीत, हे खरे आहे. स्वातंत्र्यपूर्व काळात या उत्सवाचे स्वरूप धार्मिक, सामाजिक व राष्ट्रीय होते. स्वातंत्र्यप्राप्ती, एकात्मता, स्वदेशी या मुद्यांवर ते केंद्रित होते. आज थोडे स्वरूप बदलले आहे. उत्कृष्ट रोषणाई करणे, करमणुकीचे व मनोरंजनाचे विविध कार्यक्रम आयोजित करणे यावर अधिक भर दिला जात आहे. मेळे, पोवाडे मागे पडले असून त्याची जागा संगीत, नृत्य आणि स्पर्धांनी घेतली आहे. मिरवणुकीतील डिजेच्या कर्णकर्कश आवाजात सिनेमाची गाणी वाजवली जातात आणि त्यावर तरुणाई थिरकते. शेजारून जाताना आपल्याही हृदयाचे ठोके त्या डिजेसारखे जोरजोराने वाजतात! असे काही बदल काळाच्या ओघात होतात. काळाच्या ओघात बदल अपरिहार्य असतात. मात्र ते सकारात्मक असायला हवेत. सामाजिक हिताच्या व प्रगतीच्या दृष्टीने बदल व्हावेत हे जास्त महत्त्वाचे आहे. त्यासाठी समाजाने चिंतन करणे गरजेचे आहे.

समाजाच्या गरजेनुसार परंपरा निर्माण होतात आणि गरज संपली की परंपरेचा हळूहळू ऱ्हास होतो. गणेशोत्सव मात्र वर्षानुवर्षे कायम आहे. याचाच दुसरा अर्थ असा की, या परंपरेची अजूनही समाजाला तेवढीच गरज आहे. 'संकटी पावावे निर्वाणी रक्षावे...' अशा आराधनेची आवश्यकता या देशाला आजही आहे. कारण ऐक्य गरजेचे आहे आणि समाजोपयोगी कार्याला सर्वांचे हात लागणेही. त्यामुळेच यंदाही बाप्पाला एवढेच मागणे आहे की, त्यानेच आम्हा सगळ्यांचा विवेक जागा करावा आणि आम्हाला इष्टाची, कल्याणाची व मांगल्याची दिशा दाखवावी.

---

## विशेष

# पर्यावरण शिक्षणाचे दस्तावेजीकरण

**प्रा. सुखदेव बखळे**

'सेंटर फॉर इन्व्हायर्न्मेंटल रिसर्च एज्युकेशन' (सीआयआरई) चे ठाम मत आहे की, पर्यावरण हा शाळांच्या चार भिंतींच्या आत शिकवण्याचा विषय नाही. शैक्षणिक संस्थांना असा आधार बनवणे अत्यावश्यक आहे, जिथे शाश्वत जीवनशैलीचा उपदेश करण्याऐवजी त्याचे पालन केले जाते. उदाहरणार्थ ऊर्जा संवर्धन, कचरा व्यवस्थापन, पावसाचे पाणी साठवणे, शाळा-महाविद्यालय, शैक्षणिक परिसर आणि इतर परिसर हिरवे करणे, शहरी शेती, अक्षय ऊर्जेचा वापर, सार्वजनिक वाहतुकीचा वापर आणि कागदासारख्या संसाधनांची बचत. या प्रयत्नांमधून साकारत असलेले अनोखे शिक्षणचित्र आवर्जून तपासण्याजोगे आहे.

'सीआईआरई'ने सध्या उचललेले पहिले पाऊल म्हणजे भारतातील पर्यावरण शिक्षणाच्या यशस्वी मॉडेल्सचे दस्तावेजीकरण करणे. दिल्लीतील अनेक शाळा पावसाचे पाणी साठवणे, कचरा व्यवस्थापन आणि हिरवळ यासारख्या शाश्वत उपाययोजना करीत आहेत. संस्कृती स्कूलसारख्या नवीन शाळांच्या इमारतींनी आपल्या स्थापत्य डिझाईन प्लॅनमध्ये पावसाचे पाणी साठवण्याची प्रणाली समाविष्ट केली आहे, तर मीरा मॉडेल स्कूलने पावसाचे पाणी साठवण्याची प्रणाली स्थापित करण्यासाठी कोणत्याही नवीन इमारतीची वैशिष्ट्ये तयार करण्याऐवजी विद्यमान संरचनेतच काम केले आहे. श्रीराम स्कूलने छतावरील पावसाचे पाणी साठवण्याची एक यशस्वी प्रणाली लागू केली आहे. जुन्या काळात पाणी कसे वाचवले जात होते, हे समजून घेण्यासाठी विद्यार्थ्यांना 'हौज-ए-शम्सी' आणि झारणा या दोन पारंपरिक पाणी साठवण्याच्या संरचनांमध्ये नेले जाते.

आजघडीला अनेक शाळा आपल्या कँटीनजवळ गांडूळ-कंपोस्ट किंवा एंजाईम-कंपोस्ट खड्डे तयार करून कचरा व्यवस्थापन समस्या सोडवतात. नंतर हे कंपोस्ट बागकाम प्रकल्प आणि वृक्षारोपण मोहिमांमध्ये वापरले जाते. बहुतेक शाळा हस्तनिर्मित कागद बनवून कागदाचा पुनर्वापर करतात. दिल्लीमध्ये 'लीड स्कूल प्रोग्राम' नावाचा एक अनोखा कार्यक्रम आहे. त्यात एक नियुक्त 'लीड' शाळा परिसरातील २५ इतर शाळांना पर्यावरणीय शिक्षण उपक्रमांवर मार्गदर्शन आणि प्रशिक्षण देते. राजस्थानमधील तिलोनिया येथील 'बेअरफूट कॉलेज'मध्ये सौर ऊर्जा आणि पर्यायी ऊर्जेचे सर्वोत्तम मॉडेल सादर करण्यात आले. संपूर्ण कॉलेज कॅम्पस स्वयंपूर्ण आहे आणि आपल्या ऊर्जेच्या सर्व गरजा ते भागवते. ४० किलोवॅट क्षमतेच्या सौर ऊर्जा युनिटद्वारे हा प्रकल्प चालवला जातो. ग्रामीण, अशिक्षित तरुणांना आणि महिलांना 'बेअरफूट सोलर इंजिनीअर्स' म्हणून



प्रशिक्षित करण्यासाठी हे कॉलेज स्थापन करण्यात आले होते. ते त्यांच्या गावांमध्ये सौर तंत्रज्ञानाचा प्रसार करतात. या महाविद्यालयाने देशभरातील ३९२ ग्रामीण युवक आणि महिलांना 'बेअरफूट सोलर इंजिनीअर्स' म्हणून प्रशिक्षण दिले आहे. त्यांनी आतापर्यंत देशासाठी अनेक महत्त्वाची कामे केली आहेत. त्यांनी ३५० गावे आणि वाड्यांमध्ये एकूण १२ हजार घरांमध्ये सोलर फोटोव्होल्टेईक (एसपीव्ही) होम लाईटिंग सिस्टिम्स बसवल्या आहेत. देशभरातील ३०० प्रौढ शिक्षण केंद्रे आणि ८७० शाळांचे विद्युतीकरण करणे, ३५३० सौर कंदील तयार करणे आणि देखभाल करणे, ४० किलोवॅट सौर पॅनेलद्वारे लडाखच्या २८ दुर्गम गावांमधील १५३० कुटुंबांना कडक हिवाळ्यात तीन तास प्रकाश प्रदान करणे आणि सौर ऊर्जा उपक्रमांद्वारे लेह आणि कारगिल जिल्ह्यांमध्ये सुमारे एक लाख लिटर रॉकेलची बचत करणे अशी कामे त्यांच्यातर्फे करण्यात आली आहेत. कोलकात्यातील शाळा स्वयंसेवी संस्थांसोबत स्वच्छ हावडा प्रकल्प व वृक्ष गणना प्रकल्पासारख्या नागरी प्रकल्पांवर काम करतात.

गुजरातमधील सनोसरा येथे स्थित लोकभारती संस्था सामूहिक जीवनाच्या गांधीवादी तत्त्वांवर कार्य करते आणि आजूबाजूच्या गावांसह एका मोठ्या विस्तार कार्यक्रमाद्वारे प्रशंसनीय सामुदायिक सेवा देते. सध्या लोकभारतीचे कर्मचारी आणि विद्यार्थी माती आणि जलसंवर्धन, सौर विद्युतीकरण, बायोगॅस स्थापना, सेंद्रिय शेती, पशुपालन, ग्राम स्वच्छता, महिला-बाल आरोग्य आणि पोषण, घरगुती औषधी वनस्पती उपचार आणि अंधश्रद्धा निर्मूलन असे विविध उपक्रम राबवतात. या कार्यक्रमांतर्गत शिक्षकांचे छोटे गट आणि सर्व पदव्युत्तर विद्यार्थी दत्तक गावांमध्ये आठवड्यातून किमान चार तास तीन वर्षे काम करतात आणि प्रत्येक विद्यार्थी गावातील किमान पाच कुटुंबांशी जवळचा संपर्क स्थापित करतो. दत्तक गावातील शेतकरी, शाळकरी मुले, महिला आणि ज्येष्ठ नागरिक यासारख्या गटांना वर्षभर चालणाऱ्या शैक्षणिक कार्यक्रमांसाठी लोकभारती कॅम्पसमध्ये आमंत्रित केले जाते. अंतिम वर्षाच्या विद्यार्थ्यांना प्रबंध तयार करण्यासाठी गावकऱ्यांना येणाऱ्या अडचणी नीट समजून घेण्यासाठी सहा महिने गावातील एका कुटुंबासोबत राहावे लागते. तसेच लोकभारती शेजारच्या समुदायांना निसर्गाशी सुसंगत राहण्यास मदत करते.

पुण्यातील अक्षरनंदन शाळा हे पर्यावरणीय शिक्षणाचे एक आदर्श उदाहरण आहे. शाळा अनेक शाश्वत उपाययोजनांचे पालन करते, जे देशभरातील इतर शाळांद्वारे सहज स्वीकारले जाऊ शकतात. जलसंवर्धन, गांडूळ खतासह कचरा व्यवस्थापन, विद्यार्थ्यांनी विविध भाज्या आणि कडधान्ये पिकवलेली शेती आणि अनेक पर्यावरणीय प्रकल्प त्यात आहेत. कॉर्पोरेट घराण्यांनी टाकून दिलेला कागद ही संस्था वापरते. वर्तमानपत्रे दान केली आहेत. या मराठी माध्यमाच्या शाळेत, प्रत्येक विद्यार्थी आणि शिक्षकाच्या गाभ्यामध्ये पर्यावरणीय जागरूकता आहे आणि कृतीतून शिकवले जाते. अक्षरनंदन शाळा ही देशभरातील काही अग्रगण्य संस्थांपैकी एक आहे, ज्यांनी शाश्वततेवर लक्ष केंद्रित करून खरोखरच समग्र पद्धतीने पर्यावरणीय शिक्षण देण्यासाठी पुढाकार घेतला आहे.

मसुरीच्या हॅम्प्टन कोर्ट येथील 'कॉन्व्हेंट ऑफ जीसस अँड मेरी स्कूल'ने गेल्या १८ वर्षांमध्ये एक आदर्श कचरा व्यवस्थापन मॉडेल विकसित केले आहे. विपीन कुमार यांनी डिझाईन केलेल्या एका साध्या मॉडेलने शाळेला शून्य कचरा क्षेत्र बनवले आहे. विद्यार्थी आपल्या वर्गातील कचरा दोन डब्यांमध्ये कसा वेगळा करायचा हे शिकत आहेत. याव्यतिरिक्त इयत्ता चौथी ते दहावीचा प्रत्येक विद्यार्थी आठवड्यातून पाच घरांमधून घन/सुका कचरा गोळा करतो. तो शाळेत आणतो आणि कचरा व्यवस्थापन कक्षात वैयक्तिकरीत्या वेगळा करतो. हा घनकचरा शहरातील सरकार-अधिकृत कचरा संकलन केंद्रामध्ये विकला जातो. याव्यतिरिक्त शाळेतील मुलांना ओल्या, जैव विघटनशील कचऱ्याचा पुनर्वापर करायला शिकवले जाते. तो शाळेभोवती वृक्षारोपण मोहिमेत वापरला जातो. मुले अगदी लहानपणापासूनच कचरा व्यवस्थापनाबद्दल शिकत असल्याने स्वतःचा कचरा व्यवस्थापित करण्यास सक्षम बनतात. हे मॉडेल कचरा वेचकांसाठीदेखील खूप उपयुक्त आहे. कचरा वेचकांना किंवा कचरा वेचकांच्या मुलांना शाळेत मोफत प्रशिक्षण दिले जाते. हॅम्प्टन कोर्ट कचरा व्यवस्थापन मॉडेल भारतातील अधिकाधिक शाळांमध्ये स्वीकारले पाहिजे..

(लेखक अर्थशास्त्राचे निवृत्त प्राध्यापक आहेत.)

---

## वेध

**गिरीश शेरेकर**

# कथा अमरावतीच्या रेल्वे उड्डाणपुलाची

देशातल्या अनेक शहरांना उड्डाणपूल कसा असतो, हे १९६३ साली कदाचित माहीतही नसेल, तेव्हा अमरावतीच्या राजकमल चौकातून सुरू होणाऱ्या रेल्वे उड्डाणपुलाचे बांधकाम सुरू झाले. पुढच्या पाच वर्षांत तो तयार होऊन वाहतूक सुरू झाली. त्यावेळी या उड्डाणपुलाचे प्रचंड आकर्षण होते. पुलावरचा फुटपाथ व कठड्यांना खेटून उभे राहायचे आणि खालची वर्दळ बघत आनंद लुटायचा, हा अनेकांचा तेव्हा दिनक्रम होता. विरंगुळा म्हणून फेरफटका मारण्याचे ते हक्काचे ठिकाण होते. वर्ष पुढे सरकत गेले. दोन आणखी उड्डाणपूल झाल्याने शहराच्या रचनेतही बदल झाले. स्वाभाविकपणे या उड्डाणपुलाचे आकर्षण कमी झाले होते, पण त्याची उपयोगिता अजिबात कमी झालेली नाही. एकेकाळी या पुलाने शहरातल्या ७० टक्के वाहतुकीचा भार उचलला आहे. वाहतुकीसाठी काही नवे पर्याय उपलब्ध झाल्याने सदर पुलावरची वाहतूक कमी झाली. अमरावती शहरात सध्या दररोज जी वाहतूक होते, त्यातली ४० टक्के वाहतूक याच उड्डाणपुलावरून होत असल्याने त्याच्या आवश्यकतेचा अंदाज येतो. आता हा पूल शिकस्त झाल्याचे सांगून अचानक रविवारी रात्रीपासून सर्व प्रकारची वाहतूक बंद करण्यात आली आहे. आपसूकच ही वाहतूक लगतच्या अन्य मार्गावर वळविण्यात आल्याने त्या रस्त्यांवर खूप भार वाढला. प्रचंड वाहतूक कोंडीचा प्रत्यय पहिल्याच दिवशी अमरावतीकरांना आला.



सार्वजनिक बांधकाम विभागाच्या नोंदीनुसार बंदिस्त स्वरूपाच्या या उड्डाणपुलाला आता ६२ वर्षे पूर्ण झाली आहेत. राज्याच्या व रेल्वेच्या बांधकाम विभागाने संयुक्तपणे हा पूल तयार केला आहे. बांधकामाचे जे नियम आहेत, त्यानुसार या पुलाचे आयुष्यमान केव्हाच संपुष्टात आले. वेळोवेळी डागडुजी करून पुलाचे आयुष्य पुढे ढकलण्याचेच काम आतापर्यंत झाले. असे का करता हे कोणीच संबंधितांना विचारले नाही, हे आश्चर्य आहे. रेल्वे विभागाच्या हद्दीत पुलाचा जो भाग आहे, तेथे गर्डर टाकून हा पूल बनविण्यात आला आहे. त्याच गर्डरला नटबोल्टने जोडलेल्या प्लेट्स कमकुवत होत असल्याचे लक्षात आल्यावर रेल्वे विभागाने पुलाची प्राथमिक तपासणी केली. त्यात धक्कादायक वास्तव समोर आल्याने त्यांनी पुलावरून जड वाहतूक बंद करण्याच्या सूचना दिल्या. सार्वजनिक बांधकाम विभागाने या पुलाचे लगेच सखोल संरचनात्मक परीक्षण केले. अहवाल येताच सर्व प्रकारची वाहतूक बंद करण्याचा निर्णय घेऊन पूल पाडून नवा बांधणे हाच पर्याय त्यांनी जाहीर केला. जनतेच्या सुरक्षेपलीकडे काही नाही. पण, किमान पायदळ व दुचाकीने जाणाऱ्यांचा भार जर हा पूल सहन करत नसेल तर मग या पुलाची देखभाल सांभाळणाऱ्या विभागाच्या कार्यपद्धतीचे परीक्षण करणे आवश्यक ठरते. कारण या पुलाचा काही भाग पडण्यापर्यंतच्या स्थितीत येतो आणि संबंधित दोन्ही विभागाकडून कोणतीच पूर्व हालचाल होत नाही. अचानक पूल बंद करण्याचीच घोषणा होते म्हणजेच कोणाचेच त्याकडे लक्ष नव्हते, असा त्याचा अर्थ आहे. नाकातोंडात पाणी शिरण्याची वेळ आल्यावरच सगळे खडबडून जागे झाले. आपल्या अख्त्यारीतला पूल शिकस्त होत असेल किंवा त्याचे आयुष्यमान संपत असेल तर वेळेत दखल घ्यायची कोणी याचा जाब दोन्ही विभागांना जनतेने विचारायला हवा. दोन वर्षांपूर्वी खा. अनिल बोंडे यांनी येथे नवा पूल तयार करण्याचे सूतोवाच करून नवे डिझाईन करण्याच्या सूचना दिल्या होत्या, त्याचे काय झाले? तेव्हाच हा विषय बांधकाम विभागाने ताकदीने रेटला असता तर आजची स्थिती वेगळी असती. जुलै महिन्यात जड वाहतुकीसाठी पूल बंद झाल्यावर त्यांनी रेल्वे मंत्र्यांना नव्या पुलासाठी पैशांची मागणी केली, त्याचे उत्तर अद्याप जाहीर झालेले नाही.

पुलासंदर्भातला जो घटनाक्रम समोर आहे, तो कमालीचा संशयास्पद आहे. वेगवेगळ्या लाजिरवाण्या चर्चा शहरात होत आहेत. पुलाचे नवे डिझाईन शहराच्या पुढच्या ५० वर्षांच्या वाहतुकीचा ताण लक्षात घेऊन तयार करावा लागेल. सध्या ज्या विभागाकडे हा पूल आहे, तोच ते करणार की अन्य कोणता? पैसे कोण देणार हेही स्पष्ट नाही. कारण कोणाचेच लक्ष नसल्याने पूर्वतयारी काहीच नाही. पूल बंद होऊन दोन दिवस झाले. अजूनही कोणी समोर आलेले नाही. नागरिक बोटे मोडून शिव्याशाप देत आहेत. लवकर समाधानकारक उत्तर मिळावे, अशी त्यांना अपेक्षा आहे. हा पूल देखणा, दर्जेदार आणि वेगाने बनवायचा असेल तर केंद्रीय रस्ते वाहतूक मंत्री नितीन गडकरी व मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस हेच सक्षम पर्याय असल्याचे जनतेचे मत आहे. कितीही लवकर निर्णय घेतला तरी पूल तयार व्हायला किमान दोन वर्षे लागतील. पुलाचे भाग्य केव्हा उजळते बघूया!

९४२०७२१२२५

---

## धर्म-संस्कृती

# श्रीगीता : आत्मसंयम योग

**प्रा. दिलीप जोशी**

श्रीमद्भगवद्गीतेचा सहावा अध्याय 'आत्मसंयम योग' नावाने सुपरिचित आहे. नावावरून आपल्याला एवढे नक्की समजते की, संयम पाळायला भगवान सांगत असतील. कारण आपण संसारिक सर्वजण ऐहिक सुखासाठी दिवसरात्र धडपडत असतो. म्हणजे आपण सतत संसारिक कर्मरत असतो. सहज विचार करा; आपल्याला अपेक्षित सुखांना थांबा आहे का? याचे उत्तर नकारार्थी आहे. एक उपभोग मिळाला की लगेच त्याहून उच्च भोगासाठी आपली धडपड असते. कितीही इच्छापूर्ती झाली तरीही आपण अतृप्तच असतो. त्यातच मरतोदेखील. जसा कडक लाकूड पोखरू शकणारा भुंगा जेव्हा कमलदलात अडकतो तेव्हा तो कोवळ्या कमलदलात अडकून मरतो; पण तो कोवळ्या कमळाला पोखरत नाही तसेच आपणही स्वसामर्थ्य विसरून संसारात मोहग्रस्त होऊन अडकतो. उपभोग आणि विषयभोग आपल्याला गोड वाटतात. पण हे सर्व विषय सदोष, अनित्य, दुःखाला कारणीभूत आणि मिथ्या आहेत. त्यामुळे ते आपल्याला बद्ध करतात. याचा अर्थ हे सर्व सुखोपभोग, विषय नाशवंत आणि मर्यादित आहेत. हे आपल्याला सांगण्यासाठी हा आत्मसंयम योग आहे. विषय भोगातून बाहेर पडायचे असेल तर विषयांचे पंख छाटण्याचे एकमेव शस्त्र आहे ते म्हणजे संयम. भगवंतांनी हाच आत्मसंयम या अध्यायात विशद केला आहे.

**'यदा हि नेंद्रियार्थेशू न कर्मस्वनुषंजते ।**
**सर्वसंकल्पसंन्यासी योगारूढस्तदोच्यते ॥'**

जो पुरुष इंद्रियांच्या विषयांत आणि तदनुरूप कर्मामध्ये आसक्त होत नाही, त्यालाच योगारूढ पुरुष म्हटले आहे. त्यासाठी आत्मसंयम योग हाच आहे. हा संयम स्वतःच्याच हातात आहे.

**'उद्धरेदात्मनात्मानं नात्मानमवसादयेत् ।**
**आत्मैव ह्यात्मनो बंधुरात्मैव रिपुरात्मनः ॥'**

भगवान स्पष्ट सांगतात की, स्वतःनेच स्वतःचा उद्धार करावा. कारण आपणच आपले स्वतःचे मित्र आणि शत्रू आहोत. जसा एखादा महारोगी स्वतःवरचे उपचार स्वतःच करतो; तसा हा संसाराचा जडलेला महारोग आपला आपणच संयम आणि विवेकाच्या उपचाराने घालवायचा आहे. त्यासाठी आपल्याला सहज जमू शकेल, असा उपाय भगवंताने सांगितला.

**'युक्ताहारविहारस्य युक्तचेष्टस्य कर्मसु ।**
**युक्तस्वप्नावबोधस्य योगो भवती दुःखः ॥'**

आत्मसंयम कुठून सुरू करायचा तर संयमित नियमित आहार आणि विहार, नित्यकर्मात संयमित राहणे, निद्रा आणि जागरण यातही संयम हवा. (रात्रंदिवस मोबाईलमध्ये अडकलेले आपण ना झोप ना जेवण व्यवस्थित घेतो.) संयमामुळेच दुःखहरण होते. पुढे त्याला संयमित चित्तवृत्ती प्राप्त होते. भोग कामनांविषयी आकर्षण राहत नाही. मग असा पुरुष योगारूढ झाला असे समजावे. जसा एखादा दिवा निर्वात स्थळी स्थिर राहतो तसाच संयमित चित्ताचा योगारूढ पुरुष सर्व स्थितीत स्थिर राहतो. सुखाने आणि दुःखाने विचलित न होता तो पुढे चालतो.

**'शनैः शनैरूपरमेद्बुद्ध्या धृतिगृहीतया ।**
**आत्मसंस्थं मनः कृत्वा न किंचीदपि चिंतयेत् ॥'**

विवेक आणि संयमाने मनाला स्थिर करून आत्मबुद्धीने सर्वातून मनाला निवृत्त करायचे. मनाला क्रमाक्रमाने आत्मस्वरूपात स्थिर करून त्यानंतर कोणत्याही विषयाचे स्मरण करायचेच नाही.

**'यतो यतो निश्चरति मनश्चंचलमस्थिरम् ।**
**तटस्ततो नियम्यैतदात्मन्येव वशं नयेत ॥'**

आपले मन अचपळ, अगतिक, चंचल आणि अस्थिर आहे. ते विषयाकडे वारंवार धावते. त्या मनाला आत्मसंयमाने आवर घालून विवेकाने त्याला स्वरूपस्थितीत बांधून ठेवणे. यालाच आत्मसंयम योग म्हणतात. खरं सांगू, ज्याचे मन संयमित त्याच्यातील रजोगुण पूर्ण शांत स्वरूप होतो. रजोगुण शांत असेल तर त्याला ऐश्वर्याचा विवेक प्राप्त होतो. उदा. झोपेसाठी वातानुकूलित खोली असणे हे झाले ऐश्वर्य आणि वातानुकूलित नसली, तरी साध्या खोलीतही वातानुकूलितसारखी गाढ झोप लागणे हा ऐश्वर्याचा विवेक. दोन्ही स्थितीत जो समसुख मानतो तोच खरा सर्वसुखी आहे.

भगवान पुढे सांगतात... **'यो मां पश्यति सर्वत्र सर्वंच मयि पश्यति ।**
**तस्याहं न प्रणश्यामि स च मे न प्रणश्यति ॥'**

सर्व जीवमात्रात परमेश्वर पाहतो त्याला मी दूर नाही किंवा मला तो दूर नाही. तो आणि मी एकच. हे अर्जुना, जो स्वतःकडे जसा पाहतो तसाच इतर जिवांना सम भावाने पाहतो. सुख आणि दुःख एकाच पारड्यात मोजतो तो सामान्य असला, तरीही तो योगीच आहे. हा विवेक साधण्याचा प्रयत्न आपण नक्की करू शकतो. यावर अर्जुन शंका विचारतात आणि भगवंत उत्तर देतात. ही प्रश्नोत्तरी आपल्या दृष्टीने महत्त्वाची आहे. अर्जुन म्हणतात, हे भगवंता! तुम्ही सांगितलेला समत्वभाव कळला, पण मन तर चंचल आहे, अस्थिर आहे. त्याला वश करायचे म्हणजे वारा हातात कोंडण्यासारखे आहे. त्यामुळे खरंच हा समत्वभाव मिळू शकेल?

भगवंत इथे सांगतात... **'असंशयं महाबाहो मनो दुर्निग्रहं चलम् ।**
**अभ्यासेन तु कौन्तेय वैराग्येण च गृह्यते ॥'**

तुझा संशय बरोबर आहे, पण त्यासाठी अभ्यास, वारंवारिता यामुळे ते शक्य होईल. पुन्हा अर्जुन विचारतो की, समजा आपल्याला सर्वांप्रती समभाव साधला गेला; कालांतराने ही वृत्ती आपल्यातून नष्ट झाली तर त्यामुळे नुकसान होईल का? याचे उत्तर भगवंत देतात की, अशा योगभ्रष्ट पुरुषांचे कोणतेही नुकसान होणार नाही. त्याला मोक्ष मिळाला नाही तरी पूर्वजन्मीच्या अभ्यासामुळे पुढील जन्म पुन्हा योग परंपरेतच होईल, हा विश्वास भगवान देतात. आणि जर योगभ्रष्ट न होता तो कायम संयमित राहिला तर त्याला हमखास मोक्ष प्राप्ती आहेच.

थोडक्यात सर्व विषयांचा त्याग करून आपले मन विषयांपासून निवृत्त करावे. 'प्रपंच रचना सर्वही भोगून त्यागिली' हे संयमाने शक्य आहे. कारण मनावर संयमन केले तर माणूस अंतर्मुख होतो. अंतर्मुख मनुष्य योगाभ्यासाने आत्मस्वरूप स्थितीत स्थित होतो. हीच आपली परमोच्च विवेक स्थिती आहे. पण समजा प्रयत्न करूनही ही स्थिती प्राप्त झाली नाही तरी भगवंतांनी आपल्याला अधोगती निश्चित होणार नाही; उलट पुढील जन्म साधकाचा मिळेल, असे प्रतिज्ञापत्र दिले आहे.

**'आता अवधान एकले दिजे । मग सर्व सुखांसी पात्र होईजे ।**
**हे प्रतिज्ञोत्तर माझे, उघड ऐका ॥'**

९८२२२६२७३५

---

### निरोगी जीवनाचा मूलमंत्र

कुठलाही आजार आपल्याला का होतो? तर, त्याचे सहज सोपे उत्तर आहे. तुम्ही स्वीकारल्यामुळे. मात्र आपल्यात प्रतिकारशक्ती आहे. ती आपल्याला कसलाच आजार होऊ नये यासाठी सतत काम करत असते. तिला मनापासून स्ट्राँगली मान्य करा, वापरा हेच खरे शरीरशास्त्र आहे. ताप आल्यावर, सर्दी झाल्यावर, शिंक आल्यावर कसलाही आजार झाल्यावर थोडे थांबा. प्रतिकारशक्तीला काम करू द्या. अशा आजारांवर वारेमाप खर्च करणे शरीरावर अत्याचार आहेत. शरीरशास्त्रात नैसर्गिक प्रतिकारशक्ती म्हणजे खरे विज्ञान आहे. आजारांच्या मागे आपलं अज्ञ मन असतं. कित्येकदा रुग्णाला याची माहिती नसते. डॉक्टरांकडे गेलं आणि उपचार घेतले की तात्पुरतं बरं वाटतं; थोड्या दिवसांनी पुन्हा दुखणं उफाळून येतं. यासाठी मन आणि शरीर यांना जोडणारी काही लक्षणे बघूया -एखाद्या गोष्टीची जबरदस्त भीती किंवा चिंता वाटली की घशाला कोरड पडते. परीक्षेचा किंवा अजून कसला तणाव असेल तर पोटात गोळा येतो. समोर एखादा अपघात किंवा दुर्घटना पाहिली की हातापायातली शक्ती गळून जाते. याविपरीत सतत हसतमुख असणारी व्यक्ती क्वचितच आजारी पडते. आपल्या शरीरातल्या आंतरिक क्रियांवरही अज्ञात मनाची सत्ता चालते. उलट जर तुम्ही ठामपणे विचार केलात माझं शरीर तंदुरुस्त आहे, प्रतिकारशक्ती प्रबळ आहे तर अवचेतन मन तसाच आदेश शरीराच्या पेशींना, अवयवांना पोहोचवतं आणि रोगप्रतिकारशक्ती वाढते. एखाद्या आजाराबद्दल सतत वाचत राहणे, त्याची भीती बाळगणे, यामुळे तो आजार प्रत्यक्षात येण्याची शक्यता वाढते. मात्र सकारात्मक मनस्थिती ठेवून ठरवून टाकलं की, मला काहीही झालं तरी मी यातून बाहेर पडणारच, तर डॉक्टरही सांगतात- अशी माणसं पटकन बरी होतात. तेव्हा दररोज मनाशी बोला- मी निरोगी आहे, माझं शरीर बलवान आहे. सोबतच ध्यानधारणा व प्राणायाम, श्वासावर लक्ष केंद्रित केल्याने मेंदू शांत राहतो व रोगप्रतिकारशक्ती वाढते.

**प्रा. सतीश मेरतकर**/ मेहकर

● ● ● ●

## वाचक पत्रे

### विकासात खोडे घालू नका

'वेध' सदरातील 'शक्तिपीठ महामार्ग व्हावा लोकविकासाचा मार्ग' हे स्फूट वाचले (तरुण भारत, २६ ऑगस्ट). मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस हे विकासाची दृष्टी असलेले, भविष्याचा वेध घेणारे नेतृत्व आहे. त्यांनी सादर केलेल्या अनेक योजना केवळ शेतकऱ्यांच्या नव्हे, तर राज्यातील बहुसंख्य जनतेसाठी उपकारकच ठरल्या आहेत. या योजनांचा लाभ घेऊन जनतेने त्याचा प्रचंड फायदाही करून घेतला आहे. शक्तिपीठ महामार्गामुळेही रोजगाराच्या अनेक संधी उपलब्ध होणार आहेत. नागपूर ते गोवा या महत्त्वाकांक्षी महामार्गाच्या दोन्ही बाजूंना पेट्रोल पंप, हॉटेल्स, इस्पितळे, वाहन दुरुस्त्यांची दुकाने, हवा-पंक्चरची दुकाने अशा अनेक प्रकारच्या व्यवसायांना चालना मिळून रोजगाराच्या संधी उपलब्ध होणार आहेत. त्याचबरोबर पश्चिम महाराष्ट्रातून कोकणात-गोव्यात सहलींसाठी जाणाऱ्या पर्यटकांना सध्या उपलब्ध असलेल्या घाटांमध्ये प्रचंड वाहतुकीला सामोरे जावे लागते. त्यात वेळ, श्रम, पैसा, इंधन वाया जातेच; पण पर्यटकांची कुचंबणा होऊन सहलींमधील मजाही निघून जाते. या महामार्गामुळे असे विविध फायदे होत असतानाही काही राजकीय पक्ष आणि काही संघटनांचे नेते राजकीय स्वार्थासाठी या प्रकल्पाला अकारण विरोध करत आहेत. तेव्हा महाराष्ट्राच्या विकासात योगदान देता येत नसेल तरी हरकत नाही, पण त्यांनी विकासाच्या झारीतील शुक्राचार्य न होता विकासाच्या मार्गात खोडे तरी घालू नये.

**शिवराम वैद्य**/९८५०५१८०१८

● ● ● ●

### देही सौभाग्यं आरोग्यम्

कैलास पर्वतावर जगत्पिता महादेव उमेसह वास करतात. श्रावण महिन्यात महादेवाचे पृथ्वीतलावर आगमन अवतरण होते. त्यांचे स्तवन, अर्चन, अभिषेक, आरती प्रार्थना होते. त्यानंतर होते त्यांच्या चिरंजीवांचे 'गणराया'चे आगमन. बुद्धिनायकाचे बालगोपालांसह सगळे स्वागत करतात. नंतर माहेरवाशीण माहेरपणासाठी येते. जगत जननी आदिमायेचे तीन रुपे महाकाली, महालक्ष्मी, महासरस्वती. महालक्ष्मी स्वरूपातील ज्येष्ठा-कनिष्ठा अर्थात गौरीपूजनाचा सण. एक शक्तीची देवी तर दुसरी धनधान्य-ऐश्वर्याची देवी.

'देही सौभाग्यं आरोग्यम् । देहीमे परमं सुखम् ।
रुपं देही जयं देही । यशोदेही द्विषोजही ॥'

अशी अष्टधा लक्ष्मी प्रसन्न असली की मनुष्य ऐश्वर्य संपन्न होतो. 'श्री वर्चस्वं आयुष्यं आरोग्यं । विद्याच्छोभमान महियते ।
धान्यं धनं पशुं बहुपुत्रलाभम् । शतसंवत्सरं दीर्घआयुः ॥'

पूर्ण कुटुंबाचं एकमेकांशी घट्ट नातं निर्माण होतं. असे अनेक एकोप्याचे, आनंदाचे क्षण यामुळे निर्माण होतात. मानवी जीवनाचे उदात्तीकरण विकसित होते. माहेरपण तीन दिवसांचे हा एक मोठा संदेश आहे. जास्त दिवस माहेरात रेंगाळले तर कामकाज थांबते. कधी तरी कुणी एवढा वेळ देण्यास कदाचित असमर्थ असतो. तिकडे सासरचेही मंडळी वाट पाहत असतात. तीच तर कर्मभूमि आहे न नंतरच्या जीवनातील! देवीदेवतांना माहेर हवं तर मग श्रीमंत असो वा गरीब, स्वयंसिद्धा असो वा परावलंबी प्रत्येक मुलीला माहेराची आस असते, आकर्षण असते. तिचे स्वागत झाले तरच तिला माहेरी आल्यासारखे वाटते. ती तिच्या बालपणाच्या सुखद स्मृतीमध्ये रमते. तिच्या आवडीचा साजशृंगार, खानपान झाले तर माहेरवाशीण सुखावते.

**डॉ. उज्ज्वला देशमुख**/९४२२८०७२४७

● ● ● ●

## महत्वाचे...



## करमाळा तालुक्यात काँग्रेस पक्ष संघटना बांधणी जोमाने करणार : सातलिंग शटगार

**सोलापूर, दि. २६ ऑगस्ट-**

कै. नामदेवरावजी जगताप यांच्या काळात जसा काँग्रेस पक्ष मजबूत होता. त्याप्रमाणे काँग्रेस पक्ष मजबुतीसाठी वज्रमुठ बांधून आपण एकत्रित रित्या लढा देऊ.माजी मुख्यमंत्री कै. यशवंतराव चव्हाण, कै. नामदेवराव जगताप, माजी केंद्रीय गृहमंत्री सुशीलकुमार शिंदे यांच्यामुळेच काँग्रेस पक्षाच्या माध्यमातून करमाळा तालुक्याचा विकास झालेला आहे. हे विसरून चालणार नाही. देशाचे गृहमंत्री मा. सुशीलकुमार शिंदे व खासदार प्रणिती शिंदे, प्रांताध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ, निरीक्षक मोहन जोशी यांच्या मार्गदर्शनाखाली करमाळा तालुका काँग्रेस पक्षाची बैठक संपन्न झाली. यावेळी ते बोलत होते. यावेळी व्यासपीठावर करमाळा तालुक्याचे अध्यक्ष प्रतापराव जगताप, जिल्हा उपाध्यक्ष मोतीराम चव्हाण, विमुक्त जाती भटक्या जमाती विभागाचे जिल्हाध्यक्ष लक्ष्मण भोसले ,सिद्राम पवार, भीमराव बंडगर, साहेबराव वाघमारे आदी उपस्थित होते. याप्रसंगी तालुकाध्यक्ष प्रतापराव जगताप, विमुक्त जाती भटक्या जमाती विभागाचे जिल्हाध्यक्ष लक्ष्मण भोसले, सिद्राम पवार आणि साहेबराव वाघमारे यांनी मनोगत व्यक्त केले. सूत्रसंचालन व आभार नितीन चोपडे यांनी केले. यावेळी ओबीसी सेल अध्यक्ष गफुरभाई शेख,भटक्या विमुक्त जाती जमातीचे तालुका अध्यक्ष देवराव सुकळे, युवक काँग्रेसचे तालुकाध्यक्ष साहेबराव वाघमारे, युवक काँग्रेसचे शहराध्यक्ष सुजय जगताप, उपाध्यक्ष अशोकराव घरबुडे, किसान सेलचे अध्यक्ष दादासाहेब कुदळे, उपाध्यक्ष रमजान मुलानी, आनंद झोळ, संदीप झोळ, गणेश फलपले, प्रतीक जगताप, किरण साळुंखे, उत्तरेश्वर सावंत, निलेश पवार, सचिन कटारिया, योगेश राखुंडे, मंगेश चिंचकर उपस्थित होते.



## अक्कलकोट ग्रामीण रुग्णालयात मराठी पत्रकार संघाकडून रुग्णांना केळी वाटप

**अक्कलकोट, दि. २६ ऑगस्ट-**

महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघाचे प्रदेश संघटक संजय भोकरे यांच्या वाढदिवसानिमित्त मंगळवार दिनांक २६ ऑगस्ट रोजी महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघ शाखा अक्कलकोट व डिजिटल मीडिया सोलापूर लोकसभा विभागाकडून अक्कलकोट ग्रामीण रुग्णालय येथे रुग्णांना केळीचे वाटप करण्यात आले. डॉ. रविंद्र बनसोडे वैद्यकीय अधिकारी, लहुजी शक्ती सेनेचे सोलापूर जिल्हा संपर्कप्रमख वसंत देडे, महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाचे राज्य कार्यकारिणी सदस्य स्वामीराव गायकवाड, डिजिटल मीडियाचे सोलापूर लोकसभा जिल्हाध्यक्ष राजेश जगताप, पत्रकार संघाचे पदाधिकारी रमेश भंडारी आदिच्यां हस्ते अक्कलकोट ग्रामीण रुग्णालयातील रुग्णांना, महिला रुग्णानां तसेच रुग्णाच्यां नातेवाईकांनां केळीचे वाटप करण्यात आले. यावेळी डॉ. रविंद्र बनसोडे, वसंत देडे यांनी महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघाचे प्रवेश संघटक संजय भोकरे यांच्या वाढदिवसानिमित्त शुभेच्छा व्यक्त करत या उपक्रमाचे कौतुक केले. याप्रसंगी नर्सिंग ऑफिसर संकेत पुकाळे, श्रीमती पायल वानखेडे श्रीमती राधिका जाधव, तौफिक शेख, माधव जीवनगी, गुरुबसप्पा अल्लापुरे उपस्थित होते.



## सायली ढेबे राज्यस्तरीय पुरस्काराने सन्मानित

**तभा वृत्तसेवा,**
**सांगोला,दि.२६ ऑगस्ट -**

ग्लोबल फौंडेशन व विद्यानिकेतन संस्था, महाराष्ट्र राज्य यांच्या संयुक्त विद्यमाने मुळशी, पुणे येथील सायली बाळू ढेबे यांना त्यांच्या सामाजिक कार्याबद्दल पुरस्कार प्रदान करण्यात आला. सदर कार्यक्रम सोहळा पुणे येथे सावित्रीबाई सभागृह, गंजपेठ येथे पार पडला. याप्रसंगी कोथरूड वारजेचे सहाय्यक आयुक्त विजय नाईकल, महाराष्ट्र राज्य महिला आयोगाच्या रुपालीताई चाकणकर, पुणे महानगरपालिकेचे नगरसेवक युवराज बेलदारे, जॉयझील इंडिया प्रा.ली.चे डायरेक्टर रुपेश टाकळकर, पोलीस उपनिरीक्षक प्रियांका निकम, समाजसेविका प्रीती संघवी उपस्थित होत्या. सदर पुरस्कार प्राप्त झाल्याबद्दल सायली ढेबे यांचे सर्वत्र अभिनंदन होत आहे.

# गणेशोत्सव व्यवस्थित, निर्विघ्नपणे पार पाडण्यासाठी दक्षता घ्यावी : आयुक्त

- आयुक्त डॉ. सचिन ओम्बासे यांचे मिरवणूक मार्ग, विसर्जन कुंड पाहणीत आदेश
- पर्यावरणपूरक विसर्जनासाठी महापालिकेची यंत्रणा सज्ज
- शहरात राहणार ११ कुंड व ६९ मूर्ती संकलन केंद्र

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २६ ऑगस्ट-**

श्री गणेशोत्सव हा शहराचा सांस्कृतिक व धार्मिक वारसा आहे. नागरिकांना कोणताही त्रास होऊ नये यासाठी सर्व विभागांनी समन्वयाने काम करून तयारी पूर्ण करावी. यंदाचा गणेशोत्सव अधिक सुरक्षित, सुव्यवस्थित व पर्यावरणपूरक पद्धतीने निर्विघ्नपणे पार पडेल याची दक्षता घ्यावी, असे आदेश महापालिका आयुक्त डॉ. सचिन ओम्बासे यांनी दिले.

श्री गणेशोत्सवाच्या निमित्ताने सोलापूर महानगरपालिकेचे आयुक्त डॉ. सचिन ओम्बासे यांनी सोलापूर शहरातील मिरवणूक मार्गाची पाहणी केली. यावेळी मध्यवर्ती गणेशोत्सव महामंडळ, लोकमान्य संयुक्त मध्यवर्ती गणेशोत्सव महामंडळ तसेच सर्व मध्यवर्ती मंडळांच्या मिरवणूक मार्गांची पाहणी करण्यात आली. याशिवाय विष्णू घाट, गणपती घाट, छत्रपती संभाजी महाराज तलाव येथील कृत्रिम विसर्जन कुंडांचीही पाहणी करण्यात आली.

यंदा शहरात ११ ठिकाणी कृत्रिम विसर्जन कुंड तसेच ६९ ठिकाणी मूर्ती संकलन केंद्र उभारण्यात येणार असून नागरिकांना सुरक्षित,



सुव्यवस्थित व पर्यावरणपूरक विसर्जनाची सुविधा उपलब्ध होणार आहे.या पाहणी दरम्यान आयुक्त डॉ.सचिन ओम्बासे यांनी संबंधित विभागांना आवश्यक त्या सूचना दिल्या. रस्त्यावरील खड्डे बुजविणे, मिरवणूक मार्गावर पुरेशी प्रकाशयोजना करणे, झाडांच्या फांद्या छाटणे, मिरवणुकीच्या मार्गावरील अडथळा आणणाऱ्या केबल वायरींचे नियोजन करणे, विसर्जन कुंडांवर अधिक प्रकाशयोजना करणे, अधिक अधिकारी, कर्मचारी याची नेमणूक करणे,मिरवणुकीदरम्यान रस्त्यावर जनावरे येणार नाहीत याची काळजी घेणे तसेच मिरवणूक मार्गावर ड्रेनेजचे पाणी वाहणार नाही यासाठी उपाययोजना करण्याचे निर्देश त्यांनी दिले. यावेळी अतिरिक्त आयुक्त संदीप कारंजे, सारिका अक्कलवार, तपन डंके, परदेशी उपस्थित होते.

# पंढरपूर तालुका पोलिसांची अवैध वाळू विरुद्ध मोठी कारवाई

**१० लाख १२ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त**

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि. २६ ऑगस्ट -**

पंढरपूर तालुका पोलीस ठाणे हद्दीतील मौजे चिंचोली भोसे या ठिकाणी गोपनीय माहिती मिळाल्याने आज दिनांक २६ ऑगस्ट २०२५ रोजी सकाळी सात वाजण्याच्या सुमारास पंढरपूर तालुका पोलीस स्टेशनच्या पोलिसांनी भीमा नदी पात्राच्या कडेला जाऊन छापा मारून त्या ठिकाणी अवैधरित्या वाळू चोरी करून जात असलेला टेम्पो ट्रक किंमत दहा लाख आणि त्यामध्ये एकूण दोन ब्रास वाळू किंमत बारा हजार असा

एकूण १० लाख १२ हजार रुपये किमतीचा मुद्देमाल पंढरपूर तालुका पोलिसांनी आज रोजी जप्त करून ट्रक चालक आणि ट्रक मालक यांच्याविरुद्ध बी एन एस कलम ३०३, ,३०५ अन्वये गुन्हा दाखल केलेला आहे. सदरचा ट्रक व वाळूसाठा पंढरपूर तालुका पोलिसांनी जप्त केलेला आहे.

सदरची कारवाई माननीय पोलीस अधीक्षक अतुल कुलकर्णी, अपर पोलीस अधीक्षक प्रीतम यावलकर, सहाय्यक पोलीस अधीक्षक प्रशांत डगळे यांच्या मार्गदर्शनाखाली पंढरपूर तालुका पोलीस स्टेशनचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक टी. वाय. मुजावर, पोलीस उपनिरीक्षक श्री. वडणे, पोलीस हवालदार संजय गुटाळ, विजयकुमारआवटी, आबा शेंडगे,सय्यद घंटे यांच्या पथकाने कारवाई केली.

दरम्यान या कारवाई मध्ये एक टैम्पो ट्रक ( नंबर एम.एच.१० सी.आर ०७८०) पोलिसांनी वाळू सह जप्त केल्याची माहिती तालुका पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक टी.वाय. मुजावर यांनी दिली.

# खुल्या जागा सोसायटीस हस्तांतरित आणि विकासासाठी महापालिकेची कार्यपद्धती निश्चित

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २६ ऑगस्ट-**

शहरातील खुल्या जागा सोसायटीस हस्तांतरित करण्यासाठी तसेच त्यांच्या विकासाकरिता महापालिकेने कार्यपद्धती निश्चित केली आहे.

यासंदर्भात महापालिकेने प्रसिद्ध दिलेल्या पत्रकात म्हटले आहे की, सोलापूर शहर हद्दीमधील रहिवास विभागातील जमिनींचे रेखांकन उपसंचालक नगररचना यांच्या कार्यालयाकडून मंजूर करण्यात येतात. या रेखांकनामधील खुल्या जागा (ओपन स्पेस) निश्चित



करण्यात आलेल्या असतात. खुल्या जागा सोसायटीस हस्तांतरित करण्यासाठी तसेच त्यांच्या विकासाकरिता पुढील कार्यपद्धती निश्चित करण्यात आली आहे.

विकासक/सोसायटी यांना युडीसीपीआर नियमावली मधील नियम क्र ३.४.७ नुसार १०% पर्यंत विकास कामे करता येईल. परंतु याकरिता संबंधित विकासक/सोसायटीने सर्व संमत्तीने प्रस्ताव दाखल केल्यास त्यास युडीसीपीआरच्या तरतुदीनुसार उपसंचालक, नगर रचना यांच्यामार्फत कार्यवाही करण्यात येईल.

रेखांकनामधील खुल्या जागा या महानगरपालिकेच्या नावाने असतात. त्याअनुषंगाने युडीसीपीआरमधील तरतुदीनुसार विकासकांनी या रेखांकनामध्ये सोसायटी स्थापन केल्यास सोसायटीचे नाव दाखल करण्यास, ना-हरकत प्रमाणपत्र देण्यास उपसंचालक, नगर रचना यांना प्राधिकृत करण्यात आले आहे. तसेच जागेच्या नोंदीच्या अनुषंगाने पुढील कार्यवाही उपायुक्त, भूमी व मालमत्ता यांना प्राधिकृत केले आहे, असे महापालिकेच्या प्रसिद्धीपत्रकात नमूद आहे.

**IDFC FIRST Bank Limited**
(erstwhile Capital First Limited, amalgamated with IDFC Bank Limited and presently known as IDFC First Bank Limited) | CIN : L65110TN2014PLC097792
Registered Office: - KRM Towers, 8th Floor, Harrington Road, Chetpet, Chennai- 600031.
Tel : +91 44 4564 4000 | Fax: +91 44 4564 4022
IDFC FIRST Bank

**आर्थिक मालमत्तेचे सुरक्षा आणि पुनर्बांधणी आणि सुरक्षा व्याज अंमलबजावणी कायदा, २००२ च्या कलम १३ (२) अंतर्गत सूचना**

खालील कर्जदार आणि सह-कर्जदारांनी **आयडीएफसी फर्स्ट बँक लिमिटेड (पूर्वी कॅपिटल फर्स्ट लिमिटेड, आयडीएफसी बँक लिमिटेडमध्ये** विलीन झालेले आणि सध्या **आयडीएफसी फर्स्ट बँक लिमिटेड** म्हणून ओळखले जाणारे) कडून खाली नमूद केलेली सुरक्षित कर्जे घेतली. खाली नमूद केलेल्या कर्जदार आणि सह-कर्जदारांची कर्जे त्यांच्या संबंधित मालमत्तेच्या गहाणखताने सुरक्षित करण्यात आली आहेत. त्यांनी संबंधित कर्ज करारांच्या अटी आणि शर्तींचे पालन करण्यात अयशस्वी झाल्यामुळे आणि अनियमित झाल्यामुळे, आरबीआयच्या मार्गदर्शक तत्त्वांनुसार त्यांचे कर्ज एनपीए म्हणून वर्गीकृत करण्यात आले. **आयडीएफसी फर्स्ट बँक लिमिटेड (पूर्वीची कॅपिटल फर्स्ट लिमिटेड, आयडीएफसी बँक लिमिटेडमध्ये** विलीन झालेली आणि सध्या **आयडीएफसी फर्स्ट बँक लिमिटेड** म्हणून ओळखली जाणारी) यांना त्यांच्याकडून देय असलेल्या रकमा खालील तक्त्यात अधिक स्पष्टपणे वर्णन केलेल्या संबंधित सूचनांनुसार नमूद केल्या आहेत आणि त्या रकमेवरील पुढील व्याज देखील लागू असेल आणि ते त्यांच्या संबंधित तारखांपासून लागू होणाऱ्या कराराच्या दरानुसार आकारले जातील.

| अं. क्र. | कर्ज खाते क्र. | कर्जाचा प्रकार | कर्जदार आणि सह-कर्जदारांची नावे | कलम १३ (२) सूचना दिनांक | कलम १३ (२) सूचनेनुसार थकबाकीची रक्कम |
|---|---|---|---|---|---|
| 1 | 129107780 | मालमत्तेवर कर्ज | 1. भारत नागनाथ सारक<br>2. निकीता भारत सारक | 19/07/2025 | INR 7,17,747.84/- |

**मालमत्तेचा पत्ता :** बांधकामाचा सर्व भाग आणि पार्सल प्रॉपर्टी बेअरिंग प्रॉपर्टी बेअरिंग प्रॉपर्टी बेअरिंग जीपी मिळकत क्रमांक 227/1, क्षेत्रफळ 1900 चौ. फूट, बिल्ट-अप क्षेत्र 900 चौ. फूट, निमगाव (टीई) बडालेवाडी येथे स्थित, तालुका : माढा, जिल्हा : सोलापूर, महाराष्ट्र-413210, आणि पूर्वेकडील सीमा : पांडुरंग वाघमोडे, पश्चिम : बालाजी वाघमोडे, दक्षिण : रस्ता, उत्तर : दादा सारक.

या प्रकाशनाच्या तारखेपासून 60 दिवसांच्या आत तुम्हाला वरील तक्त्यात दाखवलेल्या तपशीलांनुसार **आयडीएफसी फर्स्ट बँक लिमिटेड (पूर्वीची कॅपिटल फर्स्ट लिमिटेड, आयडीएफसी बँक लिमिटेडमध्ये** विलीन झालेली आणि सध्या **आयडीएफसी फर्स्ट बँक लिमिटेड** म्हणून ओळखली जाणारी) कडे रक्कम त्यांच्या संबंधित तारखांपासून आणि इतर खर्च, शुल्क इत्यादींपासून करारबद्ध व्याजदरासह भरण्याचे आवाहन करण्यात येत आहे. असे न केल्यास, वर नमूद केलेल्या गहाण ठेवलेल्या मालमत्तेविरुद्ध कलम 13 (4) आणि कलम 14 अंतर्गत, **आयडीएफसी फर्स्ट बँक लिमिटेड (पूर्वीची कॅपिटल फर्स्ट लिमिटेड, आयडीएफसी बँक लिमिटेडमध्ये** विलीन झालेली आणि स**ध्या आयडीएफसी फर्स्ट बँक लिमिटेड** म्हणून ओळखली जाणारी) देय रक्कम वसूल करण्यासाठी कार्यवाही सुरू करण्यास अधीन असेल. शिवाय, तुम्हाला सदर कायद्याच्या कलम 13 (13) अंतर्गत सदर सुरक्षित मालमत्ता विक्री/भाडेपट्टा किंवा इतर प्रकारे हस्तांतरित करण्यास मनाई आहे.

**सही/- अधिकृत अधिकारी**
**आयडीएफसी फर्स्ट बँक लिमिटेड (पूर्वीचे कॅपिटल फर्स्ट लिमिटेड, आयडीएफसी बँक लिमिटेडमध्ये एकत्र केलेले आणि सध्या आयडीएफसी फर्स्ट बँकलिमिटेड म्हणून ओळखले जाते)**

**दिनांक : 27/08/2025**
**स्थळ : सोलापूर, महाराष्ट्र**

## खरेदीपूर्व जाहीर नोटीस

सोलापूर जिल्ह्यातील तमाम लोकांस विशेषतः शहर सोलापूर व आजूबाजूच्या भागातील सर्व रहिवाशांना या खरेदीपुर्व जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की,

मिळकतीचे वर्णनः- डि ।। व सब डि सोलापूर पैकी मौजे मंगळवेढा, तालुका मंगळवेढा येथील गट क्र. ३४१८/१, क्षेत्र ००.२० आर. यांसी आकार रु.०-५४ पैसे. यासी चतुःसिमा- पूर्वेस-गट क्र. ३४१८/२, दक्षिणेस- गट क्र. ३४१८/१ पैकी जमीन महालिंग हरीबा माळी व वैभव म. माळी यांची शेतजमीन, पश्चिमेस गट क्र.३४१७/२ व उत्तरेस गट क्र. ३४२२ नेने यांची जमीन, येणेप्रमाणे चतुः सिमेतील शेतजमीन.

सदरची वर नमूद शेतजमीन ही **संगिता दत्तात्रय अश्रवे** यांच्या मालकी व कब्जेवहिवाटीची आहे. त्यांनी सदरची शेतजमीन ही **आमचे अशिल-महालिंग हरीबा माळी व वैभव महादेव माळी** यांना खुषखरेदी देण्याचे ठरवून, आमचे अशिलांबरोबर तोंडी करार झालेला आहे. सदरची शेतजमीन ही निर्वेध व निजोखमी असल्याचा व ती त्यांनी यापुर्वी कोणासही विक्री, ट्रान्सफर, गहाण, दान, टाच, लीज अथवा अन्य मार्गाने गुंतविलेली नाही, अशी हमी त्यांनी आमचे अशिलांना दिलेली आहे. तरी सदरहू मिळकतीवर जर कोणाचा मालकी हक्क, हितसंबंध, कब्जा, गहाण, लीज, लीन, इजमेंट राईट, कोर्टाची टाच, वित्त संस्थेचा बोजा, अगर इतर बँकेचा बोजा वगैरे काही असल्यास सदर नोटीस प्रसिध्द झाल्यापासून ७ (सात) दिवसांच्या आत खालील दिलेल्या पत्यावर समक्ष भेटून आपल्या हरकती, तक्रारी, लेखी स्वरुपात नोंदवाव्यात. जर वरील मुदतीत कोणाची हरकत न आल्यास आमचे अशिल खरेदीचा व्यवहार पुर्ण करतील. तद्नंतर कोणाचाही, कसल्याही प्रकारची तक्रार अगर हरकत आमचे अशिलांवर बंधनकारक असणार नाही, याची नोंद घ्यावी.

ही खरेदीपुर्व जाहीर नोटीस दिली ता. २६/०८/२०२५.

**सही/-**
**अशिल**

**सही/-**
**ॲड. नाना विठ्ठल चव्हाण**
रा.१३१, सिध्देश्वर पेठ, बी.एम.सी. बँक लि. च्या दुसऱ्या मजल्यावर, चेंबर नं.२०८, सिव्हील लाईन, सोलापूर.

## जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, सोलापूर

मध्यवती प्रशासकिय इमारत, ई ब्लॉक, पहिला मजला, जुना जिल्हाधिकारी कार्यालय आवार, सोलापूर-४१३००१
दुरध्वनी क्र. ०२१७-२६२९७४९

जा.क्र. कक्ष ४/पत/ लिलाव मंजूरी/सुनावणी /३७३६/२०२५ दिनांक: २६/०८/२०२५

**जाहिर अंतिम सुनावणी नोटीस**

प्रति,
कर्जदार (मालमताधारक) : १ मनिषा रामचंद्र कोकाटे
रा.मु.पो. तांबोळे, ता. मोहोळ, जि. सोलापूर.

विषय : महाराष्ट्र सहकारी अधिनियम १९६० चे नियम १०७ (१४) (३) अन्वये विक्रिस मान्यता मिळणेबाचत....

संदर्भ : व्यवस्थापक वसुली अधिकारी, सदगुरु ग्रामिण बिगर शेती सहकारी पतसंस्था मर्या, मोहोळ, जि. सोलापूर. यांचे विषयांकीत प्रस्ताव.

उपरोक्त संदर्भिय विषयाकडे आपले लख वेधण्यात येत आहे.

उक्त विषयास अनुसरुन व्यवस्थापक / वसुली अधिकारी, सदगुरु ग्रामिण बिगर शेती सहकारी पतसंस्था मर्या, मोहोळ, जि. सोलापूर यांनी संदर्भिय प्रस्तान्वये आपले खालील मालमत्तेचे महाराष्ट्र सहकारी अधिनियम १९६० चे नियम १०७ (१४) (३) अन्वये विक्रिस मान्यता मिळणेबाबत प्रस्ताव सादर केलेला आहे.

| अ.क्र. | मिळकतदाराचे नांव | मिळकत तपशील व ठिकाण |
|---|---|---|
| १ | मनिषा रामचंद्र कोकाटे रा.मु.पो. तांबोळे, ता. मोहोळ, जि. सोलापूर, | मोजे तांबोळे, ता. मोहोळ, जि. सोलापूर येथील गट क्र. ७७ क्षेत्र ०.७९ हे. आर व पोटखराब ०.१६ हे. आर |

सदर प्रस्तावास अनुत्तरुन या कार्यालयात दि. २५/०८/२०२५ रोजी सुनावणी ठेवण्यात आली होतो. परंतु सदर सुनावणीस आपण गैरहजर होते.

सबब आपणास कळविण्यात येते की सदर बाबत या कार्यालयात दि. ०८/०९/२०२५ रोजी दु. २.०० वाजता सुनावणी ठेवण्यात आली आहे. सदर सुनावणीवेळी आपण आपले म्हणणे सादर करणेत्तसाठी उपस्थित रहावे. सुनावणीवेळी आपण गैरहजर राहिल्यास याबाबत अपले काही म्हणणे नाही असे गृहित धरुन पुढील कार्यवाही करण्यात येईल.

**सही/-**
**जिल्हा उपनिबंधक**
**सहकारी संस्था, सोलापूर**

## खरेदीपूर्व जाहीर नोटीस

तमाम जनतेस विशेषतः सब डी. सोलापूर, ता. बार्शी, व मौजे ताडसौंदणे व आसपासचे परिसरातील जनतेस या जाहीर नोटीसीद्वारे कळवण्यात येते की,

डि सोलापुर सब डि व ता. बार्शी पैकी बार्शी मौजे ताडसौंदणे येथील गट नं. १६३/ड, याचे क्षेत्रफळ हे ०१-०५ आर, याचा आकार रु. ०१.८३ पैसे, यासी चतुः सिमा पुर्वेस गट नं. १६३/क, दक्षिणेस - बार्शी शिवरस्ता, पश्चिमेस- गट नं. १६४ ची जमीन व उत्तरेस ताडसौंदणे रस्ता, येणेप्रमाणे मिळकत आतील सर्व तद्ंगभुत वस्तुसह,

येणेप्रमाणे वरील वर्णन केलेली मिळकत ही **श्री दिनकर भगवान सातनाईकर** रा. विष्णु पद्म निवास, साईबाबा मंदिरा जवळ, ९८, आदर्श नगर, नागणे प्लॉट, गाडेगांव रोड, बार्शी, बार्शी जि. सोलापुर यांचे स्वसंपादित खरेदी मालकीची व प्रत्यक्ष कब्जे वहिवाटीची असुन ७/१२ हक्कपत्रकी त्यांचे नावे दाखल असुन त्यांनी सदर मिळकत त्यांचे कौटुंबिक व कायदेशीर गरजेपोटी आमचे पक्षकारास कायम खुशखरेदी देण्याचा ठराव करुन इसारा दाखल रक्कम **सौ. पुनम बाबासाहेब मुलाणी** यांच्याकडुन घेतलेली आहे. खरेदी देणार यांनी सदर मिळकतही निर्वेध, निजोखमी असल्याची खात्री आमचे पक्षकारास दिलेली आहे. तसेच त्यांनी सदरची मिळकत ही निर्वेध व निजोखमी खरेदी देण्याचे मान्य व कबुल केले आहे.

या हि ऊपर सदर मिळकती बाबत कोणाचे कसलेही कायदेशीर अधिकार, हक्क, साठेकरार, खरेदीखत, भाडेपट्टा करार, कुळ, वहिवाट, वहिवाटीचे अधिकार, मालकीहक्क, वारसा, गहाण, बटईपत्र, पोटगी, चोळी बांगडी अथवा विकसन करार इत्यादी वा अन्य कोणतेही कायदेशीर हक्क अधिकार असल्यास त्यांनी खालील नमुद पत्त्यावर योग्य त्या कागदपत्रा निशी व पुराव्यासह हे जाहीर प्रसिध्दीकरण प्रसिध्द झाल्यापासुन ०७ (सात) दिवसांचे आत लेखी हरकत कळवावी. अन्यथा वरील नमुद मुदतीत कोणाचीही लेखी हरकत न आल्यास आमचे पक्षकार हे सदर मिळकतही निर्वेध, निजोखमी, बिनबोजाची असल्याची प्रामाणिकपणे गृहित धरुन खरेदी देणार यांचे बरोबर ठरलेल्या अटी व शर्ती प्रमाणे खरेदीचा व्यवहार पुर्ण करतील. मागाहून कोणाचीही कसलीही तक्रार चालणार नाही. कोणाचीही फसगत होवु नये म्हणुनही जाहीर नोटीस दिली असे. ता.२६/०८/२०२५

**सही/-**
**गणेश बी. अंधारे**
एलएल.बी. एलएल.एम, शिवाजी नगर, बार्शी. मो. ७०७१७१५५५५
खरेदी घेणार तर्फे ॲडव्होकेट

## वैराग नगरपंचायत, वैराग

आज़ादी का अमृत महोत्सव

ता. बार्शी, जिल्हा. सोलापूर
स्थापनाः- दि. १८/०५/२०२१

**माझी वसुंधरा अभियान ६.0 अंतर्गत फटाके बंदी व ध्वनी प्रदुषणबाबत जाहीर आवाहन**

ULB CODE -900860

**फटाके बंदी**

वैराग शहरातील सर्व नागरिकांना सूचित करण्यात येते कि, भारत सरकार, अधिसूचना क्रमांक G.S.R. 682 (E) dt. ५.१०.१९९९ अन्वये १२५ dB (A १) पेक्षा जास्त आवाज निर्माण करणाऱ्या फटाक्यांची निर्मिती, विक्री किंवा वापर करण्यास मनाई केली आहे. अशा फटाक्यांचे उत्पादन, विक्री किंवा वापर बेकायदेशीर आहे. तसेच जागतिक आरोग्य मार्गदर्शक तत्त्वांनुसार औद्योगिक क्षेत्रामध्ये ७० db, व्यावसायिक क्षेत्रामध्ये ५० db, रहिवाशी क्षेत्रामध्ये ४५ db पेक्षा जास्त आवाजाचे फटाके वाजवण्यास मनाई आहे व शांतता क्षेत्र जसे की दवाखाने, शैक्षणिक संस्था, न्यायालयाच्या ठिकाणी ४० db पेक्षा जास्त व सदर शांतता क्षेत्राच्या १०० मीटरच्या आवारात फटाके वाजवण्यास मनाई आहे.

तसेच आपणा सर्वांना माहितीच आहे कि आपण वातावरणीय बदलास सामोरे जात आहोत. वातावरणीय बदलाच्या अनेक कारणांपैकी हवेचे प्रदूषण हे एक महत्वाचे कारण आहे. विविध सण उत्सव प्रसंगी आपण वाजवत असलेल्या फटाक्यांमध्ये कार्बन व सल्फरचे प्रमाण अधिक असते. जे विषारी वायूची श्रेणी तयार करतात हे वायू वनस्पती, पक्षी, प्राणी तसेच मानवी प्रजातीस हानी पोहोचवतात. हवेचे प्रदुषण थांबवण्याची क्रिया आपण स्वतःपासून सुरु करु शकतो. सबब माझी वसुंधरा अभियानांतर्गत येणाऱ्या सण/उत्सवात फटाके वाजविण्यास प्रतिबंध करण्यात येत आहे. तरी सर्व नागरीकांनी याची अंमलबजावणी करावी, असे आवाहन करण्यात येत आहे.

**ध्वनी प्रदुषण**

वैराग शहरातील सर्व नागरिकांना सूचित करण्यात येते कि, ध्वनी प्रदुषण म्हणजे त्रासदायक ध्वनी ज्याचा मानव आणि प्राण्यांच्या आरोग्यावर दुष्परिणाम होतो. नैसर्गिक घटना आणि मानवी कृतीमुळे ध्वनी प्रदुषण होते. यामध्ये मुख्यकारण म्हणजे औद्योगिक सुविधा, लाऊडस्पीकर, हॉर्न, फटाके इ. उच्च आवाजात वापरलेस ध्वनी प्रदुषण होते. तसेच वैराग शहरामध्ये साजरे केले जाणाऱ्या घरगुती व सार्वजनिक कार्यक्रमांमध्ये, सण/उत्सवांमध्ये रात्री १०.०० वाजलेनंतर रहिवासी क्षेत्रामध्ये ४५ dB येवढी मर्यादा ठेवणेसाठी क्षमतेपेक्षा जादा आवाजाचे लाऊडस्पीकर, फटाके ध्वनी प्रदुषण करणारे घटक वाजवण्यात येऊ नयेत. तसे आढळून आल्यास ध्वनी प्रदुषण (नियमन आणि नियंत्रण) नियम २००० अंतर्गत कायदेशीर कारवाई करणेत येईल.

**आवाजाच्या संदर्भात परिसरातील हवेची गुणवत्तेची मानके**

| क्षेत्र | ध्वनीची मर्यादा | |
|---|---|---|
| | दिवसाची वेळ (सकाळी ६.०० ते रात्री १०.००) | रात्रीची वेळ (रात्री १०.०० ते सकाळी ६.००) |
| औद्योगिक क्षेत्र | ७५ dB | ७० dB |
| व्यावसायिक क्षेत्र | ६५ dB | ५५ dB |
| रहिवासी क्षेत्र | ५५ dB | ४५ dB |
| शांतता क्षेत्र | ५० dB | ४० dB |

येणारा श्री गणेश चतुर्थीचा सण हरित व पर्यावरणपूरक म्हणून साजरा करूयात. तसेच हा श्री गणेश चतुर्थीचा सण आनंदी व सुरक्षित राहो अशा सर्वाना हार्दिक शुभेच्छा!

**सही/-**
**(विद्या पाटील)**
**मुख्याधिकारी,**
**वैराग नगरपंचायत, वैराग**

## करमाळा नगर परिषद

- जनसेवा हिच ईश्वर सेवा-
करमाळा - ४१३ २०३ जि.सोलापूर (महाराष्ट्र)
स्थापना :-१८६७

E-mail - comckarmala@gmail.com | नगरपरिषद कार्यालय : (०२१८२) २२०३१५
जावक क्रमांक आरोग्य विभाग /१००९/२०२५ | दिनांक २६/०८/२०२५

**जाहिर प्रसिध्दीकरण**
**करमाळा नगरपरिषद, करमाळा जि. सोलापूर**
**आरोग्य विभागाकडील जाहिर निविदा सन २०२५-२६ करीता**

| विभागाचे नाव | | कामाचे स्वरूप आणि साहित्याचा तपशील | अंदाजे परिमाण | टेंडर फॉर्मची किंमत | बयाणा रक्कम |
|---|---|---|---|---|---|
| आरोग्य व स्वच्छता विभाग | १) | न.पा. मालकीच्या वाहनांना टायर व ट्युबचा पुरवठा करणे. | ३ लक्ष | २००/- | २०००/- |
| | २) | न.पा. मालकीच्या वाहनांचे सर्व्हसींग व मेन्टनन्सचे काम करणे | ५ लक्ष | २००/- | २०००/- |
| | ३) | न.पा. मालकीच्या वाहनांना बॅटरीचा पुरवठा करणे. | ३ लक्ष | २००/- | २०००/- |
| | ४) | न.पा. मालकीच्या सार्वजनिक शौचालयाचा मैला उपसा करणे कामी सक्शन मशीन भाड्याने पुरवठा करणे. | ५ लक्ष | २००/- | २०००/- |
| | ५) | आरोग्य विभागाकडे जे.सी.बी. भाड्याने पुरवठा करणे. | ९.९० लक्ष | ५००/- | ५०००/- |
| | ६) | आरोग्य विभागाकडे माझी वसुंधरा, स्वच्छ सर्वेक्षण व इतर आवश्यक कामी डिजीटल बॅनर छपाई करून देणे. | ३ लक्ष | ५००/- | २०००/- |
| | ७) | आरोग्य विभागाकडे शौचालये साफ-सफाई करीता साहित्य व कर्मचारी सुरक्षतीतता अनपुंगीक साहित्य पुरवत करणे | ३ लक्ष | ५००/- | २०००/- |

वरील प्रमाणे हाती घेण्यात आलेल्या ऑफलाइन पध्दतीने निविदा मागविण्यात येत आहेत. कोरो निविदा संच अटी व शर्ती आरोग्य विभागाकडे दि. २८/०८/२०२५ ते दि.०३/०९/२०२५ अखेर पर्यंत उपलब्ध आहेत. तरी इच्छुक निविदाधारकांनी दि.०३/०९/२०२५ रोजी दुपारी ५.०० वाजेपर्यंत व्दि-लिफाफा पध्दतीत आपली निविदा सादर करण्यात यावी. विहीत मुदतीनंतर आलेल्या निविदांचा विचार केला जाणार नाही. तसेच वरील नमूद निविदा कोणतेही कारण न-देता रद्द करणेचे अधिकार मा. मुख्याधिकारी करमाळा नगरपरिषद यांनी राखून ठेवलेले आहेत.

**सही/-**
**(सचिन तपसे)**
**मुख्याधिकारी**
**करमाळा नगरपरिषद**

## महत्त्वाचे

### जागतिक बॅडमिंटनमध्ये सिंधू, प्रणॉयची आगेकूच



**पॅरिस** : मंगळवार पॅरिसमध्ये झालेल्या जागतिक बॅडमिंटन स्पर्धेत महिला एकेरीच्या अंतिम ६४ च्या फेरीच्या सामन्यात भारतीय बॅडमिंटनपटू पी. व्ही. सिंधूने सुरुवातीच्या अडचणींवर मात करत बल्गेरियाच्या कालोयाना नालबांटोवा हिच्यावर २३-२१, २१-६ असा विजय नोंदविला व पुढील फेरीत रप्रवेश केला. पुरुष एकेरीत, एच. एस. प्रणॉयने फिनलंडच्या जोआकिम ओल्डॉर्फविरुद्ध ४७ मिनिटांच्या कठीण सामन्यात २१-१८, २१-१५ असा विजय मिळवला. दोन्ही खेळाडू नाहक चुका करत होते, मात्र यादरम्यान प्रणवने आपल्या खेळात सुधारणा करत आगेकूच केली. तथापि, प्रणॉयचा सामना दुसऱ्या मानांकित डेन्मार्कच्या अँण्डर्स अँटोनसेनशी होऊ शकतो. अँण्डर्सला पहिल्या फेरीच्या सामन्यात ब्राझीलच्या जोनाथन मॅटियासशी सामना करावा लागणार आहे. सिंधूसाठी, ही ३० वर्षीय भारतीय खेळाडूसाठी आदर्श सुरुवात नव्हती कारण ती पहिल्या गेममध्ये ०-४ ने पिछाडीवर होती. त्यानंतर अनेक अनफोर्स्ड चुका झाल्यानंतर नालबांटोव्हाने ९-५ ने पुढे जाण्याचा दबाव कायम ठेवला आणि मध्यांतरात प्रवेश केला आणि ११-७ अशी आघाडी घेतली होती.

### गोव्याला २०२५ विश्वचषकाचे अधिकृत यजमानपद प्रदान

**पणजी** : गोवा ३० ऑक्टोबर ते २७ नोव्हेंबर या कालावधीत बुद्धिबळ विश्वचषक २०२५ स्पर्धेचे आयोजन करणार आहे, अशी आंतरराष्ट्रीय बुद्धिबळ महासंघाने मंगळवारी पुष्टी केली. आठ फेऱ्यांच्या या नॉकआउट स्पर्धेसाठी जगभरातील २०६ खेळाडू भारताच्या पश्चिम किनाऱ्यावर असतील. तथापि, पाच वेळा विजेता नॉर्वेचा मॅग्नस कार्लसन या स्पर्धेत सहभागी होण्याची शक्यता नाही. प्रत्येक फेरी जिंका किंवा घरी जा, ज्यामुळे विश्वचषक कॅलेंडरवरील सर्वात नाट्यमय स्पर्धांपैकी एक बनतो. २०२६ च्या कॅण्डिडेट्स स्पर्धेसाठी अव्वल तीन अंतिम फेरीत पात्र ठरतात. गोव्याचे आश्चर्यकारक समुद्रकिनारे, उत्साही संस्कृती आणि उबदार आदरातिथ्य या जागतिक स्पर्धेसाठी एक रोमांचक पृष्ठभूमी बनवते. खेळाडू आणि चाहते त्याच्या ऊर्जा आणि आकर्षणासाठी प्रसिद्ध असलेल्या ठिकाणासोबत जागतिक दर्जाचे बुद्धिबळ अनुभवतील.

### डायमंड लीग फायनलमध्ये नीरजसमोर कठीण आव्हान

**झुरिच** : भारताचा स्टार भालाफेकपटू नीरज चोप्रा गुरुवारी स्वित्झर्लण्डमधील झुरिच येथे डायमंड लीग (डीएल) फायनलचे विजेतेपद परत मिळवण्याचा प्रयत्न करेल. त्याच्यासमोर अँण्डरसन पीटर्स आणि ज्युलियन वेबर सारख्या बलाढ्य प्रतिस्पर्ध्यांचे आव्हान असेल. ब्रुसेल्समधील प्रतिष्ठित मालिकेच्या शेवटच्या टप्प्यात खेळू न शकलेल्या दोन वेळा ऑलिम्पिक पदक विजेत्या चोप्राने २०२२ मध्ये डीएल ट्रॉफी जिंकली होती आणि २०२३ आणि २०२४ मध्ये तो उपविजेता राहिला होता. चार पात्रता फेरीपैकी दोन टप्प्यात भाग घेत चोप्राने या वर्षीच्या डीएल फायनलसाठी चौथ्या स्थानावर राहून पात्रता मिळवली. २७ वर्षीय विद्यमान विश्वविजेत्याने मे महिन्यात दोहा लेगमध्ये ९०.२३ मीटर फेक करत ९० मीटरचा टप्पा गाठला होता, परंतु त्याला जर्मनीच्या वेबरच्या मागे दुसऱ्या स्थानावर समाधान मानावे लागले. त्यानंतर जूनमध्ये त्याने ८८.१६ मीटरच्या प्रयत्नाने पॅरिस लेग जिंकला. चोप्रासोबत पाच इतर भालाफेकपटू- अँण्ड्रियन माडरि, गतविजेता पीटर्स, केशॉर्न वॉलकॉट, ज्युलियन वेबर आणि ज्युलियस येगो - यांनीही या स्पर्धेत स्थान मिळवले.



### सुयश विद्यालयाच्या रुद्र राऊतची जिल्हा कराटे स्पर्धेसाठी निवड

**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी, दि. २६ ऑगस्ट-**

अर्णव प्रशाला वैराग येथे झालेल्या शालेय तालुका कराटे स्पर्धेयेथील सुयश विद्यालयातील इ. ८ वीतील विद्यार्थी रुद्र सुधीर राऊत याने १७ वर्षे मुलांच्या ३५ किलो वजनी गटात प्रथम क्रमांक पटकाविला. या कामगिरीवर त्याची जिल्हा स्पर्धेसाठी निवड झाली. त्याचे विद्यालयाचे संस्थापक शिवदास नलवडे, मार्गदर्शिका प्रतिभा नलवडे, प्रसाद नलवडे, मुख्याध्यापिका अलका जगताप, उपमुख्याध्यापक संदीप येवले, क्रीडा शिक्षक अतुल जाधव तसेच कला, सांस्कृतिक व शारीरिक शिक्षण विभाग व सुयश संकुलातर्फे अभिनंदन करून पुढील स्पर्धेसाठी शुभेच्छा दिल्या.

# भारतीय महिला संघाला सुवर्णपदक

### आशियाई नेमबाजी स्पर्धा

**श्यामकेंटस, २६ ऑगस्ट**

येथे सुरु असलेल्या आशियाई नेमबाजी अजिंक्यपद स्पर्धेत भारताने महिलांच्या ५० मीटर रायफल ३-पोझिशन प्रकारात सुवर्णपदक जिंकले.

ऑलिम्पिकपटू सिफ्ट कौर समराने आघाडीवर राहून नेतृत्व केले आणि महिलांच्या ५० मीटर रायफल ३-पोझिशन प्रकारात भारताला सुवर्णपदक मिळवून दिले.

विश्वविक्रमधारक सिफ्ट कौरने ५८९ गुणांची उत्कृष्ट कामगिरी केली, तर आशी चौकसीने ५८६ गुणांची कामगिरी केली व अंजुम मुदगीलने ५७८ गुणांची कामगिरी केली. या तिघांनी १७५३ गुणांसह अव्वल स्थान पटकावले. जपानने १७५० गुणांसह आणि दक्षिण कोरियाने १७४५ गुणांसह कांस्यपदक जिंकले.



सिफ्ट कौर समरा-आशी चौकसी

सिफ्ट कौर समरा व आशीने वैयक्तिक अंतिम फेरीत प्रवेश केला आणि पात्रता फेरीत दुसऱ्या व पाचव्या स्थानावर राहून स्थान मिळवले.

पण पात्रता फेरीत अव्वल स्थान पटकावणारी आणखी एक भारतीय श्रियंका सदंदी रँकिंग पॉइंट्स ओन्ली (आरपीओ) प्रकारात भाग घेत असल्याने, समरा व आशीने वैयक्तिक आठ नेमबाजांच्या अंतिम फेरीत प्रथम आणि चौथे स्थान पटकावले.

वरिष्ठ व्यावसायिक व दोन वेळा ऑलिम्पियन अंजुम ४१ नेमबाजांच्या उच्च दर्जाच्या क्षेत्रात २२ व्या स्थानावर राहिली. सोमवारी, राष्ट्रीय क्रीडा विजेती नीरू धांडाने महिला ट्रॅप प्रकारात सुवर्णपदक जिंकले. (वृत्तसंस्था)

# प्रज्ञानंद संयुक्त आघाडीवर; गुकेश पराभूत



विजयानंतर अलिरेझाशी हस्तांदोलन करताना आर. प्रज्ञानंद

### सिंक्विफिल्ड चषक बुद्धिबळ

**सेंट लुईस, २६ ऑगस्ट**

ग्रॅण्ड चेस टूरचा भाग असलेल्या सिंक्विफिल्ड चषक बुद्धिबळ स्पर्धेच्या सातव्या फेरीत भारतीय ग्रॅण्डमास्टर आर. प्रज्ञानंदने फ्रेंच खेळाडू अलिरेझा फिरोझावर सहज विजय मिळवत संयुक्त आघाडी प्राप्त केली. मात्र, जागतिक विजेता डी. गुकेशला अमेरिकन वेस्ली सोने हरवले होते.

सलग अनिर्णित सामन्यांनंतर मिळालेल्या दुसऱ्या विजयासह, प्रज्ञानंदने अमेरिकेच्या फॅबियानो कारुआनासोबत ४.५ गुणांसह गुणतालिकेच्या अव्वल स्थानी झेप घेतली. प्रज्ञानंद व कारुआना आघाडीवर असल्याने, लेव्हॉन आरोनियन आणि वेस्ली सो आता प्रत्येकी चार गुणांसह तिसऱ्या स्थानावर आहेत, तर मॅक्सिम वॉचियर-लाग्राव्ह, पोलंडचा डुडा जान-क्रिजस्टोफ आणि अमेरिकेचा सॅम्युअल सेव्हियन पन्नास टक्के गुणांसह संयुक्तपणे पाचव्या स्थानावर आहेत. गुकेश व अलिरेझा प्रत्येकी तीन गुणांसह गुणतालिकेत दुसऱ्या स्थानावर आहेत. नोदिरबेक अब्दुसत्तोरोव्ह केवळ १.५ गुणांसह शेवटच्या स्थानावर राहतील.

मागील दोन फेऱ्यांमध्ये एकही निर्णायक सामने झाले नाही, त्यामुळे शांतता निर्माण झाली, त्यानंतर सातव्या फेरीत १० खेळाडूंच्या या स्पर्धेत संभाव्य पाचपैकी तीन निर्णायक खेळ झाले.

अलिरेझा व गुकेशशिवाय नोदिरबेकला नशिबाने साथ दिली, कारण त्याने स्पर्धेत डुडाकडून चौथा गेम गमावला. (वृत्तसंस्था)

# हरयाणा स्टीलर्स टीम जर्सीचे अनावरण



हरयाणा स्टीलर्स जर्सीच्या अनावरण प्रसंगी गुरमिंदर सिंग, दिव्यांशू सिंग व कर्णधार जयदीप दहिया

**मुंबई, २६ ऑगस्ट**

प्रो-कबड्डी लीगचे (पीकेएल) गतविजेते हरयाणा स्टीलर्सने आगामी हंगामासाठी आपली अधिकृत टीम जर्सी सादर केली.

जेएसडब्ल्यू सेंटर येथे जेएसडब्ल्यू सिमेंटचे मार्केटिंग प्रमुख गुरमिंदर सिंग आणि हरयाणा स्टीलर्स आणि जेएसडब्ल्यू स्पोर्ट्सचे सीईओ दिव्यांशू सिंग यांच्या उपस्थितीत हा समारंभ पार पडला. त्यांच्यासोबत संघाचा कर्णधार जयदीप दहिया व उपकर्णधार राहुल सेठपाल होते. त्यांनी नवीन लूक जर्सीचे अनावरण केले.

या हंगामात टीममध्ये खूप ऊर्जा आहे, अनुभवी खेळाडू आणि तरुण प्रतिभेचे योग्य संतुलन आहे. आमचा संघ लीगमधील अव्वल संघांमध्ये स्थान मिळवतो. गत वर्षी आम्ही दोन रेडर्सवर अवलंबून होतो, परंतु यावेळी आमच्याकडे तीन आहेत आणि नवीनसारख्या सुपरस्टारसह आमचा आक्रमण मजबूत आहे. दुसरीकडे, आमचा बचाव मजबूत आणि विश्वासार्ह राहतो. ामच्या मार्गावर येणाऱ्या कोणत्याही आव्हानाला तोंड देण्यास तयार आहोत, असे दहिया म्हणाला.

हंगाम १० मध्ये उपविजेतेपद पटकावल्यानंतर आणि हंगाम ११ मध्ये विजेतेपद पटकावल्यानंतर हरयाणा स्टीलर्सने पीकेएलच्या मंचावर आपले सातत्य व जिद्द दाखवली आहे.

जेएसडब्ल्यू स्पोर्ट्समध्ये आम्ही लवचिकता, कठोर परिश्रम आणि विजयी वृत्तीचे प्रतीक असलेले संघ तयार करण्यावर लक्ष केंद्रित करत आहोत, असे हरयाणा स्टीलर्स आणि जेएसडब्ल्यू स्पोर्ट्सचे सीईओ दिव्यांशू सिंग म्हणाले. (वृत्तसंस्था)

# मॅच फिक्सिंगमुळे बांगलादेशच्या क्रिकेटपटूवर पाच वर्षांची बंदी?

**ढाका, २६ ऑगस्ट**

बांगलादेशच्या एका क्रिकेटपटूवर ५ वर्षांची बंदी घालण्यात येऊ शकते. मिन्हाजुल अबेदिन सब्बीर असे या खेळाडूचे नाव असून त्याला बांगलादेश क्रिकेट मंडळाच्या भ्रष्टाचार विरोधी विभागाने (एसीयू) मॅच फिक्सिंगमध्ये त्याच्या सहभागासाठी किमान ५ वर्षांची बंदी घालण्याची शिफारस केली आहे.

मिन्हाजुलवर ढाका प्रीमियर लीगच्या गत आवृत्तीत मॅच फिक्सिंगचा आरोप आहे. या वर्षाच्या सुरुवातीला शाईनपुकुर क्रिकेट क्लबच्या गुलशन क्रिकेट विरुद्ध डीपीएल सामन्याच्या एसीयू चौकशीनंतर ही शिफारस करण्यात आली आहे, ज्यामध्ये दोन वादग्रस्त बाद झाले होते. क्रिकबझच्या मते, एसीयू कागदपत्रांमध्ये सब्बीरवर संशयित बुकींशी संपर्क साधून आणि संपर्कांची तक्रार न करून बीसीबीच्या भ्रष्टाचार विरोधी संहितेच्या अनेक कलमांचे उल्लंघन केल्याचा आरोप आहे. पुरावे पाहता, आम्ही सर्व प्रकारच्या क्रिकेटमधून किमान ५ वर्षांची बंदी घालण्याची शिफारस केली आहे. (वृत्तसंस्था)


# जयपूर पिंक पँथर्सचा कर्णधार नितीन रावल, उपकर्णधार रेझा मीरबाघेरी

**जयपूर, २६ ऑगस्ट**

जयपूर पिंक पँथर्सने आगामी प्रो-कबड्डी लीग हंगाम १२ साठी नितीन रावल याची कर्णधार म्हणून, तर रेझा मीरबाघेरी याची उपकर्णधार म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे.

नितीन पहिल्यांदा पीकेएल हंगाम ५ मध्ये न्यू यंग प्लेअर म्हणून पिंक पँथर्समध्ये सहभागी झाला होता व तो हंगाम ८ पर्यंत संघात होता. या वर्षी तो पुन्हा संघात सहभागी झाला आहे. गत काही वर्षांत तो एक प्रौढ, विश्वासार्ह अष्टपैलू खेळाडू म्हणून विकसित झाला आहे. त्याचा अनुभव व नेतृत्वगुण त्याला या हंगामात तरुण व उत्साही जयपूर संघाला नेतृत्व करताना फायदा होईल.

रेझा मीरबाघेरी उपकर्णधार म्हणून नितीनला मदत करेल. रजा हंगाम ९ मध्ये संघात दाखल झाला होता व त्या वर्षी जयपूर पिंक पँथर्सने विजेतेपद पटकावले होते आणि तेव्हापासून तो संघाच्या बचावाचा कणा आहे. त्याच्या सातत्य, दृढनिश्चय आणि रणनीतिक उपस्थितीमुळे तो संघातील सर्वात विश्वासार्ह व आदरणीय सदस्यांपैकी एक झाला आहे.



नितीन रावल, रेझा मीरबाघेरी

नवीन लूक असलेल्या संघासह आणि अनेक तरुण चेहऱ्यांच्या सहभागासह, मुख्य प्रशिक्षक नरेंद्र रेडू यांच्या मार्गदर्शनाखाली नितीन व रजा यांचा नेतृत्व गट या हंगामात पँथर्सच्या नेतृत्वात महत्त्वाची भूमिका बजावेल.

देहरादूनमध्ये शिबिराचा समारोप केल्यानंतर संघ आता २ सप्टेंबर २०२५ रोजी पाटणा पायरेट्स विरुद्धच्या आपल्या हंगामाच्या पहिल्या सामन्यासाठी विशाखापट्टणमला रवाना झाला आहे. मी जयपूर पिंक पँथर्सकडून एक तरुण खेळाडू म्हणून माझा पीकेएल प्रवास सुरू केला. कर्णधार म्हणून या संघाचे नेतृत्व करणे हा एक अविश्वसनीय सन्मान आहे. आमच्याकडे एक तरुण, उत्साही संघ आहे. आम्ही आमच्या चाहत्यांना अभिमान वाटावा यासाठी आमचे सर्वोत्तम देऊ, असा विश्वास जयपूर पिंक पँथर्सचा कर्णधार नितीन रावल याने व्यक्त केला.

हंगाम ९ पासून जयपूर पिंक पँथर्स माझे घर आहे. उपकर्णधारपदावर शिवास ठेवणे ही माझ्यासाठी अभिमानाची गोष्ट आहे. आम्ही सर्वोत्तम प्रदर्शन करण्यासाठी व नितीन आणि संघासोबत जवळून काम करण्यास मी उत्सुक आहे, असे उपकर्णधार रेझा मीरबाघेरी म्हणाला.

नितीन आणि रेझा एकमेकांना चांगले पूरक आहेत. ते दोघे एकत्रितपणे संघात संतुलन, परिपक्वता व ऊर्जा आणतात, असे मुख्य प्रशिक्षक नरेंद्र रेडू म्हणाले. (वृत्तसंस्था)

### ऋतूराज गायकवाडने झळकावले शतक

**नवी दिल्ली, २६ ऑगस्ट**

भारतीय क्रिकेट सध्या पुढील महिन्यात होणाऱ्या आशिया चषकासाठी तयारी करत आहे. दरम्यान, टीम इंडियामधून बाहेर असलेला स्टार फलंदाज ऋतुराज गायकवाडने आणखी एक शतक झळकावून बीसीसीआय निवड समितीचे लक्ष वेधले आहे. महाराष्ट्राकडून खेळताना त्याने हिमाचल प्रदेशविरुद्ध शतक झळकावले. बुची बाबू स्पर्धेतील त्याच्या पहिल्या सामन्यात रुतुराज गायकवाडने दोन लहान डाव खेळले, परंतु दुसऱ्या सामन्यात तो बाद झाला. तिसऱ्या सामन्यात तो परत येताच त्याने जलद शतक झळकावले. पहिल्या सामन्यात छत्तीसगडविरुद्ध खेळण्यासाठी गायकवाड आला तेव्हा त्याने पहिल्या डावात एक धाव आणि दुसऱ्या डावात ११ धावांची छोटी खेळी केली. गायकवाड त्याच्या संघाकडून फलंदाजीसाठी आला तेव्हा संघाची धावसंख्या केवळ ६४ होती. (वृत्तसंस्था)

# मुलींची जिल्हा क्रिकेट निवड चाचणी शनिवारी पार्कवर

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २६ ऑगस्ट-**

शनिवार ३० ऑगस्ट रोजी १५, १७ व १९ वर्षांखालील मुलींची जिल्हा क्रिकेट निवड चाचणी इंदिरा गांधी पार्क स्टेडियमवर सकाळी ९ ते १ व दुपारी २ ते ५-३० दरम्यान होणार आहे. चाचणी अगोदर सर्व खेळाडूंनी खेळाडू रजिस्टर नोंदणी करून घेणे बंधनकारक आहे. त्याचबरोबर निवड चाचणी शुल्क रुपये ५०० क्यू.आर. कोडद्वारे सोलापूर डिस्ट्रिक्ट क्रिकेट असोसिएशनच्या खात्यात जमा करावे. त्यानंतर खाली आलेल्या ऑप्शनमध्ये खेळाडूचे नाव व जन्मतारीख टाकून त्याची प्रिंट काढून निवड समितीला द्यावी. १५ वर्षांखालील खेळाडूंसाठी १-९-११ च्या पुढील व ३१-८-२०१४ च्या आतील, १७ वर्षांखालील खेळाडूंसाठी १-९-२००८ च्या पुढील तर १९ वर्षांखालील खेळाडूंसाठी १-९-२००७ च्या पुढील खेळाडू पात्र आहेत. ही निवड समितीचे चेअरमन किरण मणिहार, स्नेहल जाधव, सारिका कुरनूरकर, मानसी जाधव व राजेंद्र गोटे हे करणार आहेत.



# सूर्या चषक थ्रोबॉल जिल्हा स्पर्धेस सुरवात

### १५ संघातून २१० खेळाडूंचा सहभाग

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २६ ऑगस्ट-**

थ्रोबॉल असोसिएशन सोलापूर व सुशीलकुमार शिंदे बीपीएड कॉलेज यांच्या संयुक्त विद्यमाने व उद्योजक राजकुमार सुरवसे यांच्या वाढदिवसानिमित्त १४ व १७ वर्षे मुले व मुलींच्या जिल्हास्तरीय निमंत्रित थ्रोबॉल स्पर्धेस सुरवात झाली. या स्पर्धेसाठी १५ संघामधून २१० खेळाडूंनी सहभाग नोंदविला.

याचे उद्घाटन रोटरी क्लब सोलापूर ईस्टचे अध्यक्ष व जिम्नॅस्टिक संघटनेचे जिल्हाध्यक्ष प्राचार्य कार्तिक चव्हाण व थ्रोबॉल असोसिएशन सोलापूरचे जिल्हाध्यक्ष प्रा. संतोष खेंडे यांच्या उपस्थितीत झाले. याप्रसंगी रवींद्र चव्हाण, श्रीधर गायकवाड, संतोष पाटील आनंद लिगाडे हे उपस्थित होते. या स्पर्धे साठी पंच म्हणून संतोष पाटील यांनी काम पाहिले.

# शहर, जिल्ह्यातील शाळा व महाविद्यालयांनी क्रीडा दिन साजरा करण्याचे आवाहन

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २६ ऑगस्ट-**

हॉकीचे जादूगर मेजर ध्यानचंद यांचा जन्म दिवस २९ ऑगस्ट राष्ट्रीय क्रीडा दिन म्हणून साजरा केला जातो. त्यानिमित्त क्रीडा व युवक सेवा संचालनालय अंतर्गत जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालयद्वारे २९ ते ३१ ऑगस्ट या कालावधीत विविध क्रीडा स्पर्धांचे आयोजन केले आहे.हॉकी, फुटबॉल, सॉप्टबॉल, थ्रोबॉल व स्क्वॅश या स्पर्धा होणार आहेत. तर ३१ ऑगस्ट रोजी मॅरेथॉन स्पर्धे चे आयोजन केले आहे. महाराष्ट्रातील क्रीडा संस्कृतीची जोपासना व जनतेमध्ये क्रीडा वातावरण निर्माण होण्याच्या दृष्टीने राज्यात हा क्रीडा दिन साजरा करण्यात येतो. त्यानुसार शहर व जिल्ह्यातील सर्व शाळा, महाविद्यालये, क्रीडा मंडळे व क्रीडा संघटना यांनी क्रीडा दिनाचे व्यापक स्वरुपात आयोजन करावे. या कालावधीत आयोजित केलेल्या विविध कार्यक्रमाच्या आयोजनाची नोंद " फिट इंडिया " पोर्टलवर अपलोड करावी व कार्यक्रमाचे फोटो, व्हिडिओ www.fitindia.gov.in या संकेत स्थळावर अपलोड करावे, असे आवाहन जिल्हा क्रीडा अधिकारी नरेंद्र पवार यांनी केले आहे.

# जिल्हा क्रीडा संकुलात खेळाडूंना उत्तम सोयी-सुविधा पुरवा

### पालकमंत्री जयकुमार गोरे यांच्या जिल्हा क्रीडाधिकारी नरेंद्र पवार यांना सूचना

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २६ ऑगस्ट-**

जिल्हा क्रीडा संकुलमधून भविष्यात राष्ट्रीय आंतरराष्ट्रीय दर्जाचे खेळाडू निर्माण व्हावेत, यासाठी जिल्हा क्रीडा संकुलमध्ये अधिकाधिक दर्जेदार सुविधा निर्माण करून द्याव्यात, तसेच संकुलाच्या उत्पन्न वाढीसाठी प्रयत्न करावेत अशा सूचना ग्रामविकास व पंचायतराज मंत्री तथा पालकमंत्री जयकुमार गोरे यांनी जिल्हा क्रीडाधिकारी नरेंद्र पवार यांना दिल्या

जिल्हाधिकारी कार्यालय नियोजन भवन येथे पालकमंत्री जयकुमार गोरे यांच्या अध्यक्षतेखाली समितीची बैठक घेण्यात आली, त्यावेळी ते बोलत होते.



यावेळी जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद मुख्य कार्यकारी अधिकारी कुलदीप जंगम, महापालिका आयुक्त सचिन ओंबासे, शहर पोलीस आयुक्त एम राजकुमार ग्रामीण पोलीस अधीक्षक अतुल कुलकर्णी, निवासी उपजिल्हाधिकारी अभिजीत पाटील, जिल्हा क्रिडा अधिकारी नरेंद्र पवार, जिल्हा नियोजन अधिकारी दिलीप पवार उपस्थित होते.

यावेळी पालकमंत्री जयकुमार गोरे म्हणाले, जिल्ह्यात गुणवत्तापूर्ण खेळाडू घडविण्यासाठी जिल्हा क्रीडा संकुलात सध्या सुरु असलेली विविध क्रीडा प्रकारांच्या पायाभूत सुविधांची कामे जलदगतीने पूर्ण करावीत तसेच यांनी शासकीय मैदान नेहरूनगर येथील विविध सुविधाबाबतचा आराखडा विहित पद्धतीचा अवलंब करून तयार करावा. तसा प्रस्ताव व अंदाजपत्रक लवकरात लवकर सादर करावा असेही त्यांनी यावेळी सांगितले.

जिल्हा क्रीडा अधिकारी नरेंद्र पवार यांनी शासकीय मैदान नेहरूनगर या ठिकाणी ९ एकर इतकी जागा उपलब्ध असून उपलब्ध जागेमध्ये ४०० चा मीटर धावून मार्ग त्यास संलग्न वॉकिंग ट्रॅक आहे तसेच विविध खेळाची मैदानी असून या ठिकाणी खेळाडू, महिला, जेष्ठ, नागरिक हे सरावासाठी व व्यायाम ासाठी येत असतात. सदरचा वॉकिंग ट्रॅक जुना असल्याने मैदानाची दुरुस्ती करणे आवश्यक असल्याचे क्रीडा अधिकारी यांनी यावेळी सांगितले

या बैठकीत जिल्हा क्रीडा संकुल येथे वाढीव क्रीडा सुविधा, ४०० मी. धावन मार्ग सिंथेटिक करणे, बॅडमिंटन हॉल अद्ययावत करणे, मुलामुलींचे वसतीगृह दुरुस्त करणे, अंतर्गत रस्ते, सुंदरम नगर येथील जलतरण तलाव दुरूस्तीस निधी, करण्यासाठी अंदाजपत्रके व आराखडे तयार करून घेण्यास मान्यता मिळणे यासह अन्य कामांबाबत चर्चा करण्यात आली.

# राज्य टेबल टेनिस स्पर्धेत मनीष रावत अजिंक्य

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २६ ऑगस्ट-**



पुणे डेक्कन जिमखाना येथे झालेल्या राज्य मानांकित प्रौढ एव्हरग्रीन कप स्पर्धेत ५० वर्षावरील गटात येथील मनीष रावत यांनी अजिंक्यपद पटकाविले. त्यांनी ठाण्याच्या तेजस नाईक याचा ११-३, १२-१४, ११-४, ११-७ असा पराभव केला. उपांत्य फेरीत त्यांनी पुण्याच्या नचिकेत देशपांडे ला हरवले. मनिष रावत यांनी सलग दोन राज्य मानांकित स्पर्धेत अजिंक्यपद पटकाविले आहे. त्यांचे सोलापूर जिल्हा टेबल टेनिस संघटनेचे अध्यक्ष डॉ. राजीव प्रधान, सचिव झेड. एम. पुणेकर आदींनी अभिनंदन केले.

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/

## महत्वाचे...



### श्री वटवृक्ष देवस्थान समितीचे कार्य उल्लेखनीय : माजी मंत्री चंद्रकांत खैरे

**अक्कलकोट दि. २६ ऑगस्ट-**

श्री वटवृक्ष स्वामी महाराज देवस्थान हे स्वामींचे वास्तव्य असलेले जागृत व मूळस्थान स्थान आहे. स्वामी समर्थांच्या भक्तीतून अनेक भाविकांना विविध माध्यमातून स्वामींच्या आशीर्वादाची आजही प्रचिती येत असल्याचे मनोगत शिवसेना उध्दव ठाकरे गट नेते तथा माजी मंत्री चंद्रकांत खैरे यांनी व्यक्त केले. माजी मंत्री चंद्रकांत खैरे यांनी श्री वटवृक्ष स्वामी महाराज मंदिरास भेट देऊन श्री स्वामी समर्थांचे दर्शन घेतले. यावेळी मंदिर समितीच्या वतीने समितीचे चेअरमन महेश इंगळे यांनी माजी मंत्री चंद्रकांत खैरे यांचा श्री स्वामी समर्थांचे कृपावस्त्र व प्रसाद, प्रतिमा देऊन यथोचित सन्मान केला. याप्रसंगी माजी मंत्री चंद्रकांत खैरे बोलत होते. यावेळी प्रथमेश इंगळे, शिवसेना उध्दव ठाकरे गट उपनेत्या अस्मिताताई गायकवाड, जिल्हा प्रमुख संतोष पाटील, प्रा.अजय दासरी, केगनाळकर महिला आघाडी जिल्हा प्रमुख बसवंती, तालुका प्रमुख आऩद बुककानवरे, शहर प्रमुख राम जाधव, रवि डोके, ढेपे, होटकर, मंदिर समितीचे सचिव आत्माराम घाटगे, विश्वस्त महेश गोगी, श्रीशैल गवंडी, प्रसाद सोनार, गिरीश पवार, श्रीकांत मलवे, विपुल जाधव, महेश मस्कले उपस्थित होते.

### पदोन्नती निमित्त पो.नि.राजेंद्र टाकणे यांचा प्रथमेश इंगळे यांच्या हस्ते सत्कार

**अक्कलकोट दि. २६ ऑगस्ट-**

उत्तर पोलीस निरीक्षक पदाच्या कार्यकालात अक्कलकोट शहरातील कायदा व सुव्यवस्था नेटाने सांभाळीत आपली सेवा बजावीत असताना श्री स्वामी समर्थाच्या श्री वटवृक्ष स्वामी महाराज मंदीरात व मंदीर परिसरात गर्दीच्या प्रसंगी पोलीस बंदोबस्ताच्या माध्यमातून स्वामी समर्थाची व स्वामी भक्तांची सेवा करण्याची संधी मिळाली हा काळ म्हणजे आपल्या पुर्वजन्मीच्यापुण्याईचेफळआहे.मंदीर समितीचे प्रमुख महेश इंगळे यांच्या सहवासाने जीवनात भरपूर काही शिकण्यास मिळाले. बंदोबस्ताच्या माध्यमातून घडलेल्या स्वामी सेवेने जीवनातील हा काळ सत्कर्मी



लागल्याचे मोठे समाधान आहे. मंदीर सेवेकरी, विश्वस्त पदाधिकारी, व इंगळे कुटूंबियांचा नेहमीच सहवास लाभल्याने सर्वांशी जिव्हाळ्याचे नाते संबंध असल्याचे भासत आहे, असे मनोगत अक्कलकोट उत्तर पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक राजेंद्र टाकणे यांनी व्यक्त केले. टाकणे यांची अक्कलकोट पोलीस निरीक्षक पदावरून बदली होवून अप्पर उपायुक्त राज्य गुप्तवार्ता विभाग नांदेड येथे पदोन्नती व येथील उत्तर पोलीस ठाण्यातून आपल्या पोलीस पदाचा कार्यकाल पुर्ण होवून बदली झाल्याप्रित्यर्थ टाकणे यांचा येथील श्री वटवृक्ष स्वामी महाराज देवस्थानच्या वतीने समितीचे चेअरमन महेश इंगळे यांच्या मार्गदर्शनाखाली श्री स्वामी समर्थाचे कृपावस्त्र, प्रसाद व प्रतिमा देवून यथोचित सन्मान केला. यावेळी मंदीर समितीचे विश्वस्त महेश गोगी, श्रीशैल गवंडी, दर्शन घाटगे, श्रीकांत मलवे, सागर गोंडाळ, तुषार मोरे आदी उपस्थित होते.

## निधन वृत्त...


### हणमंत जमादार



**अक्कलकोट, दि. २६ ऑगस्ट-**

मौजे सलगर (ता.अक्कलकोट )येथील रहिवाशी बुद्धिजीवी व ज्येष्ठ व्यक्तिमत्व कै. हणमंत चंद्राम जमादार (संगोळगी) यांचे वयाच्या ७५ व्या वर्षी वृद्धापकाळाने निधन झाले. त्यांच्या पश्चात दोन मुली, दोन मुले असा परिवार आहे . त्यांची अंत्ययात्रा २७ ऑगस्ट रोजी सकाळी ११ वाजता सलगर येथील त्यांच्या राहत्या घरापासून निघणार आहे. सेवानिवृत्त पीएसआय अण्णाप्पा संगोळगी यांचे ते मोठे बंधू होते.

### विलास बडवे



**पंढरपूर, दि. २६ ऑगस्ट-**

श्री विठ्ठलाचे तत्कालीन पुरोहित विलास कृष्णाजी बडवे (वय ७५) यांचे मंगळवारी (दि.२६) सकाळी साडेनऊच्या सुमारात त्यांचे राहते घरी वृद्धापकाळाने निधन झाले. त्यांचे मागे पत्नी, दोन मुले, दोन मुली, बंधू, नातवंडे असा मोठा परिवार आहे. भाजपाचे ज्येष्ठ नेते बाबासाहेब बडवे यांचे ते ज्येष्ठ बंधू होत. (कै.) विलास बडवे यांचे पार्थिवावर पंढरपूर मधील वैकुंठभूमी स्मशानभूमीत अंत्यसंस्कार करण्यात आले.

### वैशाली एकतपुरे



**अकलूज, दि. २६ ऑगस्ट-**

माळेवाडी-अकलूज येथील वैशाली सुभाष एकतपुरे यांचे वयाच्या ५६ व्या वर्षी अल्पशा आजाराने निधन झाले. त्यांच्या पश्चात दोन मुले, एक मुलगी, सुना, नातवंडे असा परिवार आहे. त्या जुन्या काळातील नावाजलेले पत्रकार व फोटोग्राफर कै. सुभाष एकतपुरे यांच्या पत्नी तर बबनराव एकतपुरे उपअभियंता पाटबंधारे विभाग यांच्या भावजय होत्या.

### मालती दडस



**पिलीव, दि. २६ ऑगस्ट-**

माळशिरस तालुक्यातील सुळेवाडी येथील मालती शंकरराव दडस यांचे अल्पशा आजाराने निधन झाले. मृत्यूसमयी त्या ७६ वर्षांच्या होत्या. त्यांच्या पश्चात तीन मुले, एक मुलगी, सुना, नातवंडे असा परिवार आहे.

### गणेश आंबेवाले



**सोलापूर, दि. २६ ऑगस्ट-**

गणेश मोहनसिंग आंबेवाले (वय ३९ रा. लोधी गल्ली) यांचे निधन झाले. त्यांच्या पश्चात पत्नी, दोन मुले, बहीण व भाऊ असा परीवार आहे. सोलापूर शहर जिल्हा काँग्रेसचे उपाध्यक्ष रामसिंग आंबेवाले यांचे पुतणे होत.

# प्रारूप योजनेतील हरकतींवर सुनावणी; आक्षेप घेतलेल्या १ हजार ४२५ जणांना नोटीसा

**पंढरपूर न.पा.च्या मुख्याधिकाऱ्यांसमोर येत्या २८ व २९ ऑगस्ट रोजी सुनावणी, दोन दिवस म्हणणे मांडता येणार, त्यानंतर प्रस्ताव शासनाकडे जाणार**

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि.२६ ऑगस्ट -**

पंढरपुरात होणाऱ्या प्रारूप विकास योजनेतील कामांबाबत हरकती घेतलेल्या तब्बल एक हजार ४२५ जणांची सुनावणी येत्या २८ व २९ ऑगस्ट या दोन दिवसांत होणार आहेत. याबाबत पंढरपूर नगर परिषदेच्या वतीने शहरातील हरकत घेतलेल्या तब्बल एक हजार ४२५ जणांना नोटिसा काढण्यात आल्याची माहिती पंढरपूर नगरपरिषदेचे मुख्याधिकारी महेश रोकडे यांनी दिली. पंढरपूर शहराचा प्रारूप विकास आरखडा तयार करण्यात आला आहे. यामध्ये पार्किंग, रस्ते, उद्याने अशी कामे असणार आहेत.



यामुळे हा विकास आराखडा राबविताना मुळ हद्दीपेक्षा अधिक हद्द वाढ होणार आहे, तसेच अनेक ठिकाणच्या जागेवर आरक्षण देखील पडणार आहे. मे महिन्यामध्ये प्रारूप आराखडा प्रसिद्ध झाला होता. यानंतर यावर हरकती मागविण्यात आल्या होत्या. त्यावेळी शहरातील तब्बल एक हजार ४२५ नागरिकांनी या बाबत हरकती घेतल्या होत्या.

**हरकतदारांना म्हणणे मांडण्याबाबत नोटीसा :** दरम्यान सूचना, हरकतीच्या अनुषंगाने महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम २८ (२) अन्वये गठित नियोजन समिती समोर म्हणणे मांडण्यासाठी गुरुवारी ( ता.२८) दुपारी चार ते साडेपाच या वेळेत कार्यालय पत्त्यावर आवश्यक कागदपत्रांसह उपस्थित राहावे, तसेच हरकतीदार हजर न राहिल्यास आपल्या संदर्भीय अर्जातील मुद्द्यांच्या अनुषंगाने निर्णय घेण्यात येणार आहे. नोटीस पत्र नगर परिषदेच्या वतीने हरकतदारांना देण्यात आले आहे. ते पत्र नसल्यास सुनावणीला हजर राहता येणार नसल्याचे देखील नोटीसपत्रात नमूद करण्यात आल्याची माहिती मुख्याधिकारी महेश रोकडे यांनी दिली.

**सुनावणी दरम्यान प्रश्न सुटल्यानंतर शासनाकडे प्रस्ताव :** हरकतीदारांचे २१ व २२ ऑगस्ट रोजी म्हणणे ऐकून घेण्यात आले होते. त्यावर समितीकडून विचार सुरू आहे. आता पुन्हा हरकतीबाबत २८ व २९ ऑगस्ट रोजी सुनावणी होणार आहे. या सुनावणीला उपस्थित राहण्या संदर्भात एक हजार ४२५ जणांना नोटीस बजावण्याचे काम नगर परिषदेचे सहायक रचनाकार ऋषिकेश गड्डम, सहायक रचनाकार सुहास झिंगे, रचना सहायक विराज पवार यांच्याकडून सुरू आहे.त्यानुसार सुनावणी होऊन लोकांचे प्रश्न सुटल्यानंतर अन् सर्व प्रक्रिया पूर्ण झाल्यावर डी.पी. प्लॅन प्रस्ताव शासनाकडे पाठविण्यात येणार आहे.

**दोन दिवस होणार सुनावणी :** नोंदविण्यात आलेल्या हरकतींबाबत सुनावणी होणार आहे. येत्या २८ व २९ ऑगस्ट २०२५ रोजी म्हणणे सादर करता येणार आहे. दरम्यान म्हणणे सादर करताना हरकतदाराने पालिकेकडून देण्यात आलेली नोटीस आपल्या सोबत आणण्याच्या सूचना देखील पालिकेचे मुख्याधिकारी महेश रोकडे यांच्या कडून प्रत्येक हरकतदाराला देण्यात आल्या आहेत.



## सांगोल्यात अळंबी उत्पादनावर कार्यशाळा

**तभा वृत्तसेवा,**
**सांगोला, दि.२६ ऑगस्ट-**

डॉ. गणपतराव देशमुख महाविद्यालय, सांगोला व सांगोला महाविद्यालय, सांगोला यांच्या संयुक्त विद्यमाने अळंबी उत्पादन याविषयी एकदिवसीय कार्यशाळेचे आयोजन वनस्पतीशास्त्र विभागामार्फत करण्यात आले होते. यावेळी बाबुराव पाटील आर्ट्स न्ड सायन्स कॉलेज, अनगरचे डॉ. तुषार रोडगे यांनी अळंबीबद्दल (भूछत्र/कुत्र्याची छत्री) गैरसम जातून निर्माण झालेला आपला दृष्टिकोन बदला आणि घरबसल्या लाखो रुपये कमवा असा सल्ला देत उत्पादन कशा पद्धतीने घेता येते याचे प्रात्यक्षिक करून दाखवले.

या कार्यशाळेचे उद्घाटनप्रसंगी संस्थेचे सचिव विठ्ठलराव शिंदे यांनी मनोगतात विद्यार्थ्यांनी नोकरीच्या मागे न लागता अशा कार्यशाळेतून प्रशिक्षण घेऊन स्वतः उद्योग उभा करावेत असे मत व्यक्त केले. कार्यक्रमाचे अध्यक्ष डॉ.गणपतराव देशमुख महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.सिकंदर मुलाणी यांनी विद्यार्थ्यांसाठी नेहमीच उपक्रम राबवणाऱ्या वनस्पतीशास्त्र विभागाचे अभिनंदन करून या कार्यशाळेचा लाभ विद्यार्थ्यांनी नक्की घ्यावा असे आवाहन केले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक वनस्पतीशास्त्र विभागप्रमुख डॉ. राजेंद्र सुर्यवंशी यांनी तर सूत्रसंचलन डॉ.सीमा गायकवाड यांनी केले. आभार डॉ.रमेश टेंभुर्णे यांनी मानले. सदर कार्यशाळा यशस्वी करण्यासाठी प्रा.मारुती हाके, डॉ. रामचंद्र पवार, प्रा.पल्लवी कदम, प्रा.रोहीत पवार, प्रकाश जांगळे व बी.एस्सी.भाग ३ च्या विद्यार्थ्यांनी परिश्रम घेतले.

## दोन ब्रास वाळूसह जेसीबी, टेम्पो जप्त

**सांगोला, दि.२६ ऑगस्ट -**

चोरून वाळू उपसा करून विक्री करीत असल्याने १३ लाख १४ हजार रुपये किंमतीचा टेम्पो, हायड्रोलीक ट्रॅक्टर व ट्रॉली ट्रॅक्टर तसेच दोन ब्रास वाळू असा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. रावसाहेब श्रीपती यमगर (रा. यमगरवाडी, ता.सांगोला) यास अटक करण्यात आली आहे. ही कामगिरी पोलीस अधिक्षक अतुल कुलकर्णी, अप्पर पोलीस अधिक्षक प्रितम यावलकर, उपविभागीय पोलीस अधिकारी डॉ.बसवराज शिवपुजे यांचे मार्गदर्शनाखाली सांगोला पोलीस निरीक्षक विनोद घुगे, पोहेकॉ. राजगे, पोहेकॉ.काझी, पोकॉ. पाटील, पोकॉ.माळी, पोकॉ.सद्दाम नदाफ यांनी केली.

## 'पंढरपूर सिंहगड'मध्ये रॅगिंग-शैक्षणिक जीवनातील दुर्लक्षित कॅन्सरवर मार्गदर्शन

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि. २६ ऑगस्ट-**

सिंहगड इन्स्टिट्यूट, पंढरपूर येथे अँटी रॅगिंग सेल व अंतर्गत निवारण समिती यांच्या संयुक्त विद्यमाने दोन महत्त्वपूर्ण विषयांवर मार्गदर्शनपर व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले असल्याची माहिती महाविदयालयाचे प्राचार्य डॉ. कैलाश करांडे यांनी दिली. कार्यक्रमाची सुरुवात दीपप्रज्वलन व सरस्वती पूजनाने करण्यात आली. यावेळी उपस्थित वक्ते अॅड. चैतन्य ताठे, डॉ. स्मिता गव्हाणे, डॉ. चेतन पिसे, डॉ. भालचंद्र गोडबोले, प्रा.अंजली पिसे, प्रा. अंजली चांदणे यांच्या हस्ते दिपप्रज्वलन करण्याते आले.

पहिल्या सत्रात रॅगिंग- शैक्षणिक जीवनातील दुर्लक्षित कॅन्सर या विषयावर डव्होकेट चैतन्य ताठे यांनी मार्गदर्शन केले. यात रॅगिंगचे मानसिक, शारीरिक व शैक्षणिक दुष्परिणाम, रॅगिंगविरोधी कायदे व तक्रार नोंदविण्याची प्रक्रिया यावर माहिती देण्यात आली. दुसऱ्या सत्रात शैक्षणिक जीवनातील ताणतणावाला सामोरे जाताना या विषयावर डॉ. स्मिता गव्हाणे यांनी तणाव व्यवस्थापन, आत्मभान, संवाद कौशल्य आणि वेळेच्या व्यवस्थापनासंदर्भात विद्यार्थ्यांना उपयुक्त माहिती दिली.

कार्यक्रमात डॉ. स्मिता गव्हाणे यांनी विद्यार्थ्यांशी संवाद साधताना तणावाचे मूळ कारण, त्याचे परिणाम व त्यावर उपाययोजना यावर चर्चा केली. कार्यक्रमास २५० हून अधिक विदयार्थी उपस्थित होते. अॅड. चैतन्य ताठे यांनी विदयार्थ्यांना विचारलेल्या प्रश्नोत्तरातून महाविदयालयामध्ये एकही अँटी रॅगीगची तक्रार नसल्याचे ऐकून महाविदयालयाचे तसेच प्राचार्य डॉ. कैलाश करांडे यांच्या शिस्तबध्द व्यवस्थापनाचे कौतुक केले. सूत्रसंचलन व आभार स्वप्नजा काळे व सृष्टी अरकीले यांनी मानले. कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी अँटी रॅगिंग सेल व तक्रार निवारण समितीचे चेअरमन व सदस्य प्रा. अंजली पिसे, अंजली चांदणे यांनी परिश्रम केले.

## मोडनिंबमधून उद्या मराठा बांधव प्रस्थान करणार

**मोटरसायकल रॅलीला उत्स्फूर्त प्रतिसाद**



**तभा वृत्तसेवा,**
**मोडनिंब, दि. २६ ऑगस्ट-**

मराठा आरक्षणासाठी मराठा योद्धा मनोज जरांगे पाटील यांच्या नेतृत्वाखाली २९ ऑगस्ट रोजी मुंबई येथे होणाऱ्या भव्य आंदोलनासाठी मोडनिंब (ता. माढा) येथील मराठा बांधव गुरुवारी मोठ्या संख्येने रवाना होणार असल्याची माहिती सकल मराठा समाजाच्या वतीने देण्यात आली.

या आंदोलनात सहभाग वाढवण्यासाठी मोडनिंब येथे सकल मराठा समाजाची चावडी बैठक घेण्यात आली. ही बैठक सोमवारी शहरातील जय भवानी चौक येथील श्री यमाई देवी मंदिरात पडली. यावेळी मुंबई आंदोलनात शिस्तबद्ध आणि उत्स्फूर्त सहभाग नोंदविण्याचा निर्धार समाजबांधवांनी व्यक्त केला. मंगळवारी सकाळी मोडनिंब शहरातून सकल मराठा समाजाच्या वतीने भव्य मोटारसायकल रॅली काढण्यात आली. या रॅलीत समाजबांधवांनी मोठ्या संख्येने सहभाग घेतला.आता कुठे जायचं? मुंबईला जायचं!, मनोज दादा तुम आगे बढो,हम तुम्हारे साथ है, एक मराठा लाख मराठा! अशा प्रकारच्या घोषणा देण्यात आल्या. गुरुवारी मोठ्या संख्येने मोडनिंब येथून मराठा बांधव मुंबईच्या आंदोलनासाठी प्रस्थान करणार असून, हक्क मिळाल्याशिवाय माघार नाही असा निर्धार व्यक्त केला. या आंदोलनात प्रत्येक मराठा बांधवाने सहभागी व्हावे, असे आवाहन सकल मराठा समाजाच्या वतीने करण्यात आले आहे.सकल मराठा समाजाच्या वतीने गाड्यांचा ताफा गुरुवारी मुंबईकडे रवाना होणार असून, मोडनिंब आणि पंचक्रोशीतून मराठा बांधव यात सहभागी होणार असल्याची माहिती देण्यात आली.

## मंगळवेढ्यात पोलिसांनी काढला रुटमार्च

**तभा वृतसेवा,**
**मंगळवेढा दि. २६ ऑगस्ट-**

मंगळवेढा तालुक्यात आगामी येणारे सण गणेशोत्सव, नवरात्र महोत्सव, महमंद पैगंबर जयंती आदी सणांच्या पार्श्वभूमीवर मंगळवेढा शहरातील संत दामाजी चौकातून पोलीसांचा रुटमार्च करण्यात आला. दरम्यान या रुटमार्चच्या माध्यमातून पोलीस प्रशासन अलर्ट असल्याचा संदेश नागरिकांना देण्यात आला.



मंगळवेढा शहर व ग्रामीण भागात आगामी काळात गणेशोत्सव, नवरात्र महोत्सव व महमंद पैगंबर जयंती हे उत्सव येत असल्यामुळे डी.वाय. एस.पी. डॉ.बसवराज शिवपुजे यांच्या मार्गदर्शनाखाली पो. नि.दत्तात्रय बोरीगिड्डे यांनी सोमवार दि.२५ रोजी सकाळी १० ते ११ या कालावधीत दामाजी चौक,शिवप्रेमी चौक, संत चोखामेळा चौक, मुरलीधर चौक, जुनी बँक ऑफ इंडिया, जुने डी.वाय.एस.पी.कार्यालय असा मार्गावरुन पोलीसांचा रुटमार्च काढून मंगळवेढा स्टेशनला समारोप करण्यात आला. या रुटमार्च मध्ये डी.वाय.एस.पी. डॉ. बसवराज शिवपुजे, पो.नि.दत्तात्रय बोरीगिड्डे, ५ पोलीस अधिकारी, ३५ पोलीस अंमलदार, २० आर. सी.पी.जवान,५ क्यू आर.पी. पथकातील जवान व ४ पोलीस व्हॅन आदींचा समावेश होता.

## राज्यपाल बागडे यांच्या हस्ते डॉ. राजेंद्र मगर यांचा सन्मान

**पिलीव, दि. २५ ऑगस्ट-**

छत्रपती संभाजीनगर येथे साकेत प्रकाशनाच्या वतीने राजस्थानचे महामहिमराज्यपाल यांच्या उपस्थितीत विविध सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते.

यावेळी निमगाव, माळशिरस येथील सुपुत्र डॉ. राजेंद्र मगर यांनी महाराजा सायाजीराव गायकवाड यांचेसामाजिक राजकीय शैक्षणिक बाबतीत काम संशोधनातून समाजापुढे आणले गंगाराम भाऊ मस्के यांचे चारित्र्य डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर विद्यापीठात आभ्यासक्रमात समाविष्ट करण्यात आले ही बाब आभिमानस्पद असुन



साकेत प्रकाशन साठी यांनी उत्कृष्ट काम या बद्दल राज्यपाल हरिभाऊ बागडे यांनी कौतुक करून साहित्य क्षेत्रात डॉ. मगर यांचे योगदान आहे, असे गौरवोद्गार काढले. यावेळी सामाजिक कार्यकर्ते डॉ. अभय बंग महाराष्ट्र राज्य साहित्य मंडळाचे माजी अध्यक्ष बाबा भांड, कुलगुरू अंकुशराव कदम आशा भांड उपस्थित होते.

## सुरताल विद्यालयात संगीत नृत्य महोत्सव; कलाकारांचा सन्मान

**तभा वृत्तसेवा,**
**करमाळा, दि.२६ ऑगस्ट-**

श्री कमलाभवानी बहुउद्देशीय संस्था संचलित सुरताल संगीत विद्यालय करमाळा यांच्यावतीने पंडित कै. के. एन. बोळंगे गुरुजी आणि कै. पंडित विष्णू दिगंबर पलुस्कर यांच्या पुण्यतिथीनिमित्त आंतरराष्ट्रीय सुरताल संगीत नृत्य महोत्सवाचे आयोजन करमाळा येथील विकी मंगल कार्यालय येथे संपन्न झाला. या महोत्सवासाठी देशातील वेगवेगळ्या राज्यातून आणि परदेशातूनही अनेक दिग्गज कलाकारांनी आपली हजेरी लावली.

सूरताल संगीत विद्यालयाच्या वतीने संगीत क्षेत्रामध्ये उल्लेखनीय कार्य केल्याबद्दल.सुर ताल संगीत विद्यालयाच्या वतीने राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय कलाकारांना गौरविण्यात आले. यामध्ये- पं, सुदर्शन राजोपाध्याय (नेपाळ- सरोद) यांना सुरताल संगीत शिरोमणी पुरस्कार, डॉक्टर दुमिथा गुणवर्धन (श्रीलंका- कथक) यांना सुरताल नृत्यभूषण पुरस्कार, श्रीमती



बंदना बरूआ (गुवाहाटी - सत्रीय) यांना सुर ताल नृत्य शिरोमणी पुरस्कार, तंत्री चौधरी (कोलकत्ता- कथक) यांना सुरताल नृत्य कलानिधी पुरस्कार तसेच करमाळ्यातील प्रख्यात स्त्रीरोग तज्ञ डॉ. महेंद्र नगरे यांना सुरताल करमाळा भूषण पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले.

पुरस्कार प्राप्त मान्यवरांना यशकल्याणी सेवाभावी संस्थेच्या वतीने सुद्धा प्रमाणपत्र सन्मान चिन्ह आणि पैठणी देऊन गौरविण्यात आले. पुरस्कारप्राप्त कलाकारांनी आपली कला सादर करुन रसिक प्रेक्षकांची मने जिंकली. यावेळी नवभारतच्या संचालिका सुनिता देवी यांनी मनोगत व्यक्त केले. या कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून विद्या विकास मंडळाचे सचिव विलासराव घुमरे, तहसीलदार शिल्पा ठोकडे, पोलीस निरीक्षक रणजीत माने, पिंक रिवोल्युशन महाराष्ट्र राज्य च्या संस्थापिका श्रद्धा जवजांळ, यश कल्याणी सेवाभावी संस्थेचे संस्थापक अध्यक्ष गणेश करे-पाटील, अर्बन बँकेचे चेअरमन कन्हैयालाल देवी ,भाजपचे जिल्हा सरचिटणीस लक्ष्मण केकान, सामाजिक कार्यकर्ते श्रेणिक भाई खाटेर, प्रसिद्ध स्त्री रोग तज्ञ डॉ कविता कांबळे, विद्या विकास मंडळाचे अध्यक्ष प्राचार्य मिलिंद फंड, नगसेविका सौ संगिताताई खाटेर, राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष भरत भाऊ आवताडे, जिल्हा उपाध्यक्ष आशपाक जमादार, राष्ट्रवादी विद्यार्थी काँग्रेसचे प्रदेश चिटणीस अजिंक्य पाटील, नगरसेवक महादेव फंड नगरसेवक अतुल फंड, सावंत गटाचे नेते सुनील सावंत, डिजिटल मीडिया पत्रकार संपादक संघटनेचे तालुकाध्यक्ष पत्रकार दिनेश मडके, संघर्ष न्युजचे सिध्दार्थ वाघमारे, शितलकुमार मोटे उपस्थित होते. यावेळी प्रकाश शिंदे, अजित कणसे, डॉ महेश वीर, डॉ. महेश अभंग, विजय खंडागळे, खांडेकर, कुलकर्णी, गंगणे, प्राध्यापक फाटक, शिवराज चिवटे उपस्थित होते. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी अशोक बरडे, संतोष पोतदार, दिगंबर पवार, निलेश कुलकर्णी कदम, सुहास कांबळे, सतीश वीर, नवनाथ थोरात, आबा साने, उमेश मगर यांनी परिश्रम घेतले. प्रास्ताविक सुरताल संगीत विद्यालयाचे प्राचार्य बाळासाहेब नरारे यांनी केले. सूत्रसंचालन रेश्मा जाधव, संध्या थोरे, अर्चना सोनी यांनी केले तर आभार शिंदे यांनी मानले.

## महत्वाचे...



### पूर्व विभाग मध्यवर्ती गणेशोत्सव मंडळाच्या कार्यालयाचे उद्घाटन

**सोलापूर, दि. २६ ऑगस्ट-**
पूर्व विभाग मध्यवर्ती सार्वजनिक गणेशोत्सव मंडळाच्या कार्यालयाचे उद्घाटन रविवार पेठ येथील मद्दा मंगल कार्यालयात करण्यात आले. यश डेव्हलपर्सचे मालक सुयश खानापुरे यांच्या हस्ते व मंडळाचे विश्वस्त सचिव प्रा. डॉ. अजय दासरी यांच्या अध्यक्षतेखाली हा कार्यक्रम झाला. यावेळी मंडळाचे ट्रस्टी विश्वस्त पांडुरंग दिड्डी, विष्णू कारमपुरी, व्यंकटेश आकेन, पद्मशाली ज्ञाती संस्थेचे सरचिटणीस संतोष सोमा, ज्ञाती संस्थेचे विश्वस्त सदस्य राम गड्डम, श्रीनिवास म्याकल, पूर्व विभाग मध्यवर्तीचे माजी अध्यक्ष श्रीनिवास यनगंदूल, श्रीकांत कोंडा, विद्यमान अध्यक्ष लोकेश नंदाल, कार्याध्यक्ष प्रशांत कुडक्याल, प्रेसिडेंट विनोद केंजरला, सांस्कृतिकप्रमुख माधवी अंदे, वैशाली आडकी, वनिता पुंजाल, उपाध्यक्ष श्रीनिवास आडम, शुभम एक्कलदेवी, विश्वास गज्जम, प्रवीण जिल्ला, श्रीकांत जिट्टा, सहसचिव अविनाश मंगलपल्ली, कृष्णा बुर्ला, खजिनदार मनोज पिस्के, सहखजिनदार राहूल दोन्तूल, मिरवणूक प्रमुख मधुकर कोंकत्ती, राजदत्त गुंजाळ, अनिल जक्कन, बाळकृष्ण अवदूत, विनायक अल्ली, देविदास अन्नम, अरविंद रंगा, अविनाश उंबरगी, गोविंद कोंकती, सिध्दार्थ पिलगेटी आदी उपस्थित होते. सूत्रसंचालन व्यंकटेश आकेन यांनी केले.



### विजयकुमार चिंचोळी यांचा सेवानिवृत्तीनिमित्त सत्कार

**सोलापूर, दि. २६ ऑगस्ट-**
डी.एस.टी.एस. मंडळाच्या कॉलेज ऑफ फार्मसीमधील केमिस्ट्री विभागाचे प्रयोगशाळा सहाय्यक विजयकुमार चिंचोळी यांचा सेवानिवृत्तीनिमित्त शक्षकेत्तर कर्मचारी परिवारातर्फे त्यांचा सत्कार करण्यात आला. याप्रसंगी प्राचार्य प्रा. एम.एस. कलशेट्टी, संस्थेचे सहसचिव अविनाश म्हेत्रे, तसेच रेवणसिद्ध कोळी, प्रकाश अतनुरे, लक्ष्मण बिराजदार, नागेश वंजारे, राजाराम नारायणी, अमिता किलजे उपस्थित होते.



### फॅबटेक कॉलेज ऑफ फार्मसीमध्ये जीपॅट पात्र विद्यार्थ्यांचा सन्मान

**सांगोला, दि. २६ ऑगस्ट-**
सांगोला येथील फॅबटेक कॉलेज ऑफ फार्मसीमध्ये राष्ट्रीय पातळीवरील ग्रॅज्युएट फार्मसी प्टीट्युड टेस्ट परीक्षेत यश प्राप्त केलेल्या समृद्धी चौगुले आणि विनोद साठे या विद्यार्थ्यांना सन्मानचिन्ह देऊन गौरविण्यात आले. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून प्रा.मैमुना बॉम्बेवाला ह्या उपस्थित होत्या. सन्मान सोहळ्याची सुरुवात मान्यवरांच्या हस्ते सरस्वती पूजन व दीपप्रज्वलन करून करण्यात आली. व्यवसायिक क्षेत्रात करिअर करीत असताना विद्यार्थ्यांनी आपल्याला कोणत्या क्षेत्रात करिअर करायचे आहे. हे निश्चित करून त्या दृष्टीने आवश्यक विषयांची मांडणी करून अभ्यास करणे आवश्यक आहे असे मत फॅबटेक कॉलेज ऑफ फार्मसीचे प्राचार्य डॉ.संजय बैस यांनी याप्रसंगी व्यक्त केले. सूत्रसंचालन डॉ. योगेश राऊत यांनी केले. आभार प्रा. कांचन दशरथ यांनी मानले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी प्रा.नदीम शेख यांनी परिश्रम घेतले.

# गणेशोत्सवासाठी पंढरपूर पोलिस सज्ज

**शहरात १४५ तर तालुक्यात १४७ सार्वजनिक गणेशोत्सव मंडळांची नोंदणी**

**तालुक्यात सहा ठिकाणी एक गाव एक गणपती उपक्रम राबविणार**

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि.२६ ऑगस्ट-**
या वर्षी शहरात १४५ तर तालुक्यामध्ये १४७ सार्वजनिक गणेशोत्सव मंडळाकडून बुधवारी (ता.२७) गणेशचतुर्थीच्या दिवशी गणपतीबाप्पांची प्राणप्रतिष्ठापना केली जाणार आहे. तालुक्यात सहा गावांमधुन एक गाव एक गणपतीचे आयोजन केले गेले आहे. डॉल्बीमुक्त किंवा नो डॉल्बी मुव्हमेंट या थीममधुन या वर्षीचा गणेशोत्सव साजरा केला जात आहे. या संदर्भात सार्वजनिक गणेशोत्सव मंडळ पदाधिकाऱ्यांच्या घेण्यात आलेल्या बैठकीत संबंधितांना सुचना देण्यात आल्याची माहिती येथील उपविभागीय पोलिस अधिकारी प्रशांत डगळे यांनी दिली.

गणेशोत्सवाबाबत पोलिस प्रशासनाकडून करण्यात आलेल्या नियोजना संदर्भात माहिती देताना उपविभागीय पोलिस अधिकारी प्रशांत डगळे यांनी सांगितले की, गणेशोत्सव शांततेत साजरा करण्यासाठी पोलिस यंत्रणा सज्ज झाली आहे.

प्रतिबंधात्मक कारवाईसह इतर कारवाया केल्या जात आहेत. पोलिस ठाण्याच्या स्तरावर दंगाकाबू पथकाची रंगीत तालीम सुरू आहे. रुट मार्च, कोम्बिंग ऑपरेशन सुरू आहेत. गणेश मंडळांसह शासकीय यंत्रणेशी समन्वय साधून गणेशोत्सव आनंदात साजरा व्हावा व निर्विघ्न पार पडावा, यासाठी पोलिस प्रशासनाकडून प्रयत्न केले जात आहेत.

#### एक गाव, एक गणपतीचे सहा गावांमधून आयोजन

या वर्षी तालुक्यातील नळी, शंकरनगर, भैरवनाथवाडी, बिटरगाव, पुळूजवाडी, अजोती या सहा गावांमधून एक गाव एक गणपतीचे आयोजन करण्यात आल्याची माहिती तालुका पोलिसांकडून देण्यात आली.



#### पोलिसांकडून रुटमार्चचे आयोजन

पंढरपूर तालुक्यातील कासेगाव, जुनाकासेगाव रोड, गोपाळपूर,लक्ष्मी टाकळी यासह अन्य गावात रुट मार्च, कोम्बिंग ऑपरेशन केले आहे. या रुट मार्चच्या दरम्यान पोलिस निरीक्षक टी. वाय. मुजावर, सपोनि.विश्वास पाटील, पोसई विक्रम वडणे, सपोनि, विभावरी रेळेकर, पोलिस कर्मचारी विजय आवटी, सतीश चंदनशिवे, सुजीत उबाळे सुधाकर हेंबाडे,सुनील मोरे आदी उपस्थित होते.

डॉल्बीमुक्त गणेशोत्सव साजरा करावा, रस्त्यावर, मंडपाजवळ गर्दी होऊन वाहतुकीस अडथळा येणार नाही, याची खबरदारी मंडळांनी घ्यावी. सोशल मीडियावरील अफवांवर विश्वास ठेवू नये. उत्सव काळात अनुचित प्रकार आढळल्यास नागरिकांना तत्काळ पोलिसांशी संपर्क साधावा. गणेशोत्सव काळात जर कोणी अनुचित प्रकार करण्याचा प्रयत्न केला तर त्यांच्यावर कडक कारवाई करण्यात येईल.
**- प्रशांत डगळे, उपविभागीय पोलिस अधिकारी, पंढरपूर**

#### पोलिसांकडून प्रत्येक गावात मार्गदर्शन

उपविभागीय पोलिस अधीक्षक प्रशांत डगळे, तालुका पोलिस ठाण्याचे वरिष्ठ पोलिस निरीक्षक टी. वाय. मुजावर यांच्या मार्गदर्शनाखाली पंढरपूर तालुका पोलिस स्टेशन हद्दीतील प्रत्येक गावोगावी जाऊन पोलिस अधिकारी मंडळातील सदस्यांना योग्य त्या सूचना आणि मार्गदर्शन करत आहेत. तर शहरामध्ये शहर पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक विश्वजीत घोडके हे सहकारी अधिकारी आणि कर्मचाऱ्यांसोबत पायी पेट्रोलींग करीत आहेत. या बरोबरच गावातील मंडळांची नोंदणी करणे, पोलिस स्टेशनमधून परवाने घेणे, पारंपरिक पद्धतीने गणेशोत्सव साजरा करणे, महिला व ज्येष्ठ नागरिकांच्या सुरक्षेच्या दृष्टीने आवश्यक गोष्टींचे नियोजन करणे, डॉल्बीमुक्त गणेशोत्सव साजरा करणे, प्रशासनाने दिलेल्या सूचनांचे पालन करणे, कायदा व सुव्यवस्था राखण्यासाठी सहकार्य करण्याचे आवाहन केले जात आहे.

# सोलापूर शहर-जिल्ह्यात दिवसभर 'मघा' च्या सरी

**अतिवृष्टीची शेतकऱ्यांना भीती**

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २६ ऑगस्ट-**
गेल्या पंधरवड्यात आश्लेषा नक्षत्राच्या पावसाने धिंगाणा घातल्यानंतर आता मघा नक्षत्रातील पावसाचीही संततधार सुरू झाली असून, आज (दि. २६) रोजी दिवसभर मघाच्या सरी बरसल्या. यामुळे शहर-जिल्ह्यात जनजीवन विस्कळीत झाले. दरम्यान, मध्यंतरी जिल्ह्याच्या काही भागात अतिवृष्टी झाल्याने काही भागातील शेतकऱ्यांचे नुकसान झाले आहे. दरम्यान, पुन्हा अतिवृष्टीचा अंदाज येत असल्याने शेतकरी बांधवांना या पावसाची धास्ती लागली आहे.



गेल्या पंधरा दिवसात जिल्ह्यात मोठ्या प्रमाणात पाऊस झाल्याने खरिपाच्या पिकांना धोका होत आहे. सोलापूर जिल्ह्यातील उत्तर सोलापूर, दक्षिण सोलापूर आणि अक्कलकोट तालुक्यात सर्वाधीक पाऊस झाला आहे. या तीन तालुक्यातील ८ मंडलात तुफान पाऊस झाल्याने शेतकऱ्यांचेही मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. दरम्यान, यासाठी पालकमंत्र्यांच्या आदेशान्वये पंचनामे सुरू झाले आहेत.


हे पंचनामे झाल्यावर त्याचा अहवाल लागलीच शासनाकडे पाठविणार असल्याची माहिती जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांनी दिली आहे. याचबरोबर सीना नदीला आलेल्या पुरामुळे अनेक शेतकऱ्यांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले असून, यातील जवळपास २५०० शेतकऱ्यांच्या शेती नुकसानीचे पंचनामे झाले आहेत. या भागातील सर्वच शेतकऱ्यांच्या शेतीचे पंचनामे करून त्याचाही अहवालही लवकरच शासनाकडे पाठविण्यात येणार आहे. आता पुन्हा पाऊस सुरू झाल्याने शेतकऱ्यांना अतिवृष्टीचे भय निर्माण झाले आहे.

# 'घर घर संविधान' योजनेची जिल्ह्यात प्रभावी अंमलबजावणी करणार

**आरडीसी अभिजित पाटील यांची माहिती**

**'घरोघर' संविधान उद्देशिकेची फोटोप्रत देण्यात येणार**

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २६ ऑगस्ट-**
महाराष्ट्र सरकारने घर घर संविधान उपक्रम राबवण्याचे ठरवले आहे. संविधानाच्या ७५ व्या वर्षानिमित्त हा उपक्रम राबवण्याचे ठरवण्यात आले आहे. शाळा, महाविद्यालये, शैक्षणिक संस्थांसह आता घराघरात हा उपक्रम राबवण्यात येणार आहे. इतकेच नाहीतर आपल्या शहर-जिल्ह्यातील प्रत्येकाच्या घरात संविधानाच्या उद्देशिकेची एक फोटोप्रत देण्यात येणार असल्याची माहिती आरडीसी अभिजित पाटील यांनी आज (दि. २६) दिली.




सर्वांना संविधानाच्या महत्त्वपूर्ण मूल्यांबद्दल जागरूक करणे आणि त्यांचे हक्क व कर्तव्ये समजून देणे हा यामागचा उपक्रम असल्याचे सांगण्यात आले आहे. सरकारने जारी केलेल्या शासकीय निर्णयात (जीआर) विद्यार्थ्यांना संविधानातील त्यांच्या मूलभूत हक्क आणि कर्तव्ये समजून घेण्यासाठी प्रोत्साहित करण्याचे महत्त्व सांगितले आहे.

२६ नोव्हेंबर १९४९ मध्ये संविधान स्वीकारण्यात आले होते आणि २६ जानेवारी १९५० मध्ये संविधानाची अंमलबजावणी करण्यात आली होती. सगळ्या शाळा, महाविद्यालयांना या उपक्रमात समाविष्ट करून घेतले जाणार आहेत. राज्याने शाळा, महाविद्यालये आणि वसतिगृहांमध्ये संविधानाची उद्दिष्टे ठळक ठिकाणी लावण्याचे आदेश दिले आहेत, जेणेकरून विद्यार्थी सहजपणे त्याचे वाचन करू शकतील. तसेच, वसतिगृहांमध्ये संविधानाच्या उद्दिष्टांचे दैनंदिन वाचन देखील करण्यात येणार आहे. याचबरोबर आता घर घर संविधान हा उपक्रम नव्याने सुरू करण्यात आला असून, हा उपक्रम वर्षभर चालणार आहे.

संविधानाची सखोल ओळख व्हावी यासाठी व्याख्यानेही आयोजित करण्यात येणार आहेत. संविधानाच्या निर्मितीची प्रक्रिया, त्यातील विविध विभाग, अधिकार आणि कर्तव्ये याबद्दलची त्यातून माहिती दिली जाईल. याशिवाय, संविधानाच्या महत्त्वावर विशेष कार्यशाळा व चर्चासत्रे आयोजित करण्यात येणार आहेत. 'घर घर संविधान' योजनेच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी महाराष्ट्राचे मुख्य सचिव यांच्या अध्यक्षतेखाली १२ सदस्यीय समिती स्थापन करण्यात आली आहे. एकंदरीत, 'घर घर संविधान' या नवीन मोहिमेचा जिल्हाभर प्रभावी अंमल करणार असल्याचेही पाटील यांनी सांगितले.



अकलूज येथे गणेश चतुर्थीनिमित्त श्री गणेशाची प्राणप्रतिष्ठापणासाठी श्री गणेशाला मोठ्या उत्साहात घेऊन जाताना. (छाया : शकुर तांबोळी, अकलूज)



### आचार्य श्री शांतिसागर वक्तृत्व स्पर्धेचा बक्षीस वितरण सोहळा उत्साहात

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २६ ऑगस्ट-**
श्राविका संस्थानगर येथे प.पू. चारित्र्य चक्रवर्ती प्रथमाचार्य शांतिसागर महाराजांच्या पावन पुण्यतिथी निमित्त आयोजित केलेल्या ७०व्या श्री आचार्य शांतिसागर वक्तृत्व स्पर्धेचा बक्षीस वितरण सोहळा अतिशय उत्साहात व थाटात संपन्न झाला.

भारत वर्षीय दि. जैन तीर्थरक्षा कमिटीचे अध्यक्ष मिहीर गांधी यांच्या अध्यक्षतेखाली हा सोहळा झाला. यावेळी निशा नूतनकुमार कस्तुरचंद गांधी, अरुण धनपाल उपाध्ये, देवई शहा, दीप्ती शहा, अनिल जमगे, महावीर शास्त्री, डॉ. सरिता कोठाडिया, सुभाष वनकुद्रे, अतुल शहा, आशिष दोशी, मनीष शहा, त्यागी-व्रती अनंतमतीभून बेडकीहाळे, अश्विनी पंडित, बाळासाहेब पौळ, प्रांजली काटकर आदी उपस्थित होते. प्रारंभ प. पू. आचार्य श्री शांतिसागरजी महाराजांच्या प्रतिमा पूजन व दीप प्रज्वलनाने झाला. स्वागत पल्लवी खांडवे व सोनाली उंडे यांनी सुमधुर गीताने स्वागत केले. उमाबाई श्राविका विद्यालयाचे प्राचार्य सुकुमार मोहोळे यांनी प्रास्ताविक केले. बक्षीस पात्र विद्यार्थ्यांची यादी वाचन अनुप कस्तुरे यांनी केले. या ७० व्या वक्तृत्व स्पर्धेत शहरातील ५० हून अधिक शाळा व महाविद्यालयातील अकराशे पेक्षा अधिक विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदविला होता. ११ गटांमध्ये संपन्न होणारे या स्पर्धेमधील प्रत्येक गटातून प्रथम द्वितीय व तृतीय क्रमांक तसेच दोन उत्तेजनार्थ क्रमांक पटकाविणाऱ्या विद्यार्थ्यांना क्रमशः १००१, ७०१ व ५०१ रुपयांचे रोख बक्षीस त्याचबरोबर गौरव प्रमाणपत्र व स्मृतिचिन्ह देऊन सर्वांचा भव्य सत्कार करण्यात आला. आकर्षक फलक लेखन प्रवीण कंदले यांनी तर स्वागताची रांगोळी केतकी सोनटक्के यांनी साकारली होती. सूत्रसंचालन सुकुमार वारे यांनी केले. मुख्याध्यापिका राखी देशमाने यांनी आभार मानले.

# प्रधानमंत्री पीकविमा योजनेत ३ लाख २९ हजार शेतकऱ्यांचा सहभाग

**हप्ता वाढल्याने अनेक शेतकऱ्यांचे दुर्लक्ष**

**तभा वृत्तसेवा । अविनाश गायकवाड**
**सोलापूर, दि. २६ ऑगस्ट-**
खरीप हंगामासाठी यंदा नवीन पीकविमा योजना सुरू झाली आहे. शेतकऱ्यांनी या योजनेत सहभागी होऊन आपल्या पिकांचे संरक्षण करावे, असे आवाहन शासनाकडून वारंवार करण्यात येत आहे. मात्र यंदा १ रूपयात पीकविमा उतरता येत नसल्याने जिल्ह्यातील अवघ्या ३ लाख २९ हजार ३२० शेतकऱ्यांनी २ लाख ४८ हजार ९१९ हेक्टरवर पीकविमा भरला आहे. शेतकऱ्यांसाठी पीकविमा योजनेत सहभागी होण्याची अंतिम मुदत १४ ऑगस्ट होती. गतवर्षीच्या तुलनेत यंदा अत्यंत कमी शेतकऱ्यांनी पीकविमा उतरला आहे.

या योजनेत, नैसर्गिक आपत्ती, कीड आणि रोगराईमुळे पिकांचे नुकसान झाल्यास शेतकऱ्यांना आर्थिक मदत दिली जाते. महाराष्ट्र सरकारनं शेतकऱ्यांसाठी आणलेली सर्वसमावेशक म्हणजेच १ रुपयात पीकविमा योजना बंद केली आहे. दोन वर्षं सुरू ठेवल्यानंतर सरकारकडून ही योजना बंद करण्याचा निर्णय घेतला. महाराष्ट्रात २०१६ च्या खरिप हंगामापासून 'प्रधानमंत्री पीक विमा योजना' राबवण्यात येते. १ रुपयात पीक विमा योजनेत अनेक घोटाळे पाहायला मिळाले. १ रुपयात पीक विमा योजना सुरू केल्यानंतर लाखो बोगस अर्ज देखील पाहायला मिळाले. हजारो कोटी रुपयांचा अपव्यय होतो आहे. त्यामुळे गरजू शेतकरी वंचित राहतील अशी अवस्था येऊ नये हा विचार करुन सुधारित पद्धतीनं ही योजना लागू केली आहे.

२०२४ च्या खरिप-रबी हंगामात पीक विमा योजनेसाठी ५ लाख ८२ हजारांहून अधिक बोगस अर्ज दाखल झाले. या अर्जांद्वारे, खोट्या व बनावट कागदपत्रांद्वारे सरकारी, गायरान, मंदिर-मशिदींच्या जमिनी आणि पडीक जमिनींवर शेती केल्याचं दाखवून विमा उतरवण्यात आला. आता १ रुपयाऐवजी शेतकऱ्यांना पूर्वीप्रमाणे खरिप हंगामासाठी विमा संरक्षित रकमेच्या २ %, रबी हंगामासाठी १.५% आणि दोन्ही हंगामातील नगदी पिकांसाठी विमा संरक्षित रकमेच्या ५ % एवढा हप्ता भरावा लागणार आहे. उदाहरणार्थ, समजा तुम्हाला खरिप हंगामात १ हेक्टर क्षेत्रावरील सोयाबीन पिकाचा विमा उतरवायचा आहे आणि सोयाबीनला हेक्टरी विमा संरक्षण ३५,००० रुपये आहे. तर ३५,००० रुपयांच्या २ % म्हणजे प्रती हेक्टर ७०० रुपये शेतकऱ्याला द्यावे लागणार होते. यामुळे अनेक शेतकऱ्यांनी पिकविमा काढण्याकडे पाठ फिरविली आहे.

#### तालुकानिहाय खालील शेतकऱ्यांनी भरला पीकविमा

जिल्ह्यातील २ लाख ४८ हजार ९१९.०६ हेक्टरवर ३ लाख २९ हजार ३२० शेतकऱ्यांनी पीकविमा भरला आहे. यामध्ये अक्कलकोट ६५ हजार २०३ शेतकऱ्यांनी ४८ हजार ६१८.७७ हेक्टरसाठी पिकविमा भरला आहे. तर बार्शी ८७,१८६-७५,१८६.०५, करमाळा २९९२३-१६४९३.३५, माढा २९७१४-१८१४६.१७, माळशिरस ४५३२-२४९३.१४, मंगळवेढा ३०७३६-२२६६१.७५, मोहोळ १०४५३-९६६३.६३, पंढरपूर १०५८-७१२.१३, सांगोला ३५४४९-२३००१.६१, उत्तर सोलापूर १५३६५-१५००१.९० असा आहे.

प्रधानमंत्री फसल बीमा योजना

हे पत्र मुद्रक व प्रकाशक दिलीप शिवमुर्ती दुलंगे यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय १९/२० औद्योगिक वसाहत, होटगी रोड, सोलापूर येथे छापून सोलापूर, धाराशिव, लातूर,संपूर्ण मराठवाडा तसेच पश्चिम महाराष्ट्र सातारा,सांगली,कोल्हापूर येथील सोलापूर तरुण भारतच्या विभागीय कार्यालयातून प्रकाशित करून वितरीत केले. ● प्रबंध संपादक : विवेक कृष्णाजी घळसासी. ● समूह मुख्य संपादक : दिलीप यशवंत पेठे.● मुख्य संपादक :प्रशांत वसंतराव माने दैनिक सोलापूर तरुण भारत रजि.नं.G2/RNP/SLP/D/32/2024-26.RNI Reg.No.46878/87. दूरध्वनी -संपादकीय-(०२१७)-२६००४९८ ● जाहिरात विभाग (०२१७)-२६००३९८. E-mail starunbharatgmail.com. ● Website:http://dainiktarunbharat/ या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही. (पी. आर. बी. कायद्यानुसार जबाबदारी)

Mr. Dilip Shivmurthi Dulange is the publisher on behalf of the Company Solapur Tarun Bharat Media Limited., and Daily Solapur Tarun Bharat. We print/publish and distribute these Editions like Solapur, Dharashiv, Latur Nanded, Parbhani, Hingoli, Jalna, and Beed from Register Address 19/20, Industrial Estate, Hotgi Road, Solapur – 413003. ● Mr. Vivek Krishnaji Ghalsasi - Dissertation Editor / ● Mr. Dilip Yeshwant Pethe - Group Chief Editor ● Mr. Prashant Vasantrao Mane - Chief Editor, Daily Solapur Tarun Bharat Postal Register No. G2/RNP/SLP/D32/2024-26. RNI Register No. 4687/87. Editorial Department Tel. No. – 0217-2600398) Email ID starunbharat@gmail.com and Advertisement Department Tel. No. – 0217-2600498, ● Website: https://dainiktarunbharat.com/, ● Epaper: https://epaper.dainiktarunbharat.com/. The Editors / Directors do not necessarily agree with the views expressed in the news and articles published in this issue. (responsible as per PRB Act)

CMYK

सोलापूर दिनांक

**सोलापूर तरुण भारत,** सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

## न्यू रंगराजनगर गणेशोत्सव मंडळ अध्यक्षपदी कोत्तापल्ली, सचिवपदी कांबळे

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, ता. २६ ऑगस्ट-**

न्यू रंगराजनगर गणेशोत्सव मंडळाच्या अध्यक्षपदी विवेक कोत्तापल्ली तर सचिवपदी दिनेश कांबळे यांची निवड करण्यात आली.

संस्थेचे अध्यक्ष विनोद केंजरला यांच्या उपस्थितीत झालेल्या मंडळाच्या बैठकीत यंदाच्या गणेशोत्सवासाठी नूतन पदाधिकारी निवडण्यात आले. अन्य पदाधिकारी असे : उपाध्यक्ष विपुल गुर्रम, मुज्जू महागमी, सुरज म्हमाणे, सुरेश हंचाटे, तन्मय बोगम, मनीष सारंगी, अक्षय कांबळे, निलेश काजळे, सहसचिव दुर्गेश तांबे, ऋषी फलमारी, खजिनदार शेखर तडका, सहखजिनदार नितीन ताटीपामुल, अभिषेक उदगिरी, मिरवणूकप्रमुख रवी चव्हाण, स्वप्निल जवंजाळ, देवेंद्र जिल्ला, पूजाप्रमुख वासु गज्जम, श्रीनिवास म्हंता, साखरे, सतीश दासरी, आलोकसिंग चव्हाण,कार्याध्यक्ष हर्ष सारंगी, वंशी जक्का, सहकार्याध्यक्ष श्री स्वप्निल जिल्ला, ओंकार टोणपे, तेजस गौरांग, मंडप प्रमुख : वासु गज्जम, चिन्ना गजेली, सल्लागार अमृत केंजरला, तोफिक तांबोळी, साखरे मामा, कीर्तीकुमार उदगिरी, किशोर उदगिरी, बालाजी म्हंता अविनाश दासरी, सचिन एकबोटे, अय्यप्पा गंजेली, चिंता, व्यंकटेश निलुर, पवन गजेली, महिला मंडळ सदस्य संगीता केंजरला, स्वाती नारकर, मीनाक्षी करपे, सुनंदा गाजूल, उमा संगा, मयुरी कोत्तापल्ली, लक्ष्मी तडका, पूजा एकबोटे, अंजली चव्हाण, लावण्या उदगिरी, दीपा उदगिरी, टोणपे, पूजा कांबळे, लक्ष्मी गजेली.


विवेक कोत्तापल्ली


दिनेश कांबळे



https://dainiktarunbharat.com, https://epaper.dainiktarunbharat.com
सोलापूर तरुण भारत

## ▶▶ महत्वाचे...

### हिंगुलांबिका शाळेची पौर्णिमा पंगुडवाले वक्तृत्व स्पर्धेत तृतीय

**सोलापूर, दि. २६ ऑगस्ट-**

साखरपेठ येथील बाहुसार शिक्षण प्रसारक मंडळ संचलित हिंगुलांबिका प्राथमिक शाळेतील पौर्णिमा विजय पंगुडवाले हिने वक्तृत्व स्पर्धेत तृतीय क्रमांक संपादिला. श्री आचार्य शांतिसागर पुण्यतिथी वक्तृत्व स्पर्धा फंड, श्राविका संस्थानगरच्या वतीने ७०वी श्री आचार्य शांतिसागर वक्तृत्व स्पर्धेत इयत्ता चौथीची विद्यार्थिनी पौर्णिमाने वक्तृत्व स्पर्धेतील गट क्रमांक ५मध्ये भाग घेऊन हे यश मिळविले. त्याबद्दल प्रशस्तीपत्र, स्मृतीचिन्ह आणि रोख रुपये ५०१/ रुपये देऊन तिचा गौरव करण्यात आला. याप्रसंगी तिला वर्गशिक्षक सुमित औसेकर यांचे मार्गदर्शन लाभले. त्याबद्दल संस्थेचे अध्यक्ष बापू ढगे व सचिव विजय पुकाळे यांनी त्यांचे अभिनंदन केले.



### हँडल लॉक करून ठेवलेली सव्वा लाखाची दुचाकी लंपास

**सोलापूर, दि. २६ ऑगस्ट-**

जुना पूना नाका, जीवनराज भवन येथे हँडल लॉ करून ठेवली होती, सव्वा लाख रुपये किंमत असलेली दुचाकी (एमएच२१ बी एक्स ७८३९) अज्ञाताने लंपास केली असून याप्रकरणी पोलिसांत गुन्हा दाखल झाला आहे. याबाबत लवकेश अभय देसरडा (रा.जीवनराम भवन,जुना पूना नाका,सोलापूर) यांनी दिलेल्या फिर्यादीवरून फौजदार चावडी पोलिसांत गुन्हा नोंद झाला.





### व्यापाराच्या घरातून एक लाखाचा ऐवज लंपास

**सोलापूर, दि. २६ ऑगस्ट-**

व्यापाऱ्याच्या घराच्या गच्चीवरील उघड्या असलेल्या दारातून घरात प्रवेश करून घरातील कपाटामध्ये एक लाखाची रक्कम अज्ञाताने लंपास केली आहे. ही घटना २४ ऑगस्ट रोजी रात्री साडे सात ते साडेआठच्या सुमारास न्यू पाच्छा पेठ, पाथरूट चौक या ठिकाणी घडली आहे.याबाबत आनंद केशव मुदगल (वय ४३, रा.न्यू पाच्छा पेठ,पाथरूट चौक)यांनी दिलेल्या फिर्यादीवरून सदर बझार पोलिसांत सोमवारी रात्री गुन्हा दाखल करण्यात आला आहे. आनंद मुदगल यांचे दुकान आहे. तरी २४ ऑगस्ट रोजी घराच्या गच्चीवरील चुकुन दार उघडे होते. घरात कोणीच नव्हते, आनंद मुदगलही बाहेर गेले होते. त्यामुळे चोरट्याने गच्चीवरील उघड्या दारातून रात्री साडे सात ते साडे आठच्या सुमारास घरात प्रवेश केला. घरातील बेडरूममध्ये असलेल्या लोखंडी कपाटातील १ लाख रुपये लंपास केले यावरून सदर बझार पोलिसांत गुन्हा दाखल केला आहे. या प्रकरणाचा तपास पोलिस हवालदार सागर सरतापे करीत आहेत.



### पैशाच्या कारणावरून विवाहितेचा छळ, तिघांवर गुन्हा

**सोलापूर, दि. २६ ऑगस्ट-**

विवाहितेच्या चारित्र्यावर संशय व पैशाची मागणी करून तीस मारहाण व छळ केला या प्रकरणी तिघांवर एमआयडीसी पोलिसांत गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याबाबत शिवानी विशाल वाकोडे (वय ३० रा. विडी घरकुल,सोलापूर) यांनी दिलेल्या फिर्यादीवरून पती विशाल, सासू रचना व दीर कुणाल (सर्व रा. मुंबई) यांच्यावर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. ही घटना १५ मार्च २०१६ ते ५ ऑगस्ट २०२५ दरम्यान विवाहितेच्या सासरी लिबर्टी गार्डन मालाड,मुंबईया ठिकाणी घडली. विवाहिता सासरी नांदत होती. पती व सासू-दीर यांनी तिच्या चारित्र्यावर संशय घेतला. तसेच पैसे मागण्याच्या कारणावरून तिला अपमानीत करून शिवीगाळ-मारहाण करून छळ केला. असे पोलिसांत दिलेल्या फिर्यादीत म्हटलं आहे.

# आज लाडक्या बाप्पाचे आगमन...

## ● अबालवृध्दांमध्ये कमालीचा उत्साह तर गौरींच्या सेवेसाठी गृहिणींची तयारी


सोलापूर : गणपती बाप्पाचे पूर्वसंध्येला आगमन... बाप्पाच्या मनमोहक मूर्तींची पाहणी करताना गणेश भक्त

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २६ ऑगस्ट-**

महाराष्ट्रातच नव्हे तर संपूर्ण देशात गणेशोत्सव मोठ्या उत्साहाने आणि भक्तीभावात साजरा केला जातो. बुधवारी लाडक्या बाप्पाचे आगमन होत असून तमाम सोलापूरकर बाप्पाच्या स्वागतासाठी सज्ज झाले आहे. वरूणराजाने देखील बाप्पांच्या स्वागतासाठी सज्ज असल्याचे दाखवत मंगळवारी दिवसभर रिपरिप सुरुच ठेवली होती. गौरी-गणपतीसाठी आरास, मखर आणि सजावटीचे साहित्य खरेदीसाठी पावसाच्या साक्षीने भक्तांनी गर्दी केली होती.

यंदाच्या वर्षी महाराष्ट्रावर वरूणराजाची मोठी कृपा बरसलेली असल्याने बळीराजासह सर्वजण आनंदी आहेत. लाडक्या बाप्पाच्या आगमनासाठी सज्ज असलेल्यांनी घरगुती गणपतींच्या मूर्ती पसंतीसाठी बाजारात गर्दी केली होती. तर अनेक कुटुंबांनी एक दिवस अगोदरच बाप्पांना घरी घेवून जाणे पसंत केले. शहर व जिल्ह्यातील विविध मंडळांनी देखील सुसज्ज मंडपांची मांडणी करून घेतलेली असून अनेक ठिकाणी पहिल्या दिवसापासून भक्तांसाठी आरास खुली करण्यासाठी प्रयत्न सुरु केले आहेत. मंडळाच्या कार्यकर्त्यांनी विविध मूर्तीकारांच्या कारखान्यात बाप्पांची मूर्ती पसंत करून ठेवलेली असून बुधवारी पारंपरिक वाद्यांसह बाप्पांची प्रतिष्ठापना करण्यासाठी गणपती भक्त कार्यकर्ते तयारीला लागल्याचे चित्र सर्वत्र दिसून येत आहे. बाप्पाच्या आगमनाच्या पार्श्वभूम ीवर महापालिकेने शहरातील विविध रस्त्यांवर पडलेले खड्डे बुजविण्याची मोहिम हाती घेतलेली आहे. तर शहर व जिल्ह्यातील पोलिस देखील बंदोबस्तासाठी सुसज्ज आहेत.

सोलापुरात घरोघरी व सार्वजनिक मंडळांमध्ये या गणरायाचे स्वागत करण्यात येणार आहे. शहरात सार्वजनिक मंडळांतर्फे गणरायाच्या मूर्तीची वाजत गाजत मिरवणुका काढून प्रतिष्ठापना करण्यात येणार असून शहर व जिल्ह्याच्या ग्रामीण भागात गेल्या चार-पाच दिवसांपासून वरुणराजाची दमदार हजेरी लागत असल्यामुळे गणरायाचे स्वागत करताना नागरिकांमध्ये सर्वत्र उत्साह दिसणार आहे. शहरात अतिसंवेदनशील व संवेदनशील ठिकाणी तात्पुरत्या पोलीस छावण्या उभारण्यात आल्या आहेत. उंच इमारतींवर सुद्धा पोलीस कर्मचारी तैनात करण्यात आले आहेत. सार्वजनिक धार्मिक स्थळे, पुतळे तसेच गणेशोत्सव मंडळांची ठिकाणे तपासली जात आहेत. एकूणच लाडक्या बाप्पाचे आगमन होत असून तमाम सोलापूरकर बाप्पाच्या स्वागतासाठी सज्ज झाले आहे.










सोलापूर : लाडक्या गणरायाच्या आगमनासाठी काही तास शिल्लक असताना सजावटीचे साहित्य खरेदी करण्यासाठी सोलापूरकरांनी बाजारपेठेत गर्दी केली होती. बाप्पासाठी फेटा, इको फ्रेंडली मखर, रांगोळी छापे, आसन, फुलांच्या सजावटीसाठी फुले व खेळणी, प्रसादासाठी मिठाई खरेदी करताना टिळक चौक परिसरात मंगळवारी टिपलेले छायाचित्र. (सर्व छायाचित्रे : केवल तिवारी)

## गणेशोत्सवानिमित्त श्रीपूरची बाजारपेठ सजली

**तभा वृत्तसेवा,**
**श्रीपूर, दि. २६ ऑगस्ट-**

महाराष्ट्रातील अत्यंत महत्वाचा सण म्हणजे गणेश चतुर्थी लहानां पासून अबालवृद्धां पर्यंत सर्वांना आनंद देणारा हा उत्सव. बुधवार दि. २७ ऑगस्ट रोजी प्रत्येकाच्या घरात पूजन करून गणपती बाप्पांची प्रतिष्ठापना केली जाते. यावेळी ६ सप्टेबर रोजी अनंत चतुर्दशी येत असल्याने ११ दिवसांचा गणपती समजला जातो.

या पार्श्वभूमीवर श्रीपूरची गणपति बाप्पांच्या आकर्षक मूर्तींनी बाजारपेठ सजली असून नागरिकांनी गणपतीच्या नेण्यासाठी गर्दी केली आहे. अगदी शंभर रुपयांपासून दीड हजारांपर्यंत गणपतिंची विक्री होत असल्याचे गणपती विक्रेते सांगतात. शासनाच्या नियमा नुसार पर्यावरण पूरक वस्तू व रंगापासून या मूर्ती तयार करण्यात आल्या असून दिवसें दिवस गणपती तयार करण्यासाठी वापरण्यात येणारे पीओपी व रंगाच्या किमती वाढल्याने गणपतींच्या मूर्ती मध्येही सुमारे १० टक्के वाढ झाली असल्याचे विक्रेते सांगतात असे असले तरीही मूर्ती खरेदीस चांगला प्रतिसाद आहे. याबरोबरच गौरींचेही आगमन होत असल्याने सजावटी लागणारी विद्युत उपकरणे, फुलांच्या माळा यांचीही दुकाने सजली आहेत.



## कंत्राटी आरोग्य कर्मचाऱ्यांकडून आंदोलनस्थळी हरितालिका पूजन

**आठव्या दिवशीही आंदोलन सुरूच**

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २६ ऑगस्ट-**

जिल्हा परिषदेच्या आरोग्य अभियानांतर्गत काम करणार्या कंत्राटी आरोग्य कर्मचार्यांनी विविध मागण्यांसाठी बेमुदत कामबंद आंदोलन सुरू केला आहे. शासनाचे या आंदोलनाकडे दुर्लक्ष होत असल्याने महिला कर्मचार्यांनी गणेश आगमनापूर्वी करण्यात येणारी हरितालिका पूजन पूनम गेटसमोरच केला.

शासनाच्या चुकीच्या धोरणामुळे महिला कंत्राटी कर्मचार्यांवर ही वेळ आल्याने कर्मचार्यांमधून नाराजी व्यक्त करण्यात आली. सव्वा वर्षे कालावधी होवूनही अंमलबजावणी होत नसल्याने तसेच मानधनवाढ, बोनस, भविष्य निर्वाह निधी कपात, विमा, बदली धोरण मान्य होत नसल्याने आरोग्यमंत्र्यांनी संघटना शिष्टमंडळास समायोजन प्रक्रिया व विविध मागण्यांबाबत आश्वासन दिले होते. पण या आश्वासनाची पुर्तता न झाल्याने राष्ट्रीय आरोग्य अभियानातील कर्मचाऱ्यांनी बेमुदत काम बंद आंदोलनाचे हत्यार उपसले आहे. या आंदोलनामुळे प्राथमिक आरोग्य केंद्रअंतर्गत लसिकरण सत्रासह इतर सर्व कामे, विविध अहवाल तसेच ऑनलाईन व ऑफलाईन स्वरुपाची सर्व कामे बंद पडली आहेत. शासनाने मागण्या मान्य न केल्यास गणेशोत्सवही पूनम गेटसमोरच साजरा करणार असल्याचे कर्मचार्यांनी सांगितले. त्यामुळे विघ्नहर्त्या गणरायाने शासनाला सदबुध्दी देवो, असे साकडे घालण्यात आले.



## आ. सुभाष व विजयकुमार देशमुख एकत्रित

### जिल्हाधिकाऱ्यांकडे शहरातील आयटी पार्कसहर विविध विषयांवर केली चर्चा

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २६ ऑगस्ट-**

भारतीय जनता पार्टीचे ज्येष्ठ आमदार विजयकुमार देशमुख आणि ज्येष्ठ आमदार सुभाष देशमुख या दोघांनी एकत्रित येऊन मंगळवारी जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांची भेट घेतली. दोन्ही देशमुख प्रथमच जिल्हाधिकारी यांच्याकडे गेल्याने त्याची सध्या चर्चा सुरू झाली असून, यावेळी या दोघांनी शहर-जिल्हा विकासाच्या कामावरच विस्ताराने चर्चा केल्याचे सांगण्यात आले.

काही दिवसांपूर्वी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या उपस्थितीत विजयकुमार देशमुख यांनी मोठा कार्यक्रम घेतला. त्या कार्यक्रमात सोलापूरला आयटी पार्क करण्याचा शब्द मुख्यमंत्र्यांनी दिला आहे तसेच शहरातील उड्डाणपूल याविषयी सुद्धा मुख्यमंत्र्यांनी तातडीने कार्यवाही करण्याचा सूचना केल्या आहेत. याच पार्श्वभूमीवर आज मंगळवारी आमदार विजयकुमार देशमुख हे जुळे सोलापूर परिसरात गेले होते. तेव्हा परत येताना त्यांनी विकास नगर येथील आमदार सुभाष देशमुख यांच्या संपर्क कार्यालयात जाऊन त्यांची भेट घेत चर्चा केली. या भेटीनंतर हे दोन्ही नेते जिल्हाधिकारी कार्यालयाकडे रवाना झाले. या ठिकाणी जिल्हाधिकारी आशीर्वाद यांची भेट घेऊन बराच वेळ त्यांच्याशी शहरातील प्रलंबित विकास कामांबाबत चर्चा केली. मुख्यमंत्र्यांनी एम आयडीसी अंतर्गत आयटी पार्क व्हावे अशा सूचना केल्या होत्या तर या आयटी पार्कला आमदार सुभाष देशमुख यांनी चिंचोली एमआयडीसीतील काही जागांचा पर्याय माध्यमांसमोर बोलून दाखवला होता. एकीकडे पालकमंत्री जयकुमार गोरे यांच्या नेतृत्वाखाली अक्कलकोटचे आमदार सचिन कल्याणशेट्टी आणि शहर मध्यचे आमदार देवेंद्र कोठे यांची वाटचाल सुरू असताना दुसरीकडे आता दोन आमदार देशमुख हे आता एकत्र आल्याचे पाहायला मिळत आहे. यावरून शहरात आता थेट दोन देशमुखांचा गट आणि कोठे, कल्याणशेट्टी आणि पालकमंत्री यांचा गट असा उघड उघड पाहायला मिळत आहे. दरम्यान, आगामी स्थानिक स्वराज्य संख्येच्या निवडणुकीतही पालकमंत्री आणि दोन्ही आमदार देशमुख यांची भूमिका काय राहणार? हे येणारा काळच सांगणार आहे.




## मैत्रिणीसोबत बोलण्याच्या कारणावरून कोयत्याने मारहाण,चौघांवर गुन्हा

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २६ ऑगस्ट-**

एकाने तु माझ्या मैत्रिणीसोबत का बोलतो अशी विचारणा करीत असताना दुसऱ्याने कोयत्याने हातावर वार करून जखमी केले. याप्रकरणी तिघांवर पोलिसांत गुन्हा नोंद करण्यात आला आहे. ही घटना सोलापूर रेल्वे स्टेशनजवळ सायंकाळी साडे पाचच्या सुमारास घडली आहे.

याबाबत ओंकार दिनेश काळे (वय ४७ रा.न्यू तिऱ्हेगाव फॉरेस्ट,सोलापूर) यांनी दिलेल्या फिर्यादीवरून अक्षय राहुल परदेशी व इतर त्याचे तीन मित्र यांच्यावर सदर बझार पोलिसांत गुन्हा दाखल करण्यात आला आहे. २३ ऑगस्ट रोजी सायंकाळी साडे पाचच्या सुमारास ओंकार सोलापूर रेल्वे स्टेशनजवळ थांबला होता. आरोपींपैकी एकाने तु माझ्या मैत्रिणीसोबत का बोलतो असे म्हणून शिवीगाळ केली, त्यावेळी ओंकार याने त्यास विरोध केला. अक्षय परदेशी याने अचानक कोयता घेवून ओंकारच्या अंगावर धावून गेला. व कोयत्याने हल्ला करीत असताना ओंकार याने तो वार चुकवण्यासाठी हात पुढे केला, कोयत्याचा वार फिर्यादीच्या डाव्या हातावर झाल्याने जखम झाली आहे. या प्रकरणाचा तपास हवालदार गडेराव करीत आहेत.

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.
सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/

## ज्ञानामृत आनंदलहरी - ११९०

**अवघा बाह्य रंग ।**
**आंत हिरवे वरी सोंग ।।**

निसर्गाने मानवाला बुध्दी दिल्यामुळे माणूस या बुध्दीचा हवा तसा उपयोग करुन घेतो. मानव ही बुध्दी इतरांवर प्रभाव टाकण्यासाठी किंवा आपले गुपित झाकण्यासाठी वापरल्याशिवाय राहात नाही. आपणच इतरांपेक्षा श्रेष्ठ आहोत किंवा आपण चुकीच्या पध्दतीने वागत नाही. असे दाखविण्याचा माणूस मनोमन प्रयत्न करतो. दुसऱ्या शब्दात सांगायचे झाले तर माणूस अंतर्गत वर्तन वेगळे ठेवतो आणि बाह्यवर्तन वेगळे ठेवतो, असे म्हणता येईल. सर्वांचे अंतर्गत वर्तन आणि बाहयवर्तन सारखेच असते तर समाजात फसवा-फसवी, चोरी, लुबाडणूक झालीच नसती. पण वाईटातले वाईट घडत असल्याचे आपण दैनंदिन जीवनात अनुभवत आहोत. याचाच अर्थ असा होतो की, माणूस अंतर्गत वर्तन वेगळे ठेवत आहे आणि बाह्यवर्तन वेगळे करीत आहे. बगळ्या, सरड्याला नांव ठेवणारा माणूस स्वत:ही रंग बदलतो आहे, हे मान्यच करावे लागेल, नको तेवढे बाहय आकर्षण, बाहय दिखावा करणारा, सहजपणे गोड बोलून फसवणारा माणूस आतून वाईटात-वाईट स्तराला पोहचत चालला आहे. हे सांगतांना तुकाराम महाराज म्हणतात,



**अवघा बाह्य रंग । आंत हिरवे वरी सोंग ।।**

आपले इच्छित साध्य करण्यासाठी माणूस नम्रता, आपुलकी विश्वास इत्यादीच्या माध्यमातून नको तेवढे सोंग आणतो. या सोंगात तो यशस्वी झाला म्हणजेच त्याचे इच्छित साध्य झाले की, तो आपला रंग पालटतो. अर्थात मनातील वाईट विचाराची कृती करुन तो मोकळा होतो. मानवाच्या अशा बाह्य आणि अंतर्गत वृत्तीबददल उदाहरणादाखल बोलायचे झाले तर, दैनंदिन जीवनात होत असलेले हुंडाबळी, पती-पत्नीतील ताटातूट, मित्रा-मित्रात होणारे वाद, प्रियकर-प्रेयसीचे खूण, बलात्कार, फसवणूक, लुबाडणूक आदी सांगता येईल. बाहय दिखावा करुन अनेकांच्या भावनांशी खेळणे किंवा भावनेचा बाजार मांडणे म्हणजे आतून-बाहेरुन वेगवेगळे वागणेच होय. हा बुध्दीजीवी माणूस साक्षात भगवंताशी आतून-बाहेरुन वेगवेगळा व्यवहार करतो. त्यामुळे प्राणीमात्रांशी तो असा व्यवहार करणार नाही असे होणार नाही. स्वार्थ, अभिमान, अहंकार, मीपणा, ईर्षा, द्वेष, मत्सर, बदल्याची भावना आदी शत्रूंना आपल्यात स्थान देणाऱ्या माणसांकडून इतरांची फसवणूक झाल्याशिवाय राहात नाही. आतून बाहेरुन सारखेपणा जोपासणाऱ्यांची समाजाला नितांत आवश्यकता आहे. समाजाच्या स्थिरत्वाला तडा जाऊ द्यायचा नसेल तर अंत:बाह्य वर्तन समान ठेवावे लागेल. अंतर्गत व बहिर्गत वर्तनाचा परिणाम मानवाच्या व्यक्तिगत जीवनावरही होत असतो. इतरांना आपण फसवत आहोत, असे जरी आपणाला वाटत असले, तरी खऱ्या अर्थाने आपण आपलीच फसवणूक करीत असतो. आपण करीत असलेली फसवणूक इतरांच्या लक्षात येत नसली तरी ती आपल्या लक्षात येतच असते. आपली चूक इतरांच्या लक्षात येण्यापेक्षा आपल्या स्वत:च्या लक्षात येणे अत्यंत आवश्यक असते. त्यामुळे आपणच आपली चूक शोधून त्यात परीवर्तन करण्याचा प्रयत्न करायला हवा. आपला असा प्रयत्न आपणाला एके दिवशी अंत:बाहय वर्तन समान ठेवायला भाग पाडेल. जय जय राम कृष्ण हरी।

**जय जय राम कृष्ण हरी।**

**- ज्ञानदास डॉ. विजयकुमार फड**
**मो. ९४२२२१६४४८**

## सुप्रभात

### आजचा दिवस

| | |
|---|---|
| वार : बुधवार | दिनविशेष - चांगला दिवस, |
| दि. २७ ऑगस्ट २०२५ | श्री गणेश चतुर्थी, श्रीपाद |
| विक्रम संवत् २०८२ | श्रीवल्लभ जयंती, पीठापूर |
| शके - १९४७ | ....राहू काल.... |
| संवत्सर - विश्वावसु | रविवार : दु.४.३० ते ६.०० |
| मास - भाद्रपद | सोमवार : स. ७.३० ते ९.०० |
| शु. चतुर्थी (१५.४३) | मंगळवार : दु. ३.०० ते ४.३० |
| ऋतु - वर्षा | बुधवार : दु. १२ ते १.३० |
| नक्षत्र - चित्रा (अहोरात्र) | गुरुवार : दु. १.३० ते ३.०० |
| योग - शुभ (१२.३३) | शुक्रवार : स.१०.३० ते १२ |
| करण - बव (२८.४८) | शनिवार : स. ९ ते १०.३० |

# मराठा समाजसेवा मंडळावर प्रशासक नेमण्याचा घाट

- मी चुकलो असेल तर फासावर लटकवा पण संस्थेचा बळी घेऊ नका
- मराठा समाज सेवा मंडळाचे अध्यक्ष मनोहर सपाटे यांचा आरोप

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २६ ऑगस्ट-**

मराठा समाजसेवा मंडळ या संस्थेत कोणत्याही प्रकारचा भ्रष्टाचार झाला नाही. असेल तर चौकशी करा. विना चौकशी प्रशासक नेमणूक चुकीचे आहे. एकतर्फी कारवाई नको. आमदार देवेंद्र कोठे यांनी राजकीय स्पर्धा जरूर करावे मात्र सुडातून स्वतःची शिक्षण संस्था जिवंत ठेवण्यासाठी छत्रपती शिवाजी प्रशालेचा बळी घेऊ नये, असा आरोप करत आ. कोठे यांनी प्रशासक नेमण्यासंदर्भात मुख्यमंत्र्यांना दिलेले पत्र मागे घ्यावे, अन्यथा त्यांच्या घरासमोर साखळी उपोषणासह विविध जनआंदोलने करण्यात येतील, असा इशारा मराठा समाज सेवा मंडळाचे अध्यक्ष तथा माजी महापौर मनोहर सपाटे यांनी पत्रकार परिषदेत दिला आहे.

मराठा समाज सेवा मंडळ या धर्मादाय संस्थेवर प्रशासक मंडळ नियुक्त करण्यासंदर्भात आमदार देवेंद्र कोठे यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे लेखी पत्र दिले आहे असे सांगतानाच माजी महापौर मनोहर सपाटे पुढे म्हणाले, मराठा समाज सेवा मंडळा अंतर्गत छत्रपती शिवाजी शिक्षण संकुल स्थापन होऊन ६५ वर्षे झाली आहेत. ही संस्था मराठा समाजाचे भूषण आहे.मराठा समाज सेवा मंडळाला अडचणीत आणण्यासाठी आणण्यासाठी गेल्या दहा वर्षापासून प्रयत्न सुरू आहेत. या संस्थेत कोणताही भ्रष्टाचार नसून संस्थेच्या निवडणुका दर पाच वर्षांनी गुप्त मतदान पद्धतीने होतात. इतर लोकांच्या मदतीने माझ्यावर गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. ते मला संपवू शकतात पण समाजाला आणि समाजाच्या या संस्थेला संपवू शकत नाहीत. राजकीय स्पर्धा जरूर करा. मी दोषी असल्यास माझ्यावर कारवाई करा. फासावर लटकवा मात्र स्वतःची शिक्षण संस्था जिवंत ठेवण्यासाठी छत्रपती शिवाजी प्रशालेचा बळी घेऊ नका.



सुडातून कारवाई करून संस्थेमध्ये काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांच्या पोटावर पाय मारण्याचा प्रयत्न होत आहे.सत्तेचा गैर उपयोग करू नका. आमदार कोठे यांनी मुख्यमंत्र्यांकडे दिलेले कारवाई संदर्भातील पत्र मागे घ्यावे अन्यथा त्यांच्या घरासमोर जन आंदोलन करण्यात येईल, असा इशारा यावेळी माजी महापौर मनोहर सपाटे यांनी दिला आहे. दरम्यान, संघर्ष योद्धा मनोज जरांगे पाटील यांचीही यासंदर्भात मी भेट घेतली. त्यांनी लोकशाही मार्गाने जाण्याचा सल्ला दिला आहे, असेही यावेळी मनोहर सपाटे यांनी स्पष्ट केले. या पत्रकार परिषदेस प्रा. महेश माने, विनायक पाटील, नामदेव थोरात, ज्ञानेश्वर सपाटे, रेखा सपाटे, शिवराज चटके, महादेव गवळी, दत्ता भोसले यांच्यासह पदाधिकारी उपस्थित होते.

# देह सजविण्यापेक्षा आत्मा सजवा

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २६ ऑगस्ट-**

आज प्रत्येक जण देह सजविण्यात दंग आहे. देह सजविण्यापेक्षा आत्मा सजवा. देहरुपी नको आत्मरुपी जगा. आत्मा सुंदर बनविण्यासाठी उत्तम कर्म करा असे प्रतिपादन स्वाध्यायी तृप्ती जैन यांनी केले.



पर्युषण महापर्व विशेष

श्री.जैन श्वेतांबर स्थानकवासी संस्कृती रक्षक संघातर्फे पर्युषण महापर्वानिमित्त बलिदान चौक येथील जैन स्थानकात आयोजित प्रवचनात त्या बोलत होत्या.यावेळी अक्षता कोठारी (मिरजगांव), सोनल चंगेडिया ( सोनाई ) या स्वाध्यायी भगिनी उपस्थित होते. यावेळी बोलताना त्या म्हणाल्या, हा देह नश्वर आहे. देहाची आसक्ती सोडा. देहाचे चोचले पुरविण्यापेक्षा आपला आत्मा कसा सुंदर बनेल यासाठी पुरुषार्थ करा. देह सजविण्यासाठी आपण सर्व करता परंतु आत्म्यासाठी काय ? त्यामुळे आपल्या आत्म्याला गंज लागते.प्रत्येक जण बाह्य सौंदर्य खुलवण्याचा प्रयत्न करतो. पण हे सौंदर्य क्षणिक आहे,चिरकाल टिकणारे नाही हे आपण ओळखायला हवे. मन विकार रहित हवे. काम, क्रोध, मद, मत्सर, माया,लोभ, इच्छा यांचे उच्चाटन व्हायला हवे. आंतरिक सौंदर्य म्हणजे आत्मिक सौंदर्य.

आज प्रत्येक जण इच्छा,आकांक्षा, अपेक्षांचे ओझे घेऊन जगत आहे. फक्त इच्छापूर्तीसाठी धावत आहे. एक इच्छा पूर्ण झाली की मनात दुसरी इच्छा जागृत होतेच. इच्छा आकांक्षांना कुठेतरी लगाम घाला. गरजा मर्यादित हव्यात.आपली इच्छाशक्ती ही आपल्या कर्मबंधाचे कारण बनू नये याची काळजी घ्या. कितीही मिळवले तरी इच्छा काही पूर्ण होत नाही. इच्छांचा जन्म हा मनात होतो,मनाला आवरा.मनाचे गुलाम नको, मालक व्हा.येणारा प्रत्येक सण हा संदेश देत असतो.मनुष्याच्या इच्छाशक्तीत प्रचंड सामर्थ्य असते.पण हे सामर्थ्य तो योग्य जागी वापरत नाही. या इच्छाशक्तीचा वापर योग्य जागी करा. एखाद्या गोष्टीसाठी मनात किती राग अर्थात प्रेम असावे याला मर्यादा आहे. प्रेम निस्वार्थ असावे.जे हवे ते मिळविण्यासाठी प्रयत्न करत असताना नैतिकता बाजूला पडते,असे नको.एखाद्या पदार्थाविषयी खोलवर आसक्ती बाळगू नका. खुंटीला बांधलेल्या जनावराप्रमाणे मनुष्य आपल्या इच्छा,अपेक्षांच्या भोवतीच फिरत असतो. सत्संग म्हटले की उद्यापासून हे आपले ठरलेले वाक्य असते.सत्संगात प्रमाद अर्थात आळस नको.प्रमाद म्हणजे पर बाहेरच्या वस्तूत मद म्हणजे रमणे होय.इंद्रियांच्या सुखात मद म्हणजे रमण्यापेक्षा सत्संगात रमा. त्यामुळे आत्म्याला लागलेला गंज निघून जाईल.आत्मस्वरूप निखरेल.

# अंध, अपंग, अनाथ संस्थांना गणेश मूर्तीचे वाटप



**सोलापूर, दि. २६ ऑगस्ट-**

अंध-अपंग, एचआयव्ही ग्रस्त, निराधार आश्रम, अनाथ आश्रम तसेच वंचितांची शाळा अशा अनेक संस्थांना यंदा गणेश मूर्तीचे वाटप करण्यात येणार आहे. यंदाच्या वर्षीही आस्थाच्या वतीने ३१ संस्थांना जसे की कुष्ठरोग वसाहत, वंचित, अंध, अपंग संस्था, बालक अनाथ आश्रम, क्षयत पिडीतांसाठी कार्य करणाऱ्या संघटना निराधार आश्रम अश्या अनेक संस्थांचा समावेश आहे. श्रींच्या मूर्तीचे वाटप विजापूर वेस मधील चौडेश्वरी मंगल कार्यालयात थाटामाटाने संपन्न झाला. याप्रसंगी अखिल भाविक वारकरी मंडळाचे अध्यक्ष सुधाकर महाराज इंगळे, श्रमिक पत्रकार संघाचे अध्यक्ष विक्रम खेलबुडे, राजशेखर हिरेहब्बु, साधना सांगवी, अमित काबणे, म्हैत्रे, बाळासाहेब मुसतारे आदींची प्रमुख उपस्थिती होती. प्रमुख पाहुण्याच्या हस्ते सर्व संस्था चालकांना गणपती मूर्तीचे वाटप करण्यात आले कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी आस्था रोटी बँकेचे सदस्य हिरेमठ, पुष्कर पुकाळे, कांचना हिरेमठ, छाया गंगणे, श्रद्धा अध्यापक, संपदा जोशी, नीता अकुर्डे, अनिता तालीकोटी, विनोद भोसले, प्रकाश डोंगरे, स्नेहल वनकुद्रे, सुरेखा पाटील, स्नेहा मेहता, प्रतिक्षा लोखंडे, श्रीदेवी पाटील, सविता जोशी विजयालक्ष्मी सिंदगी, वंदना सिंगम, मंगल पांढरे, ज्योत्सना सोलापूरकर, अविनाश मार्चेला, विजय छंचुरे आदी उपस्थित होते.

# 'नो डीजे, नो डॉल्बी' मोहिम राबवून गणेशोत्सव साजरा करावा : मुळीक



## मोहोळ येथे गणेश मंडळांची बैठक

**तभा वृत्तसेवा,**
**मोहोळ, दि. २६ ऑगस्ट-**

लेझर लाईट्सचा वापर टाळण्याबरोबरच डीजे आणि डॉल्बीमुळे ज्येष्ठ नागरिक, महिला आणि लहान मुलांच्या आरोग्यावर होणारा गंभीर परिणाम टाळण्यासाठी नो डीजे नो डॉल्बी असे म्हणत पारंपरिक पद्धतीने गणेशोत्सव साजरा करण्याचे आवाहन मोहोळचे तहसीलदार सचिन मुळीक यांनी केले. त्यांच्या मार्गदर्शनाखाली आणि मोहोळचे पोलीस निरीक्षक हेमंत शेडगे यांच्या उपस्थितीत सर्व गणेश मंडळांची बैठक सोमवारी आयोजित करण्यात आली होती. या बैठकीत गणेश मंडळांच्या समस्यांचा आढावा घेऊन त्यावर मार्गदर्शन करण्यात आले.

लेझर लाईट्सचा वापर टाळण्याबरोबरच डीजे आणि डॉल्बीमुळे ज्येष्ठ नागरिक, महिला आणि लहान मुलांच्या आरोग्यावर होणारा गंभीर परिणाम टाळण्यासाठी पारंपरिक पद्धतीने गणेशोत्सव साजरा करण्याचे आवाहन केले. या मोहिमेला पाठिंबा देत अनेक गणेश मंडळांनी डीजे, डॉल्बी आणि लेझर लाईट्सचा वापर टाळण्याचे मान्य केले. यावेळी मोहोळ पोलीस स्टेशनच्यावतीने यंदा गणराया ॲवॉर्ड देण्याची घोषणा करण्यात आली. हे पुरस्कार मोहोळ शहर आणि ग्रामीण भागासाठी अशा दोन विभागांमध्ये वितरित केले जाणार आहेत. पुरस्कारांचे गुणांकन करण्यासाठी शिक्षक, डॉक्टर्स, पोलीस कर्मचारी आणि महसूल विभागातील अधिकाऱ्यांचा समावेश असलेली समिती स्थापन करण्यात येणार असल्याची माहिती पोलीस निरीक्षक हेमंत शेडगे यांनी दिली. मोहोळ शहर आणि तालुक्यातील सर्व गणेश मंडळांनी डॉल्बीमुक्त गणेशोत्सव साजरा करून प्रबोधनात्मक देखाव्यांद्वारे सामाजिक संदेश देण्याचे आणि पारंपरिक पद्धतीने उत्सव साजरा करण्याचे आवाहन यावेळी करण्यात आले.



# इंदिरा महिला जीवन विकास गृहनिर्माण संस्थेच्या अध्यक्षपदी सुमित्रा गोंडाळ

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २६ ऑगस्ट-**

सोलापूर शहरातील विजापूर रोडवरील इंदिरा महिला जीवन विकास सहकारी गृहनिर्माण संस्था (इंदिरानगर) या संस्थेच्या अध्यक्षपदी श्रीमती सुमित्रा विठ्ठल गोंडाळ, उपाध्यक्षपदी सुवर्णा ईश्वर पांढरे व सचिवपदी अभिजीत महिपत शिंदे यांची बिनविरोध निवड झाल्याचे निवडणूक निर्णय अधिकारी ॲड. एम. डी. घोडके यांनी जाहीर केले.

निवडणूक निर्णय अधिकारी ॲड. एम.डी. घोडके व प्रशासक भंवर यांचे मार्गदर्शनाखाली सदर संस्थेच्या संचालक मंडळाची निवडणूक नुकतीच बिनविरोध झाली.त्यामध्ये संचालकपदी पद्मा दिकोंडा, सरिता नाईक, संगीता मुलगे, विजयालक्ष्मी जमादार, स्नेहल कोठारी, वृषाली चालुक्य, तृप्ती मुळे, रेणुका कारकले, सुचेता उत्तम गायकवाड, अहिल्या महादेव वाघमोडे यांची बिनविरोध निवड झाल्याचे निवडणूक निर्णय अधिकारी घोडके यांनी जाहीर केले याप्रसंगी सर्वश्री बिपिन पाटील, डॉक्टर मोहोळकर, डॉक्टर सचिन मुळे, नाना शिर्के, दीपक जमादार, हर्षवर्धन दिकोंडा, ॲड. कारकले, विभुतिमठ स्वप्निल कोठारी, सांजेकर उपस्थित होते. निवडीनंतर आनंद उत्सव साजरा करण्यात आला.

# बाबुराव जमादार यांना राज्यस्तरीय जीवनगौरव पुरस्कार जाहीर

## मुख्यमंत्र्यांच्या हस्ते पुरस्कार वितरण

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २६ ऑगस्ट-**

जय मल्हार क्रांती संघटना महाराष्ट्र राज्य यांच्यातर्फे देण्यात येणारा राज्यस्तरीय जीवनगौरव पुरस्कार बेडर समाजाचे नेते बाबुराव जमादार यांना जाहीर झाला आहे. आद्य क्रांतिवीर राजे उमाजी नाईक यांच्या ७ सप्टेंबर रोजी पुणे येथे होणाऱ्या २३४ व्या शासकीय जयंती सोहळ्यामध्ये मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते या पुरस्काराचे वितरण होणार आहे.



आद्य क्रांतिवीर राजे उमाजी नाईक यांच्या शासकीय जयंती सोहळ्यासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यासह उपमुख्यमंत्री अजित पवार, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, केंद्रीय सहकार राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ, विधान परिषदेचे सभापती राम शिंदे, विधानसभेचे उपाध्यक्ष अण्णा बनसोडे, महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे, भाजपाचे प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण, आमदार गोपीचंद पडळकर उपस्थित राहणार आहेत.समाजासाठी भरीव कामगिरी करणाऱ्या व्यक्तींना जय मल्हार क्रांती संघटना महाराष्ट्र राज्य यांच्यातर्फे जीवन गौरव पुरस्काराने गौरविण्यात येते. बाबुराव जमादार यांनी भटके विमुक्त समाज आणि मागासवर्गीय समाजासाठी चळवळीद्वारे शिक्षण, साहित्य, कला, रोजगार आदी क्षेत्रात सामाजिक कार्य केले आहे. बाबुराव जमादार यांनी आजवर केलेल्या भरीव कामगिरीची दखल घेऊन त्यांना हा पुरस्कार जाहीर झाला आहे. बाबुराव जमादार यांना राज्यस्तरीय जीवनगौरव पुरस्कार जाहीर झाल्याबद्दल त्यांचे अभिनंदन करण्यात आ

# परसबागतर्फे देशी वृक्षसंवर्धन अभियान आजपासून

## २६ सप्टेंबरपर्यंत चालणाऱ्या अभियानात वृक्षप्रेमींना सहभागी होण्याचे आवाहन

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २६ ऑगस्ट-**

परसबाग सोलापूरतर्फे देशी वृक्षसंवर्धन अभियान या उपक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. या अभियानअंतर्गत वृक्षप्रेमींना स्वतःच्या सोयीनुसार सोयीस्कर ठिकाणी एक अथवा अनेक देशी वृक्षांचे रोपण करुन त्या झाडासह सेल्फी पाठवायचा आहे.दि.२७ ऑगस्ट ते दि २६ सप्टेंबर या कालावधीत हे अभियानात राबविण्यात येणार आहे.



दरवर्षी पावसाळा सुरू झाला की दीपावलीपर्यंतच्या कालावधीत सोलापूर शहरात वृक्षारोपणाचा एक उत्सव सुरु झाल्याचे गेल्या कैक वर्षापासुन पहात आपण आहोत. गेल्या ५०-५५ वर्षापासुन आजपावेतो अक्षरशः कोट्यवधी वृक्ष रोपण केली गेली आहेत.त्यातुन खरे तर सोलापूर शहर सुजलाम् सुफलाम् झाल्याचे अनुभवायला मिळायला हवे होते. परंतु विद्यमान वास्तव तसे नाही हे आपण अनुभवत आहोत.

बुधवार, २७ ऑगस्ट गणेश चतुर्थीपासून देशी वृक्षरोपण आणि संवर्धन अभियान हाती घेण्यात आली आहे. या अभियानात सहभागी होण्याचे आवाहन परसबागचे संस्थापक नारायण पाटील आणि कार्य समन्वयक शिरीष गोळवलकर यांनी केले आहे.

### वृक्षप्रेमींनी असा घ्यावा सहभाग...!

सोलापूर महानगरपालिकेच्या कार्य क्षेत्रातील वय वर्षे आठपासून पुढील कोणतीही प्रत्येक व्यक्ती या अभियानात सक्रीय सहभागी होऊ शकणार आहे. सहभागासाठी ९९६०००८२२० या क्रमांकावर वर ५१ रुपये भरुन नोंदणी करुन लगेचच त्यांनी स्वतःच्या सोयीनुसार सोयीस्कर ठिकाणी एक अथवा अनेक देशी वृक्षांचे रोपण करुन त्या झाडासह सेल्फी पाठवायचा आहे.दिनांक २७ ऑगस्ट ते दिनांक २६ सप्टेंबर या कालावधीत अभियानात सहभाग घेता येणार आहे.सर्व ऋतुंमध्ये चार टप्प्यात ज्याची त्यानेच आपापल्या झाडाची निगा राखून दर तीन महिन्यांनी जियो टॅग आणि स्वतःसह झाडाचा सुस्पष्ट सेल्फी फोटो पाठवायचा आहे. शेवटच्या पाचव्या टप्प्यात म्हणजे चौथ्या टप्याबरोबरच त्या झाडाचा वाढदिवस साजरा करुन त्याचाही सेल्फी फोटो पाठवायचा आहे.

### प्रेरक बक्षिसे, निसर्ग पदवी,पदविका

परसबागची टीम वर्षभरातील पाच टप्प्यांचे अवलोकन करेल.जागेवर झाडाचे निरीक्षण करेल. त्यानुसार उत्तम प्रकारे झाडाचे संगोपन - संवर्धन करणा-या सहभागींना प्रथम, द्वितीय,तृतीय आणि उत्तेजनार्थ अशी एकुण ८४ कार्य बक्षिसे देण्यात येणार आहेत.त्याचबरोबर प्रथम, द्वितीय,तृतीय गटातील प्रत्येकी २१ सहभागींना वृक्ष सखा, वृक्ष साथी, वृक्ष मित्र अशी निसर्ग पदवी/पदविका परसबागच्यावतीने देऊन गौरविण्यात येणार आहे. चौथ्या गटातील २१ सहभागींना उत्तेजनार्थ वृक्ष संवर्धन अभियान सारथी सहभाग प्रमाणपत्र देऊन त्यांचा सन्मान करण्यात येणार आहे.



# नमोकार महामंत्र मंडळातर्फे आचार्य शांतीसागर महाराजांना अभिवादन

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २६ ऑगस्ट-**

सोलापूर चारित्र चक्रवर्ती प्रथम आचार्य आचार्य १०८ श्री शांतिसागर महाराजांना नमोकार महामंत्र मंडळाच्या वतीने अभिवादन करण्यात आले. यावेळी लक्ष्मी उद्योग समूहाचे दीपक पाटील, बाहुबली मंदिर ट्रस्टचे सुधीर पंडित, कुमठे येथील जैन मंदिर ट्रस्टचे श्याम पाटील यांची प्रमुख उपस्थिती होती. उपस्थित मान्यवरांच्या हस्ते आचार्य शांतीसागर महाराजांच्या प्रतिमेचे पूजन करून दीप प्रज्वलन करण्यात आले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक देशभूषण व्हसाळे यांनी केले. आचार्य शांतीसागर महाराजांच्या कार्यावर पंडित माणिक उपाध्ये यांनी प्रकाश टाकला. यावेळी राजेंद्र पाटील, कोमल पाचोरे, पराग मगदूम, किरण कासार, नेमचंद आग्रे, राजकुमार कस्तुरकर, सुरेश तालीकोटी, दीपक शहा, राजकुमार हेरलगे, महाजन, दर्शन झरकर, संदीप पाटील, सुरेखा पाटील, चित्रा जमगे, माया पाटील, पंकजा पंडित, सुरेखा मगदूम, प्रफुल्लता पाचोरे, शोभा झरकर, मनीषा जैन, मुळकुटकर, गौतम जैन आदींनी या अभिवादन कार्यक्रमात सहभाग नोंदवला.

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.
सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/

## महत्वाचे...

### गणेशमूर्तींच्या रंगरंगोटीची कामे अंतिम टप्प्यात

**वळसंग २६ ऑगस्ट-**

वळसंग (ता.दक्षिण सोलापूर) टोल नाका येथे श्री गणपती बाप्पाचे शेकडोमूर्ती तयार असून मूर्तिकार राजशेखर शिवाजी कुंभार यांच्याकडून रंगरंगोटीचे शेवटचे हात फिरवण्यात आले. छोट्याशा मूर्ती पासून मोठ्या मूर्तीपर्यंत योग्य दरात मिळत असल्याचे सांगितले. बाप्पाने मात्र कुठल्या मंडळ माझ्यासाठी स्वागत करतील असे वाट पाहत बसल्याचे दिसून आले. बाप्पाची आगमन एकतेची व सांस्कृतिक परंपरा टिकून राहण्याची सण आहे. बप्पामुळे देवाची सेवा ही आपल्याला लाभले आहे. आम्ही खरंच पुण्यवान आहोत, असे मूर्तिकार राजशेखर यांनी आपले भावना व्यक्त केले.





### पापय्या तालीम संघात लघु रुद्राभिषेक, होमहवन

**सोलापूर, दि. २६ ऑगस्ट-**

जुनी मिल कंपाऊंड येथील पापय्या तालीम संघाच्या वतीने ऐतिहासिक पापय्या तालीम येथे श्रावणमासाचे औचित्य साधून श्री हनुमान देवता यांना लघु रुद्राभिषेक, विधीवत पूजा अर्चना, होमहवन सोहळा भक्तीमय वातावरणात पार पडला. आचार्य संजय जोशी व ब्रम्हवंदांनी मंत्रमुग्ध केले. यावेळी संस्थेचे जगन्नाथ व्यवहारे, उपाध्यक्ष प्रदीप शिर्के, शिवाजी चटके, विजय पाटील, प्रकाश सुरवसे, अजित शिंदे, सूर्यकांत भगत, वसंत कुलकर्णी, पांडूरंग पवार, लक्ष्मण भगत, गजानन लामकाने, मंगेश लामकाने, परशुराम कोळी, राकेश मेट्रे, सौदागर डांगे, विकेश गायकवाड, सुरेश जानकर, संजय हिरळीकर, अतुल कोथींबीरे, दिनेश गुरूबानी, रणजीत खताळ, श्रीनिवास कोटा, संभाजी मळगे, बबन झिंगाडे, अविनाश गेजगे, सचिन वागदरे, यल्लप्पा चव्हाण, प्रदीप जाधव, बलभीम अंधारे, नितीन व्यवहारे उपस्थित होते.



### लष्कर विभाग मध्यवर्ती गणेशोत्सव मंडळाच्या कार्यालयाचे उद्घाटन

**सोलापूर, दि. २६ ऑगस्ट-**

लष्कर विभाग गणेशोत्सव महामंडळाचे मध्यवर्ती कार्यालयाचे उद्घाटन उत्तर सदर बझार जगदंबा चौक येथे जिल्हा सरकारी वकील ॲड. प्रदीपसिंग राजपूत यांच्या हस्ते कार्यालयाचे उद्घाटन करण्यात आले. यावेळी प्रकाश पारसवार, देवेंद्र भंडारे, अब्राहम कुमार, लक्ष्मण बंबेवाले, सागर शिंगे, सुरेंद्र शिवसिंगवाले, रामचंद्र मोतीवाले, करेप्पा जंगम, तुळजाराम खंडेवाले, परळकर, धनराज झंपले, किशोर बाबावाले, राजेश मिनगुले, सुमित मनसावाले, गंगाधर शिंदे, राजू लंगडेवाले, संदीप शेट्टी, चेतन जंगम, नामदेव आरगोळू, अनिल भंडारे, प्रतामसिंग हुलंजतीवाले, नागेश म्हेत्रे, राहुल आळसंदे, नितीन मुकारे, अविनाश तल्लारे, मोहनसिंग जमादार, श्रीनिवास चन्नेपागुल, धनराज बिरबानवाले, अशोक सायबोळु, आनंद पल्लोलू, राजेश कजाकवाले, सालोमन रामपोगु, लखन गायकवाड, डॉ. रफिक सय्यद, मन्नुसिंग बाबावाले, रमेश फुले, राजेश झंपले, राजेंद्र कोरे, जेम्स जंगम उपस्थित होते.



### अतिरिक्त शिक्षकांचे समायोजन करा; जिल्हा प्राथमिक शिक्षक संघाची मागणी

**सोलापूर, दि. २६ ऑगस्ट-**

संच मान्यतेनुसार अतिरिक्त ठरलेल्या जिल्ह्यातील कोणत्याही शिक्षकाचे वेतन थांबवू नये. समायोजन करणे हे प्रशासनाचे काम आहे. याबाबत सकारात्मक चर्चा झाली असून लवकरच अतिरिक्त शिक्षकांचे समायोजन होईल, कोणत्याही शिक्षकांचे वेतन थांबणार नाही, असे आश्वासन शिक्षणाधिकारी कादर शेख यांनी दिल्याची माहिती सोलापूर जिल्हा प्राथमिक शिक्षक संघाचे अध्यक्ष अनिरुद्ध पवार यांनी दिली. या प्रश्नासंदर्भात शुक्रवारी शिक्षक संघाच्या शिष्टमंडळाने शिक्षणाधिकारी कादर शेख, प्रशासन विभागाच्या उपमुख्य कार्यकारी अधिकारी स्मिता पाटील यांची भेट घेतली. यावेळी सरचिटणीस संजय चेळेकर, जिल्हाध्यक्ष अनिरुद्ध पवार, शामराव पाटील, जगन्नाथ म्हेत्रे, दत्तात्रय भोसले, अनिल म्हेत्रे, सुहास जाधव, सचिन मोरे, सुधीर बनसोडे, राजू राठोड आदी उपस्थित होते. यावेळी मुख्याध्यापक, केंद्रप्रमुख पदोन्नतीची प्रक्रिया लवकर राबविण्यात यावी, विषय शिक्षकांना नियमाप्रमाणे वेतन करण्यात यावे, वैद्यकीय देयकांसाठी निधीची तरतूद करून लवकर वैद्यकीय बिले शिक्षकांना अदा करावीत, फंड प्रकरणांना होणारा विलंब टाळण्यासाठी उपाययोजना करण्यात यावी, जिल्हा स्तरावरील व तालुका स्तरावरील 'आदर्श शिक्षक' पुरस्कार वितरण कार्यक्रम वेळेत पार पडावेत, या मागण्या करण्यात आल्या. या संदर्भात जिल्हा परिषद प्रशासनाने सकारात्मकता दर्शविली असल्याची माहिती जिल्हाध्यक्ष पवार यांनी दिली.

# प्राथमिक आरोग्यकेंद्र ठरतेय वृध्द, गरीब रुग्णांसाठी वरदान

### बीपी व शुगरच्या ६५ हजार रुग्णांना मोफत औषधे

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर , दि. २६ ऑगस्ट-**

सोलापूर जिल्हा परिषद आरोग्य विभागाच्या वतीने प्राथमिक आरोग्य केंद्रातून नागरिकांना आरोग्याची सुविधा देण्यात येत आहे. दहा वर्षापूर्वी प्राथमिक आरोग्य केंद्राला गरीब रूग्णच तपासणीसाठी यायचे. मात्र या केंद्रातून धनदांडग्या लोकांना होणारा बीपी व शुगरचा त्रास कमी करण्यासाठी मोफत गोळ्या औषधे मिळत आहे. शिवाय सर्व उपचार वेळेत देण्याचा प्रयत्न होत आहे. या आरोग्य केंद्रात बीपी व शुगरच्या रुग्णांवर योग्य उपचार होत असल्याने याठिकाणी उपचार घेणाऱ्या रुग्णांच्या संख्येत वाढ होत आहे.

तज्ञ डॉक्टरांकडे एखाद्या आजाराची तपासणी करण्यासाठी गेल्यानंतर बीपी व शुगर तपासणी बंधनकारक आहे. त्यामुळे दिवसेंदिवस बीपी व शुगर रूग्णांची संख्या वाढत आहे. एखदा



बीपी व शुगर आजार झाल्यास जीवनभर गोळ्या औषधे घ्यावीच लागते. बीपी व शुगर रूग्ण महागडी औषधे घेऊन जेरीस आलेला असतो. त्यामुळे स्वस्त व मोफत औषधाच्या शोधात असतो. अशा रूग्णांना प्राथमिक आरोग्य केंद्रातून मोफत औषधे मिळत असल्याने रूग्णांमधून समधान व्यक्त करण्यात येत आहे. सध्या या आरोग्य केंद्रात सुमारे ४० हजार बीपीच्या तर २५ हजार शुगरच्या रुग्णावर मोफत उपचार सुरु आहेत.

जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी कुलदीप जंगम, जिल्हा परिषदेचे जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. संतोष नवले यांच्या मार्गदर्शनाखाली प्राथमिक आरोग्य केंद्र व उपकेंद्रात सर्वसामान्य रुग्णांसाठी मोफत आरोग्याच्या सुविधा देण्यात येत आहेत.

आरोग्य केंद्रात येणाऱ्या रुग्णांची रक्तदाब, ईसीजीची तपासणी होते. याशिवाय याठिकाणी मोफत रक्ताचीही तपासणी करण्यात येत आहे. रक्त तपासणीचा अहवाल डॉक्टरांसोबतच रुग्णांना त्यांच्या मोबाईलवर घरपोच देण्यात येत आहे. त्यामुळे आरोग्य केंद्रात उपचार घेण्यासाठी ग्रामीण भागातील रुग्णांची आता चांगलीच गर्दी होत आहे. ग्रामीण भागात ३० वर्षापेक्षा जास्त वय असलेल्या अनेक ज्येष्ठ नागरिकांत बीपी व शुगरचा आजार दिसून येतो. आता या नागरिकांना गावाच्या जवळच असलेल्या ठिकाणी या आजारावर मोफत औषधे मिळत असल्याने ज्येष्ठ नागरिकांचा ओढा प्राथमिक आरोग्य केंद्राकडे उपचारासाठी ओढावल्याचे दिसून येत आहे. प्राथमिक आरोग्य केंद्रात योग्य उपचार व सुविधा मिळत नाहीत अशी ओरड दोन वर्षापूर्वी होती. मात्र आता नागरिकांना याठिकाणी चांगल्या प्रकारच्या आरोग्य सुविधा मिळत असल्याने एका प्राथमिक आरोग्य केंद्रात रोज सुमारे शंभर रुग्णांवर उपचार होत आहेत.

| तालुका | बीपी | शुगर |
|---|---|---|
| अक्कलकोट | ६,९१८ | ४,९५४ |
| बार्शी | ३,९६२ | २,३१२ |
| करमाळा | १,६४८ | १,०९३ |
| माढा | ४,१२३ | २,७०२ |
| माळशिरस | ५,६२० | ३,४२६ |
| मंगळवेढा | ९०२ | ४३७ |
| मोहोळ | ४,१५३ | २,६८५ |
| पंढरपूर | ६,६८५ | ४,६४७ |
| सांगोला | २,०४९ | १,०५२ |
| उत्तर सोलापूर | १,४३१ | ८६६ |
| दक्षिण सोलापूर | १,९४६ | १,२२७ |

प्राथमिक आरोग्य केंद्रात उपचारासाठी आल्यानंतर ३० वर्षापुढील सर्व रूग्णांचे शुगर तपासणी करण्यात येते. शिवाय आजारांनुसार रूग्णांची बीपी तपासणी करून गोळ्या देण्यात येते. दक्षिणमध्ये सर्वच प्राथमिक आरोग्य केंद्रात व उपकेंद्रात शुगर व बीपी तपासणी सुरू आहे. त्यामुळे गरीब रूग्णांना मोफत गोळ्या औषधे मिळत असल्याने पैशाची बचत होते.

**- नीलम घोगरे,**
**तालुका वैद्यकीय अधिकारी, दक्षिण सोलापूर**

# अकलूज- दत्तनगर-खंडाळी बस सेवेचा शुभारंभ

### शाळकरी विद्यार्थ्यांची सोय

**तभा वृत्तसेवा,**
**वेळापूर, दि. २६ ऑगस्ट-**

बऱ्याच दिवसापासून प्रतीक्षेत असलेल्या अकलूज-दत्तनगर-खंडाळी बससेवेचा शुभारंभ मान्यवरांच्या हस्ते करण्यात आला.

यावेळी सचिन पवार यांच्या हस्ते नारळ फोडून बसचे स्वागत करण्यात आले. यावेळी चालक आबा गोसावी यांचा सत्कार विक्रम मेथा व दस्तगीर शेख तसेच वाहक प्रवीण गोसावी यांचा सत्कार जीवन पवार व शिवाजी धनवडे यांच्या हस्ते करण्यात



आला. या बस सेवेमुळे खंडाळी ला जाणाऱ्या विद्यार्थ्यांची तसेच शासकीय व बँकेच्या कामानिमित्त खंडाळीला जाणाऱ्या ज्येष्ठ नागरिकांची मोठी सोय झाली आहे. त्यामुळे नागरिकांतून या सेवेविषयी समाधान व्यक्त होत आहे. या बससेवेच्या शुभारंभप्रसंगी भाजपा युवा मोर्चाचे सरचिटणीस विनोद थिटे, आबा पवार, दिगंबर पवार, मनोज सोनवणे, महेश खिलारे, कुंडलिक आरडे, अजय कुंभार, बाळू सगट, दशरथ इंगवले देशमुख, जाफर सय्यद,चंद्रकांत क्षीरसागर, तानाजी पवार, तुकाराम कांबळे, चांगदेव इंगळे, कोंडीबा सय्यद, केशर पवार, लक्ष्मी क्षिरसागर, कोंडा पठाण तसेच शाळेतील विद्यार्थी यावेळी उपस्थित होते.

# भंते सुमितजी नागसेन यांचे चिंचोलीत प्रवचन

**तभा वृत्तसेवा,**
**पांगरी, दि. २६ ऑगस्ट -**

बार्शी तालुक्यात चिंचोली येथे वर्षावासाचे औचित्य साधून बौद्ध बांधव गुरु पौर्णिमा अर्थात आषाढी पौर्णिमा या काळात आनंद उत्सव साजरा करतात. याच दिवसापासून तीन महिन्याच्या काळात हे कार्यक्रम घेतले जातात.

तथागत बुद्धांनी जगाला अशुद्ध मनाची शुद्धता करण्यासाठी वैज्ञानिक दृष्टिकोनातून धम्म दिला व त्याचे विचार आपल्या प्रवचनातून भिक्षू संघासमवेत मांडले. याचाच भाग म्हणून भन्ते सुमितजी नागसेन यांची बौद्ध बांधवांच्या वतीने प्रवचन सोहळ्याचे आयोजन केले होते याविषयी वृत्तांत असा की विश्वरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या पदस्पर्शाने



सोलापूर जिल्हा २४ वेळा पावन झाला आहे. याच कारणाने भंते नागसेन यांनी संकल्प केला असून जास्तीत जास्त सोलापूर जिल्ह्यात विहाराची निर्मिती व्हावी असे उपस्थितांना सुतोवाच केले.

सध्या भंते नागसेन यांच्या नेतृत्वाखाली नगर, भूम, धाराशिव, खरोसा, लातूर, बार्शी ,मोहोळ, सोलापूर या ठिकाणी विहाराची कामे प्रगतीपथावर आहेत. चिंचोली येथील बांधवांनी फटाक्याच्या आतिषबाजीने स्वागत केले. त्यांच्या हस्ते डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर व बुद्धाच्या प्रतिमेचे पूजन केले. बौद्ध बांधवांच्या हस्ते धम्मदान दिले.

# बार्शीत डीजे बंदी निर्णयाचे स्वागत

### आ. दिलीप सोपलांनी एस.पी. अतुल कुलकर्णी यांचे मानले आभार

**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी, दि.२६ ऑगस्ट-**

कर्णकर्कश डीजे बंदीबाबत सोलापूर ग्रामीण पोलीस अधीक्षक अतुल कुलकर्णी यांनी घेतलेल्या ठोस भूमिकेचे आमदार दिलीप सोपल यांनी अभिनंदन केले आहे.



याबाबत आमदार सोपल यांनी पोलीस अधीक्षकांच्या कार्यालयात जाऊन कर्णकर्कश डीजेचे दुष्परिणाम व त्यावरील उपाययोजना याबाबत चर्चा केली होती. त्यानंतर कुलकर्णी यांनी तत्काळ आदेश काढले.

अभिनंदन पत्रात आमदार सोपल यांनी म्हटले आहे की, 'आपण दिलेला सकारात्मक प्रतिसाद आणि तात्काळ केलेली अंमलबजावणी याबद्दल मनःपूर्वक आभार. बार्शी तालुक्यातील चारही पोलीस ठाण्यांतर्गत या निर्णयाची अंमलबजावणी स्वागतार्ह आहे. तसेच न्यायालयाच्या निर्णयानुसार डीजे बंदीबरोबरच कर्णकर्कश आवाजावरील बंदी व लेझर लाईट्स अपायकारक असल्याने त्यावरही योग्य उपाययोजना व्हावी, अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली आहे. याशिवाय जयंतीसह विविध उत्सव काळात गाव किंवा शहरात एकाच दिवशी मिरवणुकीचे आयोजन करण्यासाठी प्रयत्न व्हावेत, अशीही विनंती सोपल यांनी केली आहे. यामुळे रोजच्या मिरवणुकीमुळे होणारा वाहतुकीचा अडथळा, बाजारपेठा बंद होणे, तसेच विद्यार्थ्यांना, ज्येष्ठ नागरिकांना व रुग्णालय परिसराला होणारा त्रास टाळता येईल, असे त्यांनी म्हटले आहे. डीजे बंदीप्रमाणेच लेझर लाईट्स आणि मिरवणुकीच्या वेळापत्रकाबाबतही योग्य तो निर्णय घ्यावा, अशी मागणी त्यांनी केली असून, या लोकाभिमुख व व्यापक लोकहिताच्या निर्णयासाठी त्यांनी पोलीस अधीक्षकांचे मनःपूर्वक अभिनंदन केले आहे.



# बार्शीतून दोन हजार पेक्षा जास्त गाड्या मुंबईला जाणार

### जरांगे-पाटिल यांच्या आंदोलनात होणार सहभागी

**तभा वृत्तसेवा,**
**वैराग, दि. २६ ऑगस्ट-**

बार्शी तालुक्यातील मराठा समाज सातत्याने मराठा समाजाला आरक्षण मिळावे या मागणीसाठी आग्रही राहिला आहे. मराठा समाज ज्या ज्या वेळी जे जे आंदोलन झाली. त्या त्या आंदोलनात मोठ्या संख्येने सहभागी झाला आहे.

त्या त्या पद्धतीने आंदोलन करून समाजाची मागणी लावून बार्शी तालुक्यातील मराठ्यांनी धरली आहे मागील वर्षी जानेवारीमध्ये संघर्ष दामोदर पाटील यांनी मुंबईमध्ये आंदोलन केले होते. त्यावेळी देखील बार्शी तालुक्यातील मराठी मोठ्या संख्येने सहभागी होते. त्यावेळी सरकारने मराठ्यांची फसवणूक केली आणि मराठ्यांना आरक्षणाचा प्रश्न न सोडवता प्रलंबित ठेवला याचा राग मराठ्यांना आज देखील आहे म्हणून मागील एक महिन्यापासून बार्शी तालुक्यातील जवळपास ८५ ते ९० गावांमध्ये चावडी बैठका घेऊन मराठा समाजाला मोठ्या संख्येने मुंबईकडे जाण्याचा महत्त्व सांगितल्यामुळे बार्शी तालुक्यातून जवळपास २ हजार पेक्षा जास्त गाड्या मुंबईला संघर्ष योद्धा मनोज जरांगे-पाटील यांच्या आंदोलनामध्ये सहभागी होण्यासाठी जात आहेत अशी माहिती आनंद काशीद यांनी सांगितली बार्शी तालुक्यातील चावडी बैठकींना उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत आहे. या चावडी बैठकींना मार्गदर्शन करण्यासाठी युवराज काटे, कपील कोरके, विनायक घोडके व आनंद काशीद यांनी समाजाच्या बैठकी घेऊन जागरूक केले.

### जनता बँकेतर्फे उद्यापासून वाहन कर्ज मेळावा

**सोलापूर, दि.२६ ऑगस्ट -**

सोलापूर जनता सहकारी बँकेतर्फे २८, २९ आणि ३० ऑगस्ट रोजी चारचाकी वाहन कर्ज मेळाव्याचे आयोजन करण्यात आल्याची माहिती सोलापूर जनता सहकारी बँकेचे अध्यक्ष सुनील पेंडसे यांनी दिली.

हुतात्मा स्मृती मंदिराच्या वाहनतळाच्या जागेत दररोज सकाळी ९ ते रात्री ८ या वेळेत हा चारचाकी वाहन कर्ज मेळावा होणार आहे. या कर्ज मेळाव्याचे वैशिष्ट्य म्हणजे या मेळाव्यात एकाच छताखाली सर्व कंपन्यांच्या चारचाकी गाड्या नागरिकांना पाहायला मिळणार आहेत. तसेच चारचाकी वाहन खरेदीसाठी सोलापूर जनता सहकारी बँकेकडून तत्काळ कर्ज मंजुरी पत्रही देण्यात येणार आहे. गणेशोत्सवानिमित्त सोलापूर जनता सहकारी बँकेतर्फे ही योजना जाहीर करण्यात आली. अधिक माहितीसाठी चार चाकी वाहन कर्ज मेळाव्यातील सोलापूर जनता सहकारी बँकेच्या वतीने लावण्यात येणाऱ्या स्टॉलला भेट द्यावी, असे आवाहन पेंडसे यांनी केले आहे.

# पशुपालनास कृषी समकक्ष व्यवसायाचा दर्जा

### ६० लाख पशुपालक कुटुंबांना लाभ

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २६ ऑगस्ट-**

पशुपालकांच्या उत्पन्नात वाढ होण्याबरोबरच राज्याच्या सकल उत्पन्नात पशुसंवर्धन व्यवसायाचा सहभाग वाढविण्याच्या दृष्टिकोनातून पशुपालकांना प्रोत्साहन देण्यासाठी तसेच स्थानिक रोजगार निर्मिती होण्यासाठी पशुसंवर्धन व्यवसायास कृषी समकक्ष दर्जा देण्याचा निर्णय राज्य शासनाने घेतला आहे.

आर्थिक सल्लागार परिषदेने सन २०२८ पर्यंत महाराष्ट्राची अर्थव्यवस्था १ ट्रिलियन डॉलरपर्यंत पोहोचविण्यासाठी पथदर्शी



आराखडा अहवाल शासनास सादर केला आहे. हे उद्दिष्ट साध्य करण्यासाठी आर्थिक सल्लागार परिषदेने जे घटक उत्पन्न वाढीस चालना देऊ शकतील, असे काही घटक सुनिश्चित केले आहेत. यात कृषी व संलग्न या घटकांचा समावेश करण्यात आला आहे. सद्यस्थितीत राज्याच्या सकल उत्पन्नात कृषी क्षेत्राचा वाटा १२ टक्के इतका असून कृषी क्षेत्राच्या एकूण उत्पन्नात पशुजन्य उत्पन्नाचा वाटा २४ टक्के इतका आहे. नीती आयोगाने सन २०२१ च्या अहवालात पशुसंवर्धन व्यवसायापासून

पशूपालनाला कृषी समकक्ष दर्जा दिल्यामुळे दुग्ध व्यवसाय वाढीस मदत होणार आहे. शिवाय शासनाच्या नवनवीन योजनांमुळे दुग्धव्यवसायाला भरभराटी येणार असल्याने पशूपालकांचे आर्थिक समृध्दी होणार आहे. समकक्ष दर्जा मिळाल्याने पशूपालन व्यवसायाला अच्छे दिन येणार आले आहेत. शेतीला जोडधंदा म्हणून पशूपालन व्यवसाय फायदेशीर ठरणार आहे.

**- डॉ. विशाल येवले, जिल्हा उपायुक्त, पशूसंवर्धन विभाग**

देशाच्या राज्याच्या सकल उत्पादनात पशुसंवर्धन व्यवसायाचा सहभाग वाढविण्यासाठी उपाययोजना करण्याची शिफारस केली आहे. त्यानुसार महाराष्ट्र शासनाने ही पाऊले उचलली आहेत.

राज्यामध्ये २० व्या पशुगणनेनुसार गायवर्गीय पशुधन १ कोटी ३९ लाख ९२ हजार ३०४ व म्हैसवर्गीय पशुधन ५६ लाख ३ हजार ६९२ असे एकूण १ कोटी १५ लाख ९५ हजार इतके पशुधन आहे. राज्यात पशुपालन व्यवसायापासून सुमारे ६० लाख कुटुंबांचे अर्थार्जन असून, देशाच्या जीडीपीत त्यांचे मोठे योगदान आहे. पशुलपालकांच्या उत्पन्नात वाढ होण्यासाठी पशुसवर्धन व्यवसायास कृषी समकक्ष दर्जा देण्यास शासनाने ३१ जुलै रोजी मान्यता दिली आहे. तसा आदेशही जारी केला आहे.

## 'सोजर'च्या विद्यार्थिनीच्या संशोधनाला पेटंट

**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी, दि. २६ ऑगस्ट-**



ग्रामीण भागात असलेल्या सोजर कॉलेज ऑफ फार्मसी, खांडवीच्या विद्यार्थिनीला त्याच्या सर्जनशील संशोधनाद्वारे राष्ट्रीय स्तरावर यशाची ठसा उमटवला आहे. बी. फार्मसी अंतिम वर्षातील पटेल जोहा जफर या विद्यार्थिनीला भारतीय पेटंट कार्यालय, मुंबई यांच्याकडून डिझाइन पेटंट मंजूर झाले आहे, ही बाब संपूर्ण महाविद्यालयासाठी आणि परिसरासाठी गौरवाची आहे.

पटेल जोहा हिने विकसित केलेल्या टेलोमायक्रोस्कोप या अभिनव उपकरणाला पेटंट मिळाल्याने या विद्यार्थिनीने फार्मसी क्षेत्रात एक नवा आदर्श निर्माण केला आहे. या विद्यार्थिनीच्या संशोधनामागे महत्त्वाचे योगदान आहे. प्रा. अकलाख शेख आणि प्राचार्य डॉ. सुजित करपे यांचे, ज्यांनी योग्य दिशा व मार्गदर्शन देऊन त्यांचे विचार साकार करण्यास मदत केली. या यशाबद्दल सोजर कॉलेज ऑफ फार्मसीचे चेअरमन अरुण बारबोले, उपाध्यक्षा कल्पना बारबोले, तसेच प्राचार्य डॉ. सुजित करपे यांनी विद्यार्थिनींचे अभिनंदन केले.

### महत्त्वाचे



## भगवान वराह जयंतीनिमित्त विश्व हिंदू परिषद व बजरंग दलाच्यावतीने मिरवणूक

**बार्शी, दि.२६ ऑगस्ट-**

भगवान वराह जयंतीनिमित्त बार्शी येथे मिरवणूकीचे आयोजन विश्व हिंदू परिषद, बजरंग दल बार्शीद्वारे करण्यात आले. या मिरवणूकीचे उद्घाटन सुरभीदास महाराज (हैदराबाद), ह.भ.प.हासन महाराज अत्तार यांच्या हस्ते करण्यात आले. ही मिरवणूक श्री भगवंत मंदिर मार्ग येथून भगवान वराह यांचे पूजन करुन करण्यात आली. यावेळी सुरभीदास महाराज यांनी भगवान वराह अवतार कार्य आणि पौराणिक महत्व विषद केले. पुढे महाद्वार चौक, वीर सावरकर चौक, पटेल चौक, भगवान पार्श्वनाथ मार्ग, पांडे चौक, सोमवार पेठ मार्गे शिवसृष्टी येथे छत्रपती शिवाजी महाराजांना सुरभीदास महाराज यांच्या पुष्पहार अर्पण करुन छत्रपती शिवाजी महाराजांची आरती करुन समारोप करण्यात आला. या मिरवणुकीमध्ये प्रत्यक्ष वराह मिरवण्यात आले. यावेळी विश्व हिंदू परिषद जिल्हा सहमंत्री बापूसाहेब कदम, प्रखंड अध्यक्ष शिरीष जाधव, बजरंग दल संयोजक अमर शुक्ला, दिपक ढगे उपस्थित होते.



## सुलेरजवळगे येथे श्रावण समाप्तीनिमित्त अड्डपालखी महोत्सव

**सोलापूर, दि.२६ ऑगस्ट-**

अक्कलकोट तालुक्यातील सुलेर जवळगे येथे ग्रामदैवत श्री कलमेश्वर मंदिरात श्रावण मास समारंभ निमित्त श्री श्री राजशेखर शिवाचार्य महास्वामीजी यांच्या मार्गदर्शनाखाली श्री कलबुर्गी शरण बसवेश्वर यांच्या जीवन चरित्रावर प्रवचन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आला होता. दरम्यान श्रावणमास समाप्तीनिमित्त गावातून ग्रामदैवत श्री कलमेश्वर पालखी तसेच श्री श्री राजशेखर शिवाचार्य महास्वामीजी यांचा अड्डापलखी महोत्सव व सुवासिनीसह जल कुंभाची सवाद्य मिरवणूक काढण्यात आली. यावेळी भक्तगण मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. यावेळी या मिरवणुकीत हलग्या, ढोल, ताशाच्या गजरात आणि पुरोहित पूरवंत अतिशय यांचे कार्यक्रम पार पडले. मिरवणुकीनंतर ग्रामदैवत श्री कलमेश्वर मंदिराच्या प्रांगणात धर्मसभा पार पडला. यावेळी श्री श्री राजशेखर शिवाचार्य महास्वामीजी यांनी मार्गदर्शन केले. चेअरमन रविकांत बगले यांनी प्रास्ताविक केला. यावेळी सुरेश अर्जुने, उमेश पुजारी, उद्योजक अजित सुतार, डॉ. सागर हिप्परगी, यांनी मनोगत व्यक्त केले. यावेळी डॉ. रश्मी हिप्परगी, व्यंकटेश कुलकर्णी, माजी उपसरपंच नागनाथ पाटील, रविकांत कापसे, विठ्ठल निम्बर्गी, रामचंद्र इंगळे, मल्लिकार्जुन अष्टगे, चंद्रकांत बाके, लक्ष्मण कोळी, शिवानंद बगले, सिद्धाराम बाके, शीलवंत बगले, अंबादास घोडके, तंटामुक्त अध्यक्ष धर्मराज बगले, बसवराज बाके, श्रीमंत इंगळे, सिद्रामप्पा बगले व गुरुपाद बगले उपस्थित होते.



## एसपीएम स्कूलमध्ये विद्यार्थ्यांनी गणपतीची प्रतिकृती साकारली

**सोलापूर, दि. २६ ऑगस्ट-**

शिक्षण प्रसारक मंडळी, पुणे संचलित एसपीएम इंग्लिश स्कूल येथे विद्यार्थ्यांसाठी गणेशोत्सवाच्या स्वागतासाठी पर्यावरणपूरक गणपती तयार करण्याची कार्यशाळा आयोजित करण्यात आली. कार्यक्रमाची सुरुवात गणेश वंदनेने झाली. शिक्षकांनी गणपतीबाबतची माहिति त्यांच्या विविध नावांचा अर्थ, तसेच पर्यावरणपूरक गणपतीची गरज याबद्दल विद्यार्थ्यांशी संवाद साधला. त्यानंतर विद्यार्थ्यांनी माती, रंगीत कागद, क्ले, नैसर्गिक वस्तू (माती, शेंदूर, फुले, पाने) यांचा वापर करून सुंदर गणपतींची प्रतिकृती तयार केली. यासाठी विद्यार्थ्यांना चित्रकला शिक्षक प्रकाश पोरे यांनी मार्गदर्शन केले. उपक्रमाचा उद्देश विद्यार्थ्यांमध्ये सर्जनशीलता, टीमवर्क, भारतीय संस्कृतीची ओळख आणि पर्यावरणपूरक गणेशोत्सवाची जाणीव निर्माण करणे हा होता. लहानग्यांनी तयार केलेल्या गणपतीच्या प्रतिकृतींमध्ये कल्पकतेची झलक दिसून आली. प्राचार्या संगीता कोळी यांनी विद्यार्थ्यांचे कौतुक केले. तसेच शाळा समिती अध्यक्ष राजेश पटवर्धन यांनी विद्यार्थ्यांना शुभेच्छा दिल्या.

## पंढरपुरात कोम्बिंग ऑपरेशन; २५ गुन्हेगार जेरबंद

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि.२६ ऑगस्ट-**

आगामी गणेशोत्सव, नवरात्रोत्सव भक्तीमय, भयमुक्त व शांततापुर्ण वातावरणात पार पडणेसाठी येथील शहर पोलिसांनी मंगळवारी पहाटे पासून कोम्बिंग ऑपरेशन करुन शहर पोलिसांच्या अभिलेखावरील पंचवीस सराईत गुन्हेगारांना जेरबंद केल्याची माहिती येथील सहाय्यक पोलिस अधिक्षक प्रशांत डगळे यांनी दिली.



या संदर्भात माहिती देताना सहाय्यक पोलिस अधिक्षक प्रशांत डगळे यांनी सांगितले की,शहर पोलिसांकडून गणेशोत्सवाचे पार्श्वभुमीवर मंगळवारी पहाटे चार वाजल्या पासून कोम्बिंग ऑपरेशन राबविणेत आले. यामध्ये पंढरपुरात सुरू असलेल्या बेकायदेशीरपणे कोयत्यासह फिरून दहशत पसरविणा-या गुन्हे अभिलेखावरील सराईत गुन्हेगारांवर परिणामकारक धडक कारवाई करून त्यांची दहशत मोडीत काढणेकरीता त्यांची धरपकड करून पंढरपुर शहर पोलीस ठाणे येथे आणुन ठोस व कडक कारवाई करण्यात आली.

दरम्यान यापुढे भविष्यात देखील पंढरपुर शहर व परिसरातील सामान्य लोंकामध्ये कोणीही दहशत माजविण्याचा प्रयत्न केल्यास सदर गुन्हेगारांवर मोक्का, एमपीडीए, तडीपार यांसारखी कडक कारवाई करून गुन्हेगारी कृत्य करणा-यांचा बिमोड करणेत येईल या बरोबरच बरेच तरूण गुन्हेगार हे इन्स्टाग्राम, युटयुब व सोशल मिडीयांवर गुन्हा व गुन्हेगारी याबाबतचे व्हिडीओ अपलोड करून दहशत पसरवित असलेने असे प्रकार करू नये असा इशारा देखील सहाय्यक पोलिस अधिक्षक प्रशांत डगळे यांनी यावेळी दिला.

तरुण भारत Impact

### कारवाईत पंचवीस जणांना केले जेरबंद

सदरचे कोम्बिंग ऑपरेशन दरम्यान दोन पांढरे रंगाच्या चारचाकी पिकअप, पाचमोटारसायकली तसेच पंढरपुर शहर पोलीस ठाणेचे गुन्हे अभिलेखावरील पंचवीस सराईत गुन्हेगार यांना पोलीस ठाणे येथे आणुन त्यांचेवर प्रचलित कायदयान्वये कायदेशीर कारवाई करणेत आली.

यावेळी येथील शहर पोलिस ठाण्याचे वरिष्ठ पोलिस निरीक्षक विश्वजीत घोडके देखील उपस्थित होते.

ही कारवाई पोलीस अधिक्षक अतुल कुलकर्णी, अप्पर पोलीस अधिक्षक प्रितम कुमार यावलकर, सहा.पोलीस अधिक्षक, प्रशांत डगळे व पंढरपूर शहर पोलिस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक, विश्वजीत घोडके यांचे उपस्थितीत पंढरपुर शहर गुन्हे प्रकटीकरण शाखेचे प्रभारी सपोनि आशिष कांबळे, सपोनि भारत वाघे, पोसई श्रीकांत घुगरकर, पोसई राजेश गोसावी, दप्तरी कल्याण ढवणे, पोलीस नाईक सचिन इंगळे तसेच सिरमा गोडसे, सचिन हेंबाडे, प्रसाद औटी, विठठल विभुते, पोकॉ शहाजी मंडले, बजरंग बिचकुले, तसेच पंढरपुर शहर वाहतुक शाखेचे अंमलदार व पंढरपुर शहर पोलीस ठाणेचे अंमलदार यांनी केली.

### सोलापूर तरुणभारत मधील वृत्ताची दखल

दरम्यान सोलापूर तरुण भारत मधून मंगळवारी (ता.२६) पंढरपूरात कायद्याची ऐशीतैशी या मथळ्याखाली पंढरपूरातील वाढत्या गुन्हेगारी बद्दल तसेच सणासुदीच्या पार्श्वभूमीवर अभिलेखावरील गुन्हेगारांवरील कारवाईबाबत येथील पोलिसांच्या बोटचेप्या धोरणावर प्रकाश टाकणारे सविस्तर वृत्त प्रसिध्द करण्यात आले होते. त्याची दखल घेत येथील नवनियुक्त सहाय्यक पोलिस अधिक्षक प्रशांत डगळे यांनी त्वरीत अभिलेखावरील गुन्हेगारांवर कायद्याचा बडगा उगारुन अनेकांना जेरबंद केल्या बद्दल येथील सर्वसामान्य नागरिकांतून समाधान व्यक्त करण्यात आले.

## लोकमंगल पतसंस्थेचे कार्य कौतुकास्पद : डॉ. इनामदार

**तभा वृत्तसेवा,**
**अकलूज, दि. २६ ऑगस्ट-**

माजी सहकार मंत्री तथा दक्षिण सोलापूरचे आमदार सुभाष देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली चालू असलेल्या लोकमंगल पतसंस्थेच्या ७१ व्या अकलूज शाखेचा शुभारंभ प्रसिद्ध हृदयरोग तज्ञ डॉक्टर एम. के. इनामदार यांच्या हस्ते तर पतसंस्थेचे कार्यकारी संचालक तथा सोलापूर कृषी उत्पन्न बाजार समितीचे संचालक मनीष सुभाष देशमुख, पोलीस उप अधीक्षक संजय वाळके व सहाय्यक उपनिबंधक पुष्पक सारडा यांच्या प्रमुख उपस्थितीमध्ये संपन्न झाला.



याप्रसंगी बोलताना डॉ. इनामदार म्हणाले की लोकमंगल समूह हा तळागाळातील लोकांसाठी काम करत असून या शाखेच्या निमित्ताने अकलूज नगरी मधील नागरिकांना याचा फायदा होणार असून नागरिकांनी याचा लाभ घ्यावा असे आवाहन करून पतसंस्थेस पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या. चेअरमन गुरण्णा तेली यांनी सभासदांच्या सहकार्यामुळे २६०० कोटींची व्यवसाय पूर्ती करत नावलौकिक कमावल्याचे सांगितले. याप्रसंगी राजकुमार पाटील, डॉ. सुधीर पोफळे, पांडुरंग वाघमोडे, मुबारक कोरबू, संचालक समाधान पाटील, फैय्याज मुलाणी, युवराज गायकवाड, सरव्यवस्थापिका अलका देवडकर यांचेसह पतसंस्थेचे बहुसंख्य सभासद व खातेदार उपस्थित होते. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी प्रशासकीय अधिकारी दत्तात्रय, माळी, अकाउंट विभाग प्रमुख गोकुळ मोरे, विभागीय अधिकारी दिगंबर जाधव, वैभव लांबोरे, जगदीश पाटील, आकाश शिंदे, सतीश बोडरे, रमेश छपरे, शिवाजी माने आदी कर्मचाऱ्यांनी परिश्रम घेतले. सूत्रसंचालन व आभार सतीश लोंढे यांनी मानले.

## 'एसपीएसएस सॉफ्टवेअरचा उपयोग' विषयावर 'सिंहगड'मध्ये कार्यशाळा

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि. २६ ऑगस्ट-**

एस. के. एन. सिंहगड कॉलेज ऑफ इंजिनियरिंग, पंढरपूर येथील स्थापत्य अभियांत्रिकी विभागात एसपीएसएस सॉफ्टवेअरचा उपयोग या विषयावर एक दिवसीय कार्यशाळा संपन्न झाल्याची माहिती महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. कैलाश करांडे यांनी दिली.

ही कार्यशाळा मुख्यत्वे चतुर्थ वर्षाच्या विद्यार्थ्यांसाठी होती. कार्यशाळेचा उद्देश विद्यार्थ्यांना एसपीएसएस सॉफ्टवेअरच्या वापराबाबत सखोल माहिती देणे होता. यात रिग्रेशन एनालिसिस म्हणजे काय, त्याचा सिव्हिल इंजिनिअरिंगमध्ये कसा उपयोग होतो, तसेच विविध सांख्यिकी चाचण्या आणि त्यांचे महत्त्व यावर मार्गदर्शन करण्यात आले.



विद्यार्थ्यांना रिग्रेशन एनालिसिस कसे करायचे याचे प्रात्यक्षिक स्वरूपात सादरीकरण करण्यात आले, ज्याममध्ये एसपीएसएस सॉफ्टवेअर तसेच एक्सेलचा वापर कसा करता येतो हेही दाखवले गेले. कार्यशाळेची सुरुवात स्थापत्य अभियांत्रिकी विभागाचे विभाग प्रमुख डॉ.एस.एस.कदम यांनी केली. कार्यक्रमाचे यशस्वी संचालन प्रा. ओमकार बिडकर यांनी केले. आभार डॉ. वाय. पी. पवार यांनी मानले.

## दक्षिणमधील ३८२ निराधरांना अनुदान मंजूर

### तहसीलदार जमदाडे यांची माहीती

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.२६ ऑगस्ट-**

दक्षिण सोलापूर तालुक्यातील वृध्द, निराधार व विधवा अशा ३८२ निराधरांना अनुदान मंजूर करण्यात आल्याची माहीती दक्षिणचे तहसीलदार किरण जमदाडे यांनी दिली. यावेळी संजय संजय गांधी निराधार योजनेच्या नायब तहसीदार रूपाली करमाळकर उपस्थित होत्या.

### कागदपत्रांची पडताळणी करून अनुदानास सुरुवात

संजय गांधी निराधार योजनेच्या बैठकीत संजय गांधी योजना १४६ व श्रावणबाळ योजना २३६ असे एकूण ३८२ अर्ज मंजुर करण्यात आले आहेत. या लाभार्थ्यांची मूळ कागदपत्रांची पडताळणी करण्यात येत आहे. कागदपत्र पडताळणी झाल्यानंतर लाभार्थ्यांना दरमहा अनुदान मिळणार आहे. लाभार्थ्यांनी त्वरीत मूळ कागदपत्रांची पडताळणी करून घ्यावे.

**- रूपाली करमाळकर,**
नायब तहसीलदार, संजय गांधी योजना, दक्षिण सोलापूर

संजय गांधी निराधार अनुदान योजना

यावेळी तहसीलदार जमदाडे म्हणाले, मार्च ते जून महिन्यातील पात्र अर्जदारांची पडताळणी करून जुलै महिन्यात बैठक घेण्यात आली. यावेळी सर्व कागदपत्रे पूर्ण व पात्र असलेल्या ३८२ लाभार्थ्यांचे अर्ज मंजूर करून त्यांना पडताळणीसाठी पत्र देण्यात आली आहे. लवकरच त्यांना दरमहा दीड हजार रूपये अनुदान मिळण्यास सुरुवात होईल.

## महात्मा विद्या मंदिर व सोमनाग प्रशालेत वही वाटप

**सोलापूर, दि. २६ ऑगस्ट-**

महात्मा विद्या मंदिर व सोमनाग प्रशालेत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या वाढदिवसानिमित्त आमदार देवेंद्र कोठे यांच्यातर्फे ५०० विद्यार्थ्यांना वह्या वाटप करण्यात आल्या. यावेळी अक्षय अंजीखने, राजेश अनगिरे, काशिनाथ झाडबुके, सिद्धेश्वर कमटम, भीमाशंकर बिराजदार, विद्यासागर श्रीराम, अंबादास चाबुकस्वार, अनिल अंजनाळकर, सागर येलदन, शंकर चौगुले, शारदा चौगुले, नागराज चौगुले, मुख्याध्यापिका गायकवाड, सोमनाग प्रशालेचे मुख्याध्यापक शहाजी निळ उपस्थित होते. सूत्रसंचालन अजिंक्य पाटील यांनी केले तर आभार हिबारे यांनी मानले.

## वैराग नगरपंचायतर्फे पर्यावरणपूरक गणेशोत्सव स्पर्धा

**तभा वृत्तसेवा,**
**वैराग, दि. २६ ऑगस्ट-**

वैराग नगरपंचायतेच्या वतीने यंदा पर्यावरणपूरक गणेशोत्सव स्पर्धा आयोजीत करण्यात आली आहे. गणेशमूर्ती फक्त मातीच्या असाव्यात, प्लॅस्टर ऑफ पॅरिस व थर्माकॉलचा वापर टाळावा, मूर्तीची उंची घरगुतीसाठी २ फूट व सार्वजनिक मंडळांसाठी ४ फूटांपर्यंत ठेवावी, असे आवाहन नगराध्यक्षा सुजाता डोळसे, उपनगराध्यक्ष निरंजन भूमकर व मुख्याधिकारी विद्या पाटील यांनी केले आहे.

यामध्ये पर्यावरणपूरक मूर्ती प्रतिष्ठापना करणे तसेच त्यास प्लास्टिकमुक्त व थर्माकोलमुक्त आरास करणे, वृक्षारोपण करून त्याचे संवर्धन करणे, घनकचरा, पाणी व्यवस्थापन करणे, घरामध्ये ऊर्जा बचतीचे उपकरण तयार करणे, सर्व गणेशमूर्ती नगरपंचायतीस दान करणे आदी विषय स्पर्धेत समाविष्ट करण्यात आले आहेत. स्पर्धेत विजेत्या सार्वजनिक मंडळांना अनुक्रमे ५,०००, ३,००० व २,००० रुपये, तर घरगुती मंडळांना ३,०००, २,००० व १,००० रुपयांची बक्षिसे देण्यात येणार आहेत. नगरपंचायतकडून कृत्रिम तलावांची व्यवस्था करण्यात येणार आहे.

## रुग्णालयातील बेडच्या अडचणी दूर करणार : खा. मोहिते-पाटील

**तभा वृत्तसेवा,**
**अकलुज, दि. २६ ऑगस्ट-**

अकलूज उपजिल्हा रुग्णालयात रुग्णांची संख्या प्रचंड वाढली आहे. उपचारासाठी जागा कमी पडत आहे. जागेसंबंधी आ. रणजितसिंह मोहिते-पाटील यांच्या प्रशासकीय बैठका सुरु आहेत. लवकरच सकारात्मक निर्णय होवुन अकलूज उपजिल्हा रुग्णालयाच्या जागेवर तोडग काढुन शंभर बेडचे सुसज्ज हॉस्पिटल अकलूजमध्ये सुरु होईल, असे मत माढा लोकसभेचे खासदार धैर्यशील मोहिते-पाटील यांनी सांगितले.

### अकलूज उपजिल्हा रुग्णालयात सोनोग्राफी मशिन कार्यान्वित

अकलूज उपजिल्हा रुग्णालयात नव्यानेच बसविण्यात आलेल्या सोनोग्राफी मशिनचे उद्घाटन खा.धैर्यशील मोहिते-पाटील यांचे हस्ते करण्यात आले.



पत्रकारांशी बोलताना त्यांनी उपजिल्हा रुग्णालयातील सर्व समस्या,अडचणी जाणुन घेतल्या. त्यावेळी अकलुज उपजिल्हा रुग्णालयासठीच्या जागेचा प्रश्न निकाली काढुन रुग्णांची होणारी गैरसोय दुर करण्याचे अश्वासन दिले.त्याचप्रमाणे रक्ताचे नमुने अकलुज उपजिल्हा रुग्णालयात तपासणी करण्याची सुविधा सुरु करण्यासाठी प्रयत्न करणार असल्याचे सांगितले. यावेळी वैद्यकीय अधीक्षक डॉ. बापु ओवाळ यांनी नवीन सोनोग्राफी मशिनची माहिती देत रुग्णालयातील कमी मनुष्यबळाची माहिती दिली. ते म्हणाले कि,रुग्णालयात महिन्यात सुमारे ३०-३५ महिलांची शस्त्रक्रिया तर ६०-७० महिलांचे सामान्यपणे प्रसुती होत असते.त्यासाठी नवीन सोनोग्राफी मशिन अतिशय फायद्याची ठरणार आहे. साधारणपणे १२ ते १८ आठवड्याच्या गर्भवती मातांची सुमारे ८०० ते १५०० रुपये शुल्क असलेली सोनोग्राफी मोफत करण्यात येणार आहे.दर मंगळवारी तज्ञ रेडिओ लॉजिस्टांच्या सहकार्याने सद्य परीस्थिती नुसार १५ -२० रुग्णांची सोनोग्राफी करण्यात येणार असल्याचेही डॉक्टर ओवाळ यांनी सांगितले. यावेळी डॉ. संतोष खडतरे,डॉ. स्मिता धोत्रे यांच्यासह उपजिल्हा रुग्णालयातील सर्व वैद्यकीय अधिकारी उपस्थित होते.